सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २६ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४२ | पाने : ४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# संभल हिंसाचार प्रकरणी २५०० लोकांवर गुन्हा दाखल

## आरोपींमध्ये खासदार झियाउर रहमान बर्कचा समावेश

संभल, २५ नोव्हेंबर : उत्तरप्रदेशच्या संभल येथे हिंसाचार प्रकरणी समाजवादी पार्टीचे खासदार झियाउर रहमान बर्क यांच्यासह २५०० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. न्यायालयाच्या आदेशानंतर संभल येथील मशिदीत सर्वेक्षण केले जात असताना हिंसाचार भडकला होता. यात आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झालाय. दरम्यान पोटनिवडणुकीतील पराभवामुळे चिडून खासदार बर्क यांनी हा हिंसाचार भडकवल्याचा आरोप भाजपने केलाय.

संभल येथे न्यायालयाच्या आदेशानुसार जामा मशिदीत सर्वेक्षणासाठी पथक आल्याचे कळताच हजारोचा संतप्त जमाव मशिदीभोवती एकत्रित आला. पथकावर आणि पोलिसांवर दगडफेक सुरू केली. परिसरातील इमारतीच्या छतांवरून पोलिसांवर गोळीबार करण्यात आला, असे पोलिस आयुक्त अंजनेय सिंह यांनी सांगितले. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या, लाठीमार केला. यामुळे पळापळ व चेंगराचेंगरी झाली. या




हिंसाचारात ३ जणांचा मृत्यू झाला होता. तर आज सोमवारी उपचारादरम्यान एका जखमी इसमाचा मृत्यू झाला. या हिंसाचारात पोलिस अधीक्षक विष्णोई, पोलिस अधिकारी अनुज चौधरी यांच्यासह १५ अन्य पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत. हिंसाचारादरम्यान दंगलखोरांनी शासकीय वाहनांची जाळपोळ केली. पोलिसांचे प्रत्येक आवाहन जमावाने पेटवून दिले. त्यामुळे पोलिसांनाच स्वतः चा जीव वाचवण्यासाठी पळ काढावा लागला. त्यानंतर अतिरिक्त कुमक बोलावून दंगलखोरांवर लाठीमार सुरू केला. हिंसाचारात नईम अहमद, बिलाल अंसारी आणि नोमान यांचा मृत्यू झाला आहे. मृतांच्या कुटुंबीयांनी पोलिसांच्या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे. संभल हिंसाचार प्रकरणी समाजवादी पार्टीचे नेते व संभलचे खासदार झियाउर रहमान बर्क, आमदार इक्बाल मेहमूद यांचा मुलगा सोहेल इक्बाल याच्यासह २५०० जणांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिंसाचार घडवून आणणे, जमाव जमवणे आणि अशांतता निर्माण केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी ठाण मांडून आहेत. तणाव असल्याने शहरात पोलिस बंदोबस्तही बाढवला आहे. कुणालाही सोडणार नाही. जमावाला भडकवणाऱ्यांना जन्माची अद्दल घडवू, असे पोलिस अधीक्षक विष्णोई यांनी सांगितले. सध्या संभल शहरात अघोषित संचारबंदीसारखे वातावरण आहे. शहरात सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर लक्ष देऊ नये आणि संयम राखावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केला आहे. शहरात आजसकाळी परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

# नवनिर्वाचितांना बोलण्याची संधी द्या : पंतप्रधान

नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर (हिं.स.) : संसदेच्या हिवाळी अधिवेशनात नवनिर्वाचित खासदार नव्या ऊर्जेसह आलेले असतात. विरोधकांच्या गोंधळात त्यांचा आवाज दाबला जातो. त्यामुळे नव्या खासदारांना बोलण्याची संधी द्यावी असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आज, सोमवारी प्रारंभ झाला. सभागृहात जाण्यापूर्वी माध्यमांशी संवाद साधताना पंतप्रधान बोलत होते.

याप्रसंगी मोदी म्हणाले की, निवडणुकीत ज्यांना लोकांनी नाकारले असे लोक गदारोळ घालतात. संसदेमध्ये नविन उर्जा, उत्साह घेऊन आलेल्या नवनिर्वाचित खासदारांना गदारोळ घालणारे लोक बोलू देत नाहीत.



त्यांच्या आवाज दाबला जातो, त्यामुळे संसदेमधील चर्चेमध्ये सर्वांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा असे मोदी म्हणाले. भारतातील मतदार लोकशाहीला समर्पित आहेत, त्यांचे संविधानाप्रती समर्पण आहे, त्यांचा संसदीय कार्यपद्धतीवरचा विश्वास आहे, संसदेत बसलेल्या आपल्या सर्वांना लोकांच्या भावनांनुसार जगावे लागेल आणि हे आहे. त्याची भरपाई करण्याचा एकच उपाय आहे की आपण प्रत्येक विषयाचे विविध पैलू सभागृहात ठळकपणे मांडले पाहिजेत, त्यातून येणाऱ्या पिढ्यांनाही प्रेरणा मिळेल फलदायी. मी पुन्हा एकदा सर्व आदरणीय खासदारांना हे अधिवेशन उत्साहाने आणि उत्साहाने पुढे नेण्यासाठी आमंत्रित करत असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. तसेच देशाची राज्यघटना लिहून ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यासाठी संसदेत आम्ही सर्वजण मिळून संविधान उत्सवाला सुरुवात करणार आहे. त्यामुळे हे संसदेच हे सत्र विशेष असणार आहे. संविधान निर्माण करताना समाजातील प्रत्येक घटनेचा त्यामध्ये सहभाग घेतला आहे. त्यामुळे भारतीय संविधानासारखा इतका चांगला दस्ताऐवज आपल्याला मिळाल्याचे मोदी यांनी सांगितले.

# जनतेने जरांगेचे ऐकलंच नाही : भुजबळ

नाशिक, २५ नोव्हेंबर : शरद पवार यांनी माझ्या मतदारसंघात सभा घेतली, अभ्यास करून त्यांनी माझ्याविरुद्ध उमेदवार दिला. मात्र, आमचे मित्र जरांगे, त्याचं काय काम होतं, त्यांनी तर सांगितलं होतं की, निवडणुकीमध्ये मी पडणार नाही, बोलणार. पण, प्रचार संपण्याच्या आदल्यादिवशी सकाळी दहापासून रात्री दोनपर्यंत हाताला सलाईन आणि मी पाहा आजारी आहे. आता, माझं काहीही होईल, आपल्या समाजाची जी लेकरंबाळं आहेत, काहीतरी करा, ज्यांनी विरोध केला त्यांना पाडा, असं सगळं सांगितलं. माझ्या मताधिक्यावर त्याचा परिणाम झाला, परंतु इतर अल्पसंख्याक समाज एकत्र आला आणि त्यांनी आमचं तारू किनाऱ्याला लावलं, अशा शब्दांत छगन भुजबळ यांनी विजयानंतर पहिली प्रतिक्रिया देताना थेट नाव घेऊन मनोज जरांगे पाटील यांना टोला लगावला.


राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी तुम्हाला ज्याला निवडून द्यायचंय ते द्या, ज्याला पाडायचंय ते पाडा, अशा शब्दांत मराठा समाजाला आवाहन केलं होतं. मात्र, निवडणूक प्रचाराची मुदत संपत असताना त्यांनी येवल्यात जाऊन सांत्वन दौरा केला होता. या दौऱ्यावेळी मराठा समाज बांधवांशी बोलताना त्यांनी इथं दोघांना पाडा असं आवाहनही केलं होतं. मात्र, विधानसभा निवडणुकीत येथून राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार छगन भुजबळ विजयी झाले आहेत. त्यामुळे, आपल्या विजयानंतर पहिली प्रतिक्रिया देताना त्यांनी थेट मनोज जरांगे यांचे नाव घेऊन टोला लगावला. जनादेशामधून हे स्पष्ट झालेय की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांचाच आहे. कायद्याच्या दृष्टीनेही हा प्रश्न सुटला असून, निवडून आलेल्या आमदारांच्या कौलामुळे राष्ट्रवादीबाबत आता लोकांमध्ये संभ्रम राहिलेला नसल्याचे भुजबळ यांनी म्हटले आहे.

# लाडक्या बहिणींना १ एप्रिलपासून मिळणार २१०० रुपये !

सोलापूर, २५ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महाविकास आघाडी सरकारने लाडक्या बहिणींना तीन हजार रुपये देण्याचा शब्द दिला होता. मात्र, ज्या महायुती सरकारने योजना आणली व १ जुलैपासून दरमहा १५०० रुपये दिले त्याच सरकारवर लाडक्या बहिणींनी विश्वास दाखविला. त्याचवेळी महायुती सरकारने आमचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यास लाडक्या बहिणींना दरमहा एकवीसशे रुपये देण्याचे वचन दिले. त्याला लाडक्या बहिणींनी साथ दिल्याचे निकालावरून स्पष्ट झाले.

दरम्यान, राज्यातील २८८ आमदारांमध्ये तब्बल १८७ आमदारांना एक लाखांहून अधिक मते मिळाली आहेत. तर, दोन आमदारांनी दोन लाखांहून अधिक मते घेतली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ११ पैकी दहा आमदारांनाही पहिल्यांदाच एक लाखांवर मते मिळाल्याचे पाहायला मिळाले. त्यात सत्ताधारी महायुतीतील आमदारांना सर्वाधिक मते आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या या योजनेतील बहुतेक महिलांना लाडकी बहीण योजनेचा नोव्हेंबरपर्यंतचा लाभ मिळाला आहे. आता नवीन सरकार सत्तेवर येईल, त्यावेळी डिसेंबर ते मार्च या चार महिन्यांतील प्रलंबित लाभ मिळेल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पण, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार १ एप्रिलपासून योजनेसाठी पात्र लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये मिळतील. त्यासंदर्भातील घोषणा आगामी काही दिवसांत होईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

## पुण्यातून दुबई, बँकॉकसाठी थेट विमान सेवा सुरू



पुणे: इंडिगो विमान कंपनीकडून पुण्यातून दुबई आणि बँकॉकसाठी थेट विमान सेवा सुरू झाली. दोन्ही विमानांना प्रवाशांचा चांगला प्रतिसाद असल्याचे दिसून आले. बँकॉकसाठी विमानसेवा सुरू झाल्यामुळे पुण्यातून तिसरी आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू झाली आहे. पुणे विमानतळावरून सध्या सिंगापूर आणि दुबाईसाठी विमानसेवा सुरू होती. पण, इंडिगोकडून दुबई आणि बँकॉकसाठी विमान सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दुबईसाठी दररोज मध्यरात्री बारा वाजून १५ मिनिटांनी विमान उड्डाण करेल. ते पहाटे दोन वाजून १५ मिनिटांनी दुबाईला पोहोचले. तर, दुबई येथून पाच वाजून ४० मिनिटांनी पुण्यासाठी उड्डाण करेल. ते पुण्यात रात्री दहा वाजून १० मिनिटांनी दाखल होईल. तर बँकॉकसाठी पुण्यातून बुधवार, शुक्रवार आणि रविवारी विमानसेवा सुरू असेल. ते रात्री अकरा वाजून १० मिनिटांनी पुण्यातून सुटेल. तर, बँकॉक येथून पुण्यासाठी सोमवार, गुरुवार आणि शनिवारी विमानसेवा असणार आहे. बँकॉक येथून मध्यरात्री एक वाजून १५ मिनिटांनी पुण्यासाठी सुटेल. ते पुण्यात पहाटे सव्वाचार वाजता दाखल होईल. दोन आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू झाल्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## उत्तरप्रदेश : भीषण अपघातात ५ जणांचा मृत्यू

हरदोई, २५ नोव्हेंबर : उत्तरप्रदेशच्या हरदोई जिल्ह्यात आज सोमवारी लग्नाच्या वऱ्हाडाची बस आणि कार यांच्यात भीषण अपघात घडला. यामध्ये ४ महिलांसह ५ जणांचा मृत्यू झाला. तर काही लोक जखमी झाले. जखमी लोकांना रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनेवर दु:ख व्यक्त करत या अपघातातील पीडितांविषयी संवेदना व्यक्त केल्या आहेत. या घटनेची माहिती देताना अप्पर पोलिस अधिक्षक नृपेंद्र कुमार यांनी सांगितले की, हा भीषण अपघात मल्लावा कोतवाली परिसरातील गौरी नगरमध्ये झाला. यावेळी ४ महिलांसह एका व्यक्तीचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मल्लवान कोतवाली परिसरातील गौरी नगर येथे पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास शिवराजपूरहून लग्नाच्या वऱ्हाडींना घेऊन जाणारी कार बघौलीकडून येणाऱ्या बसला धडकली. या बसमध्ये वऱ्हाडी बसले होते. या अपघातात ४ जण जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

# राज्यसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब

## अदानींच्या मुद्यावरून विरोधकांचा सभागृहात गोंधळ


नवी दिल्ली: संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आज, सोमवारी सुरुवात झाली. यावेळी विरोधकांनी गौतम अदानींच्या मुद्द्यावरून राज्यसभेत गोंधळ घातला. त्यामुळे राज्यसभेचे कामकाज आधी ११: ४५ वाजेपर्यंत आणि त्यानंतरही गोंधळ कायम राहिल्यामुळे दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी अदानी प्रकरणावर चर्चेची मागणी केली, परंतु राज्यसभा अध्यक्षांनी नियमांचा हवाला देत त्यास परवानगी दिली नाही. गदारोळामुळे सभापतींनी सभागृहाचे कामकाज ११: ४५ वाजेपर्यंत तहकूब केले.राज्यसभेचे कामकाज ११: ४५ वाजता पुन्हा सुरू झाले, मात्र विरोधकांनी पुन्हा गदारोळ सुरू केला. यावर नाराजी



व्यक्त करत राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले. संविधान दिनानिमित्त उद्या, मंगळवारी सभागृहाचे कामकाज सुरू राहणार नाही. त्यामुळे बुधवारी पुन्हा सभागृहाचे कामकाज सुरू होणार आहे.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रविवारी संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधकांनी अदानी प्रकरणावर चर्चा करण्याची मागणी केली. मात्र, नियमानुसार विषय मांडण्यात येतील, असे आश्वासन सरकारच्या वतीने बैठकीत देण्यात आले होते. परंतु, विरोधकांनी गोंधळ घातल्यामुळे पहिल्याच दिवशी राज्यसभेचे कामकाज तहकूब करण्याचा प्रसंग



# केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे लवकरच येणार 'अच्छे दिन'!

## लवकरच ८वा वेतन आयोग; होणार १८६ टक्के पगारात वाढ?

नवी दिल्ली : केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे ८ व्या वेतन आयोगाच्या अधिकृत घोषणेची प्रतीक्षा असून लवकरच ती घोषणा होणार आहे. त्यामुळे अर्थकारणासाठी त्यांना 'अच्छे दिन' येणार असल्याचे सरकार केंद्र सरकारकडून देण्यात येत आहे. दरम्यान, केंद्रीय कर्मचाऱ्यांना किमान वेतनात १८६ टक्के वाढ अपेक्षित आहे.

नॅशनल कौन्सिल ऑफ जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी (जेसीएम) चे सचिव (स्टाफ साइड) शिव गोपाल मिश्रा यांनी सांगितले की, त्यांना किमान २.८६ च्या फिटमेंट फॅक्टरची अपेक्षा आहे. ७ व्या वेतन आयोगानुसार २.५७ फिटमेंट फॅक्टरच्या तुलनेत हे २९ बेसिस पॉइंट्सने अधिक आहे. फिटमेंट फॅक्टर वाढल्यास कर्मचाऱ्यांच्या किमान मूळ वेतनात वाढ होते. तसेच कर्मचाऱ्यांची पेन्शन आणि पगार असे दोन्हीमध्येही वाढ होते.

सध्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार दरमहा १८ हजार रुपये किमान मूळ वेतन मिळते. जे ६ व्या वेतन आयोगाच्या ७ हजार रुपयांवरून वाढवण्यात आले होते. त्यानंतर आता केंद्र सरकारने २.८६ च्या फिटमेंट फॅक्टरला मंजुरी दिल्यास, सध्याच्या १८ हजार रुपयांच्या वेतनाच्या तुलनेत सरकारी कर्मचाऱ्यांचे किमान वेतन वाढून ५१,४८० रुपयांवर पोहोचेल. तर पेन्शन सध्याच्या ९ हजार रुपयांच्या तुलनेत १८६ टक्क्यांनी वाढून २५,७४० रुपये होऊ



### ८ वा वेतन आयोग कधी स्थापन होणार?

८ वा वेतन आयोग कधी स्थापन होईल? याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. पण मीडिया रिपोर्ट्सनुसार, आगामी अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये त्याची घोषणा केली जाऊ शकते. दरम्यान, मागील २०२४-२५ च्या अर्थसंकल्पावेळी कर्मचारी संघटनांनी कॅबिनेट सचिव आणि वित्त मंत्रालयाकडे त्यांच्या मागण्या पोहोचवल्या होत्या. ८व्या वेतन आयोगाच्या स्थापनेबाबत डिसेंबरमधील नॅशनल कौन्सिल ऑफ जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरीच्या बैठकीनंतर स्पष्टता येईल. ही बैठक चालू महिन्यात होणे अपेक्षित होते. पण ती डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

### कर्मचाऱ्यांसह पेन्शनधारकांची संख्या १ कोटीच्या घरात

७व्या वेतन आयोगाच्या शिफारशीमुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात भरीव वाढ झाली होती. याची स्थापना फेब्रुवारी २०१४ मध्ये करण्यात आली होती. त्याच्या शिफारशी १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आल्या. यात मुख्य म्हणजे कर्मचाऱ्यांचे किमान मूळ वेतन ७ हजार रुपयांवरून १८ हजार रुपये करण्यात आले. सर्वसाधारणपणे दर १० वर्षांनी वेतन आयोगाची स्थापना केली जाते. पण त्यासाठी कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. सध्या केंद्र सरकारच्या कर्मचारी आणि पेन्शनधारकांची संख्या सुमारे १ कोटी आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ३४ कोटींच्या कोकेनची तस्करी करणाऱ्या संशयिताला मुंबई विमानतळावरून अटक

मुंबई: महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) नुकतीच मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर केलेल्या कारवाईत सिएरा लिओन येथून आलेल्या एका लायबेरियन नागरिकाला ताब्यात घेतले. या प्रवाशाच्या ट्रॉली बॅगचे वजन असामान्यपणे अधिक असल्याचे आढळून आल्यामुळे डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी कसून तपासणी केली. त्यामध्ये ट्रॉली बॅगच्या तळाशी चोर कप्प्यात पांढरी भुकटी असलेली दोन पाकिटे सापडली. प्रयोगशाळेतील तपासणीमध्ये ते कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. त्याचे एकूण वजन ३४९६ ग्रॅम इतके असून, बेकायदेशीर बाजारात त्याचे मूल्य रु. ३४.९६ कोटी इतके आहे. संबंधित प्रवाशाला अटक करण्यात आली असून पुढील तपासणी सुरु आहे.

अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळ्या उद्ध्वस्त करण्यासाठी आणि अमली पदार्थांच्या धोक्यापासून नागरिकांचं रक्षण करण्यासाठी डीआरआय वचनबद्ध आहे.

# 'कांतारा' सिनेमाच्या टीमची बस पलटली
## अनेक कलाकार जखमी; सिनेमाचे शूटींगही थांबले

बंगळूर : मनोरंजन क्षेत्रातून मोठी बातमी समोर आली आहे. ऋषभ शेट्टी यांच्या कांतारा चॅप्टर १' चित्रपटाबाबत मोठी घटना घडली आहे. कंतारा चित्रपटातील संपूर्ण टीमचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये अनेक कलाकार जखमी झाले असून काहींची परिस्थिती गंभीर आहे. त्यामुळे चित्रपटाचे शुटींग देखील थांबवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या कर्नाटकातील उडुपी जिल्ह्यात 'कांतारा चॅप्टर १'चे शुटींग सुरु होते. रविवारी रात्रीच्या सुमारास शूटींगच्या सेटवरुन परतणाऱ्या कलाकारांची मिनी बस पलटल्यामुळे भीषण अपघात झाला. या मिनी बसमध्ये २० कलाकार होते. या घटनेनंतर जखमींना जडकल आणि कुंदापूर येथील रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले असून कोल्लूर पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान, १२ ऑक्टोबर २०२५ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. मात्र झालेल्या या अपघातामुळे चित्रपटाच्या शुटींगवर काहीसा परिणाम होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# बौद्ध उपासक उपासिका २७ नोव्हेंबरपासून श्रीलंका दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ नोव्हेंबर**



तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने शहरातील व परिसरातील बौद्ध उपासक उपासिकांचा बौद्ध राष्ट्र श्रीलंका दौरा उद्या २७ नोव्हेंबर पासून आयोजित करण्यात आला असून यात एकूण ३६ बौद्ध उपासक उपासिका सहभागी झाले आहेत. हा दौरा सहा डिसेंबरपर्यंत चालणार असल्याची माहिती या धम्मसहलीचे संयोजक भदंत पंयाबोधी थेरो यांनी दिली.

बौद्ध धम्मात धम्म पर्यटनाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने जगातील विविध बौद्ध राष्ट्रांना भेटी देऊन तेथील धम्मसंस्कृती व लोकजीवनाचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. तसेच प्रेक्षणीय स्थळे व ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या जातात. श्रीलंकेतील दंबुला, अनुराधापुरा, कँडी, नुवाला एलिया, कोलंबो आदी ठिकाणी भेट दिली जाणार आहे. यात सहभागी झालेल्या बौद्ध उपासक उपासिकांनी उद्या २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.०० वा हुजुरसाहेब नांदेड रेल्वे स्थानकावर उपस्थित राहावे असे श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# गळेगांव,थडीसावळी शिवारात हरणांचा कळप; पिक नासाडीमुळे शेतकरी त्रस्त



**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २५ नोव्हेंबर**

बिलोली तालुक्यातील नवे, जुने गळेगांव, जुनी थडीसावळी, खतगांव आदि भागात मन्याड नदी परिसरातील शेत शिवारात पंधरा ते वीस पर्यंत अंदाजे हरणांचा कळप दिवस भरापासून उड्या मारत पळत, फिरत आहे. शेतकऱ्यांना या हरणांच्या वारंवार इवल्याशा पिकात तुडवण व नासाडीमुळे त्रास सहन करावा लागत आहे. प्रसंगी कळप आल्यानंतर शेतकरी त्यांना हुसकावून लावत आहेत. परंतु, पुन्हा पुन्हा त्यांची सामुहिक स्वारी शेता शेताने निघत असल्याने शेतकरी पुरते वैतागून गेल्याचे चित्र पहावयास मिळाले. शेतात काही बुजगावणी शेतकऱ्यांकडून पिकाच्या संरक्षणार्थ लावण्यातही आली, मात्र त्यालाही हरणांचा कळप अगदी जुमानायला तयार नाही.

लगभग एक महिन्याचे पीक परिसरातील शेतकऱ्यांचे झाले आहे. हरभरा, ज्वारी, करडी, धनिया इत्यादी पिकांनी आता कुठे बाळसे धरले आहे. त्यात या हरणांच्या कळपाने उड्या मारत तुडवल्यामुळे पीकाचे काही प्रमाणात नुकसानही होत आहे. कधी ओरडून आवाज करीत शेतकरी त्यांना शेतातून हुसकावून लावत आहेत. परिसरातील तुरीला पिवळ्या फुलांचा बहार आल्याने त्यातही त्यांचा अधेमधे शिरकाव असतोच. मन्याड नदी परिसरातील शेतकरी या हरणांच्या कळपाने हैराण झाले आहेत. शेतकऱ्यांना या त्रासापासून दिलासा देण्यासंदर्भात संबंधित वन विभागाने त्यावर काहीतरी उपाय, शक्कल काढावी, असे परिसरातील शेतकरी बोलून दाखवत होते.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि. बीड**

क्र.२०२४/एमएजी/कावि/ १८०२ दिनांक:-२८.१०.२०२४

## जाहीरनामा

सर्व जनता मौजे चिंचोलीमाळी ता. केज यांना जाहीर केले जाते की, चिंचोलीमाळी येथील जन्म पावलेला इसम नामे स्वाती दिलीप गलांडे हिचा जन्म दिनांक ०५/०७/१९८९ रोजी मौजे चिंचोलीमाळी येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्राम पंचायत चिंचोलीमाळी यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे दिलीप रंगनाथ गलांडे यांनी या कार्यालयास दि. १८/१०/२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्राम पंचायत चिंचोलीमाळी यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत चिंचोलीमाळी ता. केज यांना त्यांच्या मुलीचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- स्वाती दिलीप गलांडे हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय चिंचोलीमाळी ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कार्यकारी दंडाधिकारी, केज

# केंद्रात राज्यात महायुतीचे सरकार आहे त्यामुळे विकास कामे थांबू देणार नाही : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २५ नोव्हेंबर**



भोकर विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार अँड श्रीजया चव्हाण यांनी मुदखेड शहरात आभार सभेत बोलताना म्हणाले कि महायुतीच्या कार्यकर्त्यांनी तीन महिन्यापासुन जी मेहनत घेतली आहे त्याबद्दल त्यांचे मनापासुन आभार व शहरातील व तालुक्यातील सर्व मतदारांनी मला भरघोस मतांनी निवडून दिल्याबद्दल त्यांचेही खुप खुप आभार.

यानंतर आभार सभेवेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी सांगितले कि भोकर मतदारसंघाने मला आणि अमिता चव्हाण यांना प्रेम दिलं तसेच माझ्या मुलीला पण भरभरून प्रेम दिलं आहे त्याबद्दल सर्व मतदार बांधव आणि भाजपा पदाधिकारी व महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांचे आभार. यानंतर पुढे बोलताना म्हणाले कि ज्यांनी मला त्रास दिला आहे त्यांचा सुपडासाप झाला आहे. महाराष्ट्राचे नेतृत्व करणार असे म्हणणारेच पराभुत झाले आहेत आणि नाना पटोले, अमित देशमुख यांचा पराभव होता होता विजय झाला आहे. असे खा. अशोक चव्हाण यांनी आभार सभेत बोलताना म्हणाले. महायुतीचे सरकार केंद्रातही आहे आणि राज्यात ही आहे त्यामुळे चिंता करण्याची काही गरज नाही आपल्या भोकर मतदार संघाचा विकास कधीच थथांबू देणार नाही अशी ग्वाही खा.अशोकराव चव्हाण यांनी आभार सभेत बोलताना दिली.

यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे युवा कार्यकर्ते रामसिंग चव्हाण यांच्या वतीने माजी मुख्यमंत्री खा.आशोकराव चव्हाण आणि नवनिर्वाचित आमदार अँड श्रीजयाताई चव्हाण यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी भोकर विधानसभा नवनिर्वाचित आमदार ॲड श्रीजया अशाकराव चव्हाण, माजी आमदार आमर राजुरकर, गोविंदराव शिंदे नागेलीकर, माजी नगरराध्यक्ष नारायणराव कोत्तावार, उत्तम चव्हाण, सुनील शेटे, भिमराव पाटील कल्याणे, प्रविण गायकवाड, बालाजी खटिंग, मारोती किरकण, पप्पू सोनटक्के, रामसिंग चव्हाण, गणेश पा. शिंदे, निलेश देशमुख, शाम चंद्रे, चांदू बोकेफोड, अमोल आबादार,इम्रानसेठ मच्छीवाले, यासह अदिंची उपस्थिती होती.

या आभार सभेचे सुत्रसंचालन संजय कोलते यांनी केले तर आभार संजय आऊलवार यांनी मानले.

# बांधकामाचा कालावधी संपला तरी मरतोळी येथील आरोग्य उप केंद्राचे काम रखडले
## कंत्राटदार, अभियंत्यावर कारवाईसाठी सीईओकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २५ नोव्हेंबर**



तालुक्यातील मरतोळी गावात पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून मंजूर झालेल्या आरोग्य उप केंद्राचे काम रखडल्या प्रकरणी कंत्राटदार व अभियंत्यावर कारवाई करावी यासाठी ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवल यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे. ५ लाख रुपये खर्च करून बांधण्यात येत असलेल्या या उप केंद्राचे काम नांदेड येथील कंत्राटदार उझमा आयेशा सिद्धीकी यांना देण्यात आले आहे. १५ मार्च २०२४ रोजी कामाचे कार्यरंभ आदेश देण्यात आले. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिन्याचा होता. मात्र ७ महिने उलटून गेले तरी ५ टक्के कामही झाले नाही. जे काम झाले तेही अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे.

कंत्राटदार, अभियंते एकदाही कामावर आले नाहीत. सध्या काम ठप्प आहे. या कामाची जबाबदारी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अधिकाऱ्याकडे आहे. केवळ अधिकारी आणि कंत्राटदारांच्या बेजबाबदारपणामुळे गावातील नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागले आहे. या गंभीर विषयाबाबत ग्रामस्थांनी थेट जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनाच निवेदन देऊन कंत्रादार, अभियंते दोषी असल्याने यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. तसेच केंद्राचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे गुणवत्तापूर्ण होण्याच्या दृष्टीने लक्ष घालण्याची आणि श्रीमती करणवाल यांना गावात सुरू असलेल्या या कामाला भेट देण्याची विनंती केली आहे.

संतोष पाटील, बसवंत रामशेट्टे, वैभव पाटील, शंकर रामशेट्टे,दीपक रेड्डी, माधव सुकनाळे, संग्राम मालीपाटील, व्यंकट गिरी, सतीश धाने यांनी निवेदन दिले आहे.

# माणुसकी समुहाच्या आठव्या वर्धापनदिना निमित्ताने राज्यस्तरीय सेवा गौरव पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२५ नोव्हेंबर

सालाबाद याही वर्षी सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्थेच्या व माणुसकी समुहाच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त समाजातील तळागाळातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या दात्यांचा सामाजिक बांधिलकी म्हणून सेवा-गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.यात विषेश पुरस्कारासाठी ११ व्यक्तींना व सामाजिक कार्य,आरोग्य सेवक,महाराष्ट्र पोलीस,आदर्श शिक्षक,क्रीडा,युवा उद्योजक,कृषी भुषण,कवी,भारुडरत्न तथा शाहिर,तथा सामाजिक संस्था,अशा ३१ व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे.तेंव्हा सेवा गौरव पुरस्कारासाठी आपले प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन संस्थेच्या कमीटी मंडळाने केले आहे.सेवा गौरव पुरस्कारांमध्ये सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,एक पुस्तक आणि शाल श्रीफळ,एक वृक्ष देऊन गौरविले जाणार आहे.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी एका दिमाखदार सोहळ्यात शासकीय,अधिकारी व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सेवा गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.तरी महाराष्ट्र राज्यातील आदर्श व्यक्तीमत्वांनी आपले विहीत नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन दि.११ डिसेंबर २०२४ पर्यंत खालील दिलेल्या पत्यावर पाठवावे. प्रस्ताव पाठविल्या नंतरच निवड समिती आपली निवड जाहीर करतील.टिपः पुरस्कारासाठी पाठवलेला प्रस्ताव स्विकारणे अथवा नाकारणे याचा संपूर्ण अधिकार पुरस्कार निवड समितीस आहे.तेंव्हा मी पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवला परंतू मला मिळाला नाही असा वाद घालता येणार नाही.

पत्ता:- समाजसेवक सुमित पंडित संस्थापक अध्यक्ष, सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्था व माणुसकी रुग्ण सेवा समुह शासकीय वैद्यकीय रुग्णलय घाटी छत्रपती संभाजीनगर, प्लॉट क्र. ६०, हरी ओम नगर जटवाडा रोड हर्सुल परिसर ता.जि.छत्रपती संभाजीनगर पिनकोड- ४३१००१, मो.न.०७५८८९२८८२२

प्रस्ताव नमुना(१) संपूर्ण नाव:-(२) जन्म दिनांक:-(३) लिंग. :-(४) संपूर्ण पत्ता. :-(५) मोबाईल क्र. :-(६) कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नाव:-(७)कोणत्या पदावर कार्यरत आहे :-(८)कार्यरत असल्यास पदावरील अनुभव:(९)यापूर्वी मिळालेला विशेष पुरस्कार :-(१०) आपले उल्लेखनीय कार्य सविस्तर लेखी स्वरुपात :-

(वरील नमुन्यात आपली संपूर्ण माहिती पासपोर्ट फोटो सह दिनांक ११ डिसेंबर पूर्वी आमच्या कार्यालयात अथवा उपरोक्त व्हॉटसअप क्रमांकावर पाठवावे.

# सोशल मीडियावर व्हायरल होतेय पोस्ट, बुथनिहाय मतदानात तफावत
## हर्षवर्धन जाधवांनी सोशल मीडियावर व्हिडीओद्वारे केली चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड : नुकतेच कन्नड सोयगाव विधानसभेची निवडणूक पार पडली पण दि.२५ सोमवार रोजी सकाळपासून एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसून आली त्यात कन्नड तालुक्यातील तळनेर येथील बुथ क्रमांक ८० वरील २० नोव्हेंबर रोजी झालेल्या मतदानात तर दि. २३ नोव्हेंबर रोजी निवडणूक निकाल जाहीर होताना बुथ निहाय फेरी मधील मतदानाच्या आकडेवारी मध्ये तफावत आढळल्याचे दिसून आले.अशी पोस्ट दिवसभर सर्व मतदार संघात सोशल मीडिया वर फिरत असल्या मुळे एकच गोंधळ उडाला आहे

त्यामुळे तालुक्यात उलट सुलट चर्चेला सुरुवात होऊन ही माहिती पराभूत झालेले अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांना ही बाब कळली असता ते थेट निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या कार्यालयात पत्रकार व कार्यकर्त्यांसह पोचले यावेळी त्यांनी गोरड यांच्याशी चर्चा करून याचा लेखी खुलासा मागितला. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले की आकडेवारी लिहिताना ( व्हुमन एरर) ऐकण्यात चूक होऊन तळनेर बुथ क्रमांक ८० ऐवजी नेवपुर खा. येथली बूथ क्रमांक ८१ वरील मतदानाची आकडेवारी लिहिण्यात आली

त्यामुळे आकडेवारीची एकूण बेरीज करताना चुक झाली, ही हस्तलिखित आकडेवारी उमेदवारांच्या प्रतिनिधींनीची असून त्या आकडेवारीचा संगणक मधील अद्यावत आकडेवारीचा काही एक संबंध नाही.



**निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी सांगितले की,फॉर्म २० व फॉर्म २१ याची स्वाक्षरीत प्रत अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांना दिली आहे त्यामुळे आकडेवारीत कसलाही गोंधळ नाही सोशल मीडियावर फिरत असलेली पोस्ट चुकीची आहे.**

**अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांनी सांगितले की निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले उमेदवारांचे प्रतिनिधी यांनी लिहिलेली आकडेवारी किंवा मतमोजणी करणारे कर्मचारी यांच्याकडून चूक कशी होऊ शकते त्यामुळे मी निवडणूक आयोग कडे याविषयी तक्रार करून दाद मागणार आहे.**

# राज्य नाट्य स्पर्धा फेरीला गुरुवारपासून सुरवात

नाशिक, २५ नोव्हेंबर : सांस्कृतिक कार्यसंचालनालय आयोजित ६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धे च्या नाशिक केंद्राच्या प्राथमिक फेरीला गुरुवार (ता. २८) पासून प्रारंभ होत आहे. दि. २८ नोव्हेंबर ते २४ डिसेंबरपर्यंत एकूण २७ नाटकांचे सादरीकरण परशुराम सायखेडकर नाट्यगृहात सायंकाळी सातला होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी (ता. २८) सायंकाळी सहाला होईल. सुरवात अंबिका चौक सेवाभावी संस्थेच्या संध्याछाया नाटकाने होणार आहे. प्राथमिक फेरीसाठी एकूण २७ नाटके असल्याने यंदाच्या स्पर्धेत तीन नाटके अंतिम फेरीसाठी निवडली जाणार आहेत.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीमुळे १८ नोव्हेंबरला होणारी स्पर्धा २५ नोव्हेंबरला सुरू होणार होती. तथापि, आता निवडणुकीची रणधुमाळी संपल्यानंतर अखेर स्पर्धे ला गुरवारपासून सुरवात होत आहे. राज्य नाट्य स्पर्धेला यावेळी कलावंत, तंत्रज्ञ तसेच प्रेक्षकांसाठी खास सेल्फी पॉइंट उभारण्यात येणार आहे.

नाटक ही जिवंत कला असल्याने कलावंतांना प्रतिसाद देण्यासाठी प्रेक्षकांची संख्या स्पर्धांना तुरळक बघायला मिळते. प्रेक्षकांनी स्पर्धे तील नाटके पाहण्यासाठी व कलावंतांना दाद देण्यासाठी यावे, त्यासाठी पहिल्यांदाच स्पर्धेच्या ठिकाणी सेल्फी पॉइंट उभारले जाणार आहेत. प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी राज्यातील विविध केंद्रांवर असे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए.क. ५०३ /२०२४

अर्जदार : १. चंपाबाई भ्र. चत्रु घिटरे २. विठठल पि. चत्रु घिटरे, दोघे रा. देवळी ता. गंगापूर ३. शांताबाई भ्र. ज्ञानेश्वर शेलार, रा. वसुसायगाव ता. गंगापूर ४. साखराबाई भ्र. रमेश कोकरे, रा. दायगाव ता. गंगापूर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत कडील चत्रु म्हसु घिटरे यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ चे पती २ ते ४ चे वडील मयत चत्रु म्हसु घिटरे हे. दि. २५/१२/२००८ रांजणगाव पोळ ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. मयत चत्रु म्हसु घिटरे यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदारास शासकिय, निमशासकीय कामासाठी मृत्यूनंतरच्या लाभासाठी हेअरशिप प्रमाणपत्र आवश्यक आहे

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत चत्रु म्हसु घिटरे यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल. पुढील तारीख २१/१२/२०२४

आदेशावरून
सहायक अधिक्षक
न्यायलय गंगापूर ता. गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए.क. ५०७/२०२४

अर्जदार : १. आशाबाई काकासाहेब म्हस्के, वय, ५५ वर्ष, धंदा-घरकाम वः शेती, रा. भेंडाला ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २. भाग्यश्री काकासाहेब म्हस्के, वय २९ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. भेंडाला ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३. रुतिक काकासाहेब म्हस्के, वय. २४ वर्षे, धंदा व शेती, रा. भेंडाला ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत बढीश काकासाहेब भाऊराव म्हस्के यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ चे पती २ व ३ चे वडील मयत काकासाहेब भाऊराव म्हस्के हे. दि. २५/०५/२०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत काकासाहेब भाऊराव म्हस्के यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदारास शासकिय, निमशासकीय कामासाठी मृत्यूनंतरच्या लाभासाठी हेअरशिप प्रमाणपत्र आवश्यक आहे

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत काकासाहेब भाऊराव म्हस्के यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल. पुढील तारीख ०३/०१/२०२५.

आदेशावरून
सहायक अधिक्षक
न्यायलय गंगापूर ता. गंगापूर

## जाहीर प्रगटन

**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ५३१/२०२४

अर्जदार - १. जिजाबाई अंबादास किर्तीशाही रा. मालुंजा खुर्द, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. रूखमण शेषराव मोकळे रा. मालुंजा खुर्द, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ३. शीला मनोहर त्रिभुवन रा. लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ४. शंकुतलाबाई नागसेन बर्वे रा. मालुंजा खुर्द, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत...

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. अमोल रासकर व ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ ते ४ हया मयत कचरू श्रावण साळवे यांच्या मुली आहेत. कचरू श्रावण साळवे हे दिनांक १६/०८/२००१ रोजी मौजे मालुंजा खुर्द, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत कचरू श्रावण साळवे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत कचरू श्रावण साळवे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसावे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत कचरू श्रावण साळवे यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख..१.०. .../०१/२०१५..

आज दिनांक २६/११/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाक्ष्या शिक्यानिशी दिले.

लिपिक
दिवणि म्यार्थलियाचा स्तर गंगापूर

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्राचा कौल विकासालाच : मसालाकिंग डॉ धनंजय दातार



मुंबई : महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला २०० हून अधिक जागा देत निर्विवाद बहुमत दिले आहे. हा निकाल महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी हितकारी आणि उत्साहवर्धक ठरेल, असे एक उद्योजक या नात्याने वाटते. कारण कोणत्याही राज्याची आर्थिक-औद्योगिक प्रगती ही शासकीय धोरणांच्या स्थिरतेवर अवलंबून असते आणि धोरणे स्थिर राहण्यासाठी तेथील राजवट मजबूत असावी लागते. अशा शब्दांत अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स, दुबई, युएई चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ धनंजय दातार यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या. पुढे ते म्हणाले, केंद्रात व महाराष्ट्रात पुढील पाच वर्षे एकाच आघाडीचे, एकविचाराने चालणारे आणि विकासाभिमुख सरकार काम करणार असल्याने आगामी काळात अस्थिर सरकार, तडजोडीचे सरकार किंवा राष्ट्रपती राजवट अशा आव्हानांचा मुकाबला करावा लागणार नाही आणि विकासासाठी केंद्रीय निधीचीही कमतरता भासणार नाही, हे खूप आश्वासक आहे.

महायुतीच्या गेल्या शासनकाळात राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टी मुळे महाराष्ट्रात प्रगतीची व्यापक आणि वेगवान पावले पडलेली दिसली आहेत. त्याच दमदार वाटचालीचा पुढचा टप्पा भविष्यकाळातही कायम राहील. पायाभूत सुविधा विकासाचे अनेक प्रकल्प पूर्ततेच्या टप्प्यात आहेत. त्यातील काही महाराष्ट्राइतकेच देशाच्या भरभराटीसाठीही महत्त्वाचे आहेत. समृद्धी महामार्ग, मेट्रो, बुलेट ट्रेन, नवे रस्ते व रेलमार्ग बांधणी तथा विद्यमान मार्गांचा विस्तार, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित वाढवण बंदर ही त्यापैकी काही उदाहरणे. महाराष्ट्रात गुंतवणूक, वाहतूक, आयात-निर्यात, औद्योगिक विकास यांना पुढील पाच वर्षांत जोरदार चालना मिळेल, ज्याचा परिणाम राज्याची आर्थिक भरभराट होण्यावर होईल. नव्या सरकारला आणि नेतृत्वाला अनेक शुभेच्छा.

# नवीन वर्षात सुरू होणार शिवाजीनगरातील भुयारी मार्ग

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

सातारा, देवळाई, गांधेली, बीडबायपास, शिवाजीनगर, मुकुंदवाडी, बाळापूर आदी भागातील रहिवाशांच्या सोयीसाठी असलेल्या शिवाजीनगर रेल्वे गेट क्र. ५५ येथील भुयारी मार्गासाठी ३८ कोटी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यापैकी रेल्वेने १६ कोटी ३० लाख व राज्य शासनाने २२.५ कोटी रुपये खर्च उचलला आहे. जिल्हाधिकारी, जागतिक बँक, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र मिळाल्यावर हे काम सुरू करण्यात आले होते.

सातारा-देवळाई संघर्षकृती समितीच्या वतीने या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. हे काम सुरू असताना अनेक अडथळे आले. गतवर्षी ऑक्टोबरमध्ये या कामास सुरुवात झाली होती. त्यास एकवर्ष मुदत देण्यात आली होती. पण, कामाची गती पाहता ते वेळेवर पूर्ण होऊ शकले नाही.

शिवाजीनगर भुयारी मार्गासाठी रेल्वेरुळाखाली ५.५० मीटर व ३.५० मी. उंच सिमेंट बॉक्स बसविण्यात आले आहे. संपूर्ण भुयारीमार्गाची लांबी २२.७ मीटर लांब असून, सुरुवातीच्या टप्प्यात २२.७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हे काम सुरू असल्याने शिवाजीनगर ते देवळाई चौक येथील वाहतूक पूर्णपणे बंद आहे.

गत अनेक वर्षांपासून कोंडीत अडकलेल्या या भुयारी मार्गासाठी ड. रुपेश जैस्वाल यांनी याचिका दाखल केली होती. भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाल्यावर या कामास सुरुवात करण्यात आली. भूयारी मार्गाला आवश्यक असणारा २४ मीटर रुंद रस्ता तयार करण्यासाठी सातारा परिसरातील गट नं. १२४ / २ मधील ११.५० हे.आर. चौ.मी. व १३१ गट नं.मधील ५.७८ हे. आर.चौ.मी. याप्रमाणे १२.२८ हे.चौ.मी.जमीनीचे संपादन करण्यात आले होते.

**पादचाऱ्यांची दमछाक**

**खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे सातारा-देवळाई अन् बीड बायपासकरांची दमछाक होत आहे. सातारा-देवळाई भागात मोठी भाजीमंडी, आरोग्याच्या सुविधा व जीवनावश्यक वस्तूंची चांगली सुविधा नसल्याने या भागातील नागरिकांना रेल्वेगेटच्या पलिकडे वाहने लाऊन रूळ ओलांडून शिवाजीनगरात यावे लागते. खड्ड्याच्या किनाऱ्यावरून दोन फुटांच्या रस्त्यावरून चालताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. भुयारी मार्गाच्या कामासाठी जबाबदार रेल्वे, महापालिकेसह महावितरण व जागतिक बँक प्रकल्प शाखा व वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय राखून भुयारी मार्गाच्या कामातील अडथळे दूर करून कामाची गती वाढवावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.**

# सकाळी फिरायला गेलेल्या प्राध्यापकाचा मृत्यू!



तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.२५ नोव्हेंबर - शहरातील दत्त कॉलनी परिसरात राहणारे हतनुर येथील महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक रवींद्र साहेबराव पाटील जाधव वय ३५ वर्ष यांचे ह्रदयविकाराच्या झटक्याने दुखत निधन झाले आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रवींद्र पाटील जाधव हे नेहमीप्रमाणे आपल्या मुलीला पावणे आठच्या सुमारास शाळेत सोडायला जात असत दि.२५ रोजी सुद्धा ते मुलीला शाळेत सोडून हिवरखेडारोडला असलेल्या टेकडीकडे फिरायला गेले होते, त्याच वेळेस त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले, बराच वेळ झाला तरी ते घरी परत न आल्याने सहकारी मित्र,नातेवाईकांनी शोधा शोध सुरू केली,पण ते मिळून न आल्याने हिवरखेडा रोडवर असलेल्या टेकडी जवळ असलेल्या तलावाजवळ त्यांची दुचाकी आढळून आली दुचाकी जवळ जाताच ते बेशुद्धावस्थेत आढळून आल्याने त्यांना खाजगी वाहनात कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले,

वैद्यकीय अधिकारी डॉ.अनिरुद्ध गायकवाड यांनी तपासून मृत घोषित केले,दुपारी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला प्राध्यापक रवींद्र पाटील जाधव यांच्या पश्चात आई,पत्नी,दोन मुली,भाऊ असा परिवार होता. अंधानेर फाट्यावर असलेल्या राजाराम कृषी सेवा केंद्राचे मालक मयूर पाटील जाधव यांचे ते लहान बंधू होते,ते मूळचे जामडी घाट येथील रहिवासी होते कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली आहे. सायंकाळी शोकाकूल वातावरणात देवलोक स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ‘लॉरेन्झो सर्चेस फॉर द मीनिंग ऑफ लाइफ’ला ‘जेसीबी पुरस्कार’ प्रदान

छत्रपती संभाजीनगर : ‘स्पीकिंग टायगर बुक्स’ने प्रकाशित केलेल्या उपमन्यू चॅटर्जी लिखित ‘लॉरेन्झो सर्चेस फॉर द मीनिंग ऑफ लाइफ’ या पुस्तकाला यंदाचा जेसीबी पुरस्कार आणि २५ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर झाले आहे. वल्लभगड येथील ‘जेसीबी इंडिया’च्या मुख्यालयात हा कार्यक्रम पार पडला. ठुकराल आणि तगरा या दिल्लीच्या कलावंतांनी ‘मिरर मेल्टिंग’ या नावाने साकारलेली ही प्रतिष्ठेची ट्रॉफी चॅटर्जी यांना प्रदान केली. ‘जेसीबी’चे चेअरमन लॉर्ड बॅमफोर्ड यांच्या वतीने ‘जेसीबी इंडिया’चे सीईओ आणि एमडी दीपक शेट्टी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ‘भारतीय साहित्याचा गौरव करण्यासाठी लॉर्ड बॅमफोर्ड यांनी जेसीबी पुरस्काराची संकल्पना मांडली होती. गेल्या काही वर्षांत या पुरस्काराने अनेक साहित्यकृतींना गौरविण्यात आले आहे. यंदाचे वर्षही यापेक्षा वेगळे नाही. उपमन्यू चॅटर्जी यांचे मी जेसीबी परिवाराच्या वतीने अभिनंदन करतो,’ असे शेट्टी यांनी नमूद केले. ‘प्रादेशिक भाषांमधील समकालीन भारतीय साहित्यात वाचकांना देण्यासारखे बरेच काही आहे. उच्च दर्जाच्या भाषांतरांना पाठिंबा आणि प्रोत्साहन देण्यासाठी प्रकाशक महत्त्वाची भूमिका बजावतात; जेणेकरून हे साहित्य वाचकांना त्यांच्या आवडीनुसार उपलब्ध होईल. लेखन आणि साहित्य या दोन्हीकडे पाहण्याचा भारताचा विकसित होत असलेला दृष्टिकोन पुढील काळात वाचनाचे आणखी रोमांचक अनुभव देणारा ठरेल,’ असेही शेट्टी म्हणाले.

# १७ साखर कारखान्यांच्या गाळपास प्रारंभ; विभागात १५ पासून हंगाम सुरू

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर विभागाअंतर्गत सहा जिल्ह्यांतील एकूण १७ कारखान्यांना ऊस गाळप हंगाम २०२४-२५ या वर्षासाठी गाळप परवाना देण्यात आला आहे. चार कारखान्यांना त्रुटींची पूर्तता न केल्याने गाळप परवाना अद्याप देण्यात आला नसल्याची माहिती विभागाचे साखर सहसंचालक एस. एस. स्वामी यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली.

सहसंचालक स्वामी यांनी सांगितले, छत्रपती संभाजीनगर विभागाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह नंदूरबार, जळगाव, धुळे, बीड आणि जालना हे सहा जिल्हे येतात. या सहा जिल्ह्यांत जवळपास कारखान्यांची संख्या ४१ वर आहे. परंतु, यातील काही कारखाने अवसायानात गेलेले आहेत. काही कारखान्यांची नोंदणी रद्द झालेली असून बहुतांश कारखाने बंद अवस्थेत आहेत. उर्वरित सुरू असलेल्या १७ कारखान्यांना यंदाच्या गाळप हंगामासाठी परवाने देण्यात आले आहेत.


**सर्वाधिक कारखाने बीडमध्ये**

मराठवाडा हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. त्यापैकी बीड जिल्ह्यात दुष्काळ अधिक असतो. २०१७-१८ मध्ये या जिल्ह्यात चारा, पाण्याअभावी जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्या लागल्या होत्या. असे असले तरी सर्वांत जास्त सहकारी कारखाने हे एकट्या बीड जिल्ह्यात असल्याची साखर आयुक्तालयाची आकडेवारीवरून दिसून येते. बीड जिल्ह्यात तब्बल पाच सहकारी साखर कारखाने आहेत, असेही स्वामी यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर विभागात २१ पैकी तब्बल ११ कारखाने हे सहकारी तत्त्वावरील असून, १० खासगी कारखाने असल्याचे स्वामी यांनी सांगितले.

**...यांना नाकारला परवाना**

**यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपासून प्रारंभ झाला आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर विभागातील २१ कारखान्यांपैकी साखर आयुक्त कार्यालयाने २१ नोव्हेंबर अखेर १७ कारखान्यांना गाळपासाठी परवानगी देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथील सचिन घायाळ शुगर, पैठण तालुक्यातील विहामांडवा येथील रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखाना, माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील सोनाजीनगर छत्रपती सहकारी साखर कारखानर आणि खुलताबाद येथील घृष्णेश्वर साखर कारखाना या चार कारखान्यांना अद्याप परवानगी देण्यात आली नसल्याचे छत्रपती संभाजीनगर विभागाचे प्रादेशिक कृषी सहसंचालक स्वामी म्हणाले.**

# जिल्हास्तरीय कराटे व किक बॉक्सींगमध्ये पवन घुगे जिल्ह्यात प्रथम



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २५ नोव्हेंबर : छत्रपती संभाजीनगर जिल्हा स्पर्धेमध्ये यशोधन पवन घुगे प्रथम दि २१ नोव्हेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुल गारखेडा परिसर येथे आयोजित झालेल्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व जिल्हा क्रीडा परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित झालेल्या शालेय जिल्हास्तरीय कराटे व किकबॉक्सिंग स्पर्धेत यशोधन पवन घुगे याने वजन गट ३५ किलो वय वर्ष १७ वर्षाखालील वजन गटात फाईट (कुमिते ) या प्रकारामध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळून विजय प्राप्त केला आहे तसेच यशोधन घुगेची परभणी जिल्ह्यात पुढील होणाऱ्या विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या विजया बद्दल ब्लू व्हॅली शाळेच्या मुख्याध्यापिका सविता तोतला,शाळेचे संथापक सतिश तोतला ,क्रीडा शिक्षक पवन घुगे,व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका,कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२५ नोव्हेंबर - सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्त कन्नड शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. शहरातील बाळासाहेब पवार चौक, सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, शिवाजी महाविद्यालय, सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळा,बाळासाहेब पवार वाचनालय येथे लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

बाळासाहेब पवार चौकात संपन्न झालेल्या कार्यक्रमात नामदेवराव लवांदे, रामराव काळे, माणिकराव करवंदे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, बाळासाहेब जहागीरदार, प्रा. बाळासाहेब जाधव, रायभान दापके, सुलतान भाईजी, कौतिकराव पवार,वाल्मिक लोखंडे, प्रकाश गर्जे, शाम महाले, राम पवार, नंदकुमार शेजवळ, उपप्राचार्य भाऊसाहेब मगर, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, गौतळा व्हॅली स्कुलचे प्राचार्य मुख्याध्यापक संजय जाधव, मुख्याध्यापक आर. एल. पाटील, मुख्याध्यापक मुक्तानंद गोस्वामी, विलास पवार, बाबुलाल काळे, रामराव करवंदे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, शिक्षक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# एमजीएममध्ये तीन दिवसीय योग कार्यशाळा संपन्न

## ‘योगा फॉर हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट’ विषयावर मान्यवरांनी साधला संवाद



छत्रपती संभाजीनगर, दि.२५ : एमजीएम विद्यापीठाच्या मानव संसाधन विभागाच्या वतीने एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय ‘योगा फॉर हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट’ या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन एमजीएम विद्यापीठाच्या मानव संसाधन विभागाच्या संचालिका डॉ. टीना सहारन यांच्या हस्ते करण्यात आले.

मानव संसाधन विभागाच्या पुढाकाराने आणि योग विज्ञान विभाग एमजीएम विद्यापीठाच्या सहकार्याने तीन दिवसीय कार्यशाळेमध्ये विविध विभागातील सुमारे ३५० कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. योग विज्ञान विभाग प्रमुख गंगाप्रसाद खरात (गुरुजी) यांनी दवाखान्यातील विविध कामाच्या पद्धतीमुळे येणारा शारीरिक आणि मानसिक थकवा घालवण्यासाठी वक्रासन, योगमुद्रासन, वृक्षासन, ताडासन, मार्जरासन, त्रिकोणासन, सूर्यनमस्कार, हाताचे आणि पायाचे वेगवेगळे सूक्ष्म व्यायाम तसेच कपालभाती, अनुलोम-विलोम आणि भ्रामरी प्राणायाम यासोबत ध्यान आणि हास्यासन व संकल्प मंत्र घेऊन आपल्या सत्राचा समारोप केला. अशा पद्धतीने तीन दिवस योग अभ्यासक्रम घेऊन कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह आणि नेहमी मानसिकरित्या संतुलित राहण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानव संसाधन प्रशिक्षण प्रमुख प्रशांत साखरे यांनी केले तर आभार प्रदर्शन लक्ष्मीकांत पांचाळ यांनी केले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रुग्णालयाचे मानव संसाधन प्रमुख सुशांत कुलकर्णी, शिवाजी भालेराव,सोमनाथ निकम, विष्णू ताकधुणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पैठण येथील ऐतिहासिक तीर्थ खांबस्थळी 'नादब्रह्म पांडुरंग'

## राष्ट्रीय वारसा सप्ताहनिमित्त आयोजन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

दरवर्षी १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रीय वारसा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. राज्य पुरातत्व विभागाच्या वतीने जनजागृती, छायाचित्र प्रदर्शन, हेरीटेज वॉक, व्याख्याने आदी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन विभागात विविध ठिकाणी करण्यात येते. उद्या, सोमवार २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. तीर्थखांब, नाग घाटाजवळ, पैठण येथे कार्यक्रम होणार आहे.

या राष्ट्रीय वारसा सप्ताहाचा शेवट पैठण येथील प्राचीन तीर्थखांब येथे होणार आहे. शांतिब्रह्म एकनाथ महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या या भूमित 'नादब्रह्म पांडुरंग' हा भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात वर्षा जोशी, वैभव पांडे, रोहन गावडे (गायन), शांतिभूषण देशपांडे (संवादिनी), प्रबोध जोशी (व्हायोलीन), गजानन धुमाळ (तबला), गोपाळ खोमणे (पखवाज), श्रीकांत उमरीकर (बोलवाद्य) हे कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रम सर्व वारसाप्रेमींसाठी खुला असून, रसिकांनी हजेरी लावण्याचे आवाहन राज्य पुरातत्व विभाग, देवगिरी संगीत प्रतिष्ठान यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# पशुगणनेस प्रारंभ; २५६ प्रगणकांची नेमणूक

छत्रपती संभाजीनगर,दि.२५(जिमाका)- २१ वा पशुगणना कार्यक्रम दि.२५नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान राबविण्यात येणार आहे. या कालावधीत आपल्याकडे पशुगणनेसाठी येणाऱ्या प्रगणकास वस्तुनिष्ठ माहिती द्यावी,असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त डॉ. नानासाहेब कदम यांनी केले आहे.

पशुसंवर्धन विभागात दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच ही मोहिम राबवली जाते. मागील २० वी पशुगणना २०१९ मध्ये झाली होती. पशुगणनेचा हा कालावधी चार महिन्यांचा असून ग्रामीण भागात तीन हजार कुटुंबामागे एका प्रगणकाची व शहरी भागात चार हजार कुटुंबामागे एक असे जिल्ह्यात एकूण २५६ प्रगणकांची व ४९ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. या सर्व प्रगणकांना प्रशिक्षण देऊन त्यांचे लॉग इन आयडी पासवर्ड तयार करण्यात आले आहेत. पशुगणना ऑन लाईन मोबाईल प द्वारे करण्यात येणार आहे.

या मोहिमेत गायवर्ग, म्हैस वर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांची गणना केली जाणार आहे. पशुगणनेमुळे पशुसंवर्धन विभागाला योजनांची अंमलबजावणी करणे, निधीची उपलब्धता करणे सोयीचे ठरणार आहे.त्यानुसार शासनाकडून धोरण योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते. पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे. त्यानुसार लसीकरणासाठी लस व औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे आपल्याकडील जनावरांची वस्तुनिष्ठ माहिती पशुपालकांनी द्यावी, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम यांनी केले.

# सोमवार (दि.२ डिसेंबर रोजी) लोकशाही दिन

छत्रपती संभाजीनगर,दि.२५(जिमाका)- दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. डिसेंबर महिन्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. २ रोजी आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. २ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपल्या तक्रारी अर्जांचे निवेदने, अर्ज सकाळी ११ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. वैयक्तिक तक्रार असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणावी,अशी सुचना देण्यात आली आहे. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# शंकर महादेवन, महेश काळे आणि राहुल देशपांडे या संगीतातील तीन उस्तादांच वंदन हो हे गीत प्रेक्षकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर - संगीत नाटके हा मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ मानला जातो आणि हीच परंपरा जपत, संगीत मानापमान या अजरामर नाटकावरून प्रेरीत लवकरच प्रदर्शित होणाऱ्या संगीत मानापमान या सिनेमाच्या माध्यमातून मराठी प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव पडद्यावर पहायला मिळणार आहे. नुकताच या सिनेमाचा एक अप्रतिम टिझर रोहित शेट्टीच्या सिंघम अगेन या सिनेमासोबत रिलीज झाला होता ज्याला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. 'संगीत मानापमान' ह्या चित्रपटावरूनच यात संगीताची मजेशीर मेजवानी असल्याचं लक्षात येत. आणि याचीच सुरवात आज चित्रपटाच्या पहिल्या वंदन हो गाण्याने झाली.

कट्यार काळजात घुसली नंतर पुन्हा एकदा प्रेक्षकांना संगीत विश्वातील दिग्गज संगीतकार शंकर महादेवन, गायक महेश काळे आणि राहुल देशपांडे यांचा आवाजातील तिहेरी संगम अनुभवायला मिळणार आहे. या आधीही ही सुप्रसिद्ध तिकडी एकत्र येऊन गायली होती परंतु चित्रपटातील गाण्यासाठी एकत्र येण्याची ही पहिलीच वेळ आहे. हल्लीच चित्रपटातील पहिल्या गाण्यासाठी शंकर महादेवन, महेश काळे आणि राहुल देशपांडे यांनी मुंबईतील एका स्टुडिओत वंदन हो हे गाणं शूट केलंय. उत्तम संगीत आणि गीतकार हयामुळे सेट वर किती प्रसन्न वातावरण होतं हे नुकताच सेट वरून वायरल झालेल्या व्हिडिओ मध्ये तूम्ही पहिलंच असेल. आज वंदन हो गाण्याने सुरवात करुन चित्रपट निर्मात्यांनी नक्कीच कलेला केलेले एक सांगीतिक वंदन आहे. मंत्रमुग्ध करणारं साउंडट्रॅक वंदन हो वैविध्यपूर्ण संगीत शैलींचा कळस आणि परंपरेचा मिश्रण असलेलं हे गाणं चाहत्यांच्या नक्कीच पसंतीस उतरेल याची खात्री आहे.

# कामगारांच्या दुचाकी रस्त्यावर पार्किंग; कारखादारांकडून नियमांचे सर्रास उल्लंघन



त.भा. दि. २५,

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गेल्या काही वर्षांपासून अनेक कारखानदार रस्त्याच्या कडेला असलेल्या जागेवर कब्जा करून, त्यावर अवैधरित्या वाहन पार्किंग बनवत आहेत. ते कमी पडते म्हणून सर्रासपणे रस्त्याच्या फुटपाथवरच वाहन पार्किंग बनविण्यास सुरुवात केली आहे, त्यामुळे अनेक ठिकाणी अपघात होऊन नागरिक व कामगारांचा नाहक बळी जात आहेत. याकडे एमआयडीसी प्रशासन व पोलिस प्रशासनाने लक्ष देऊन अशा कारखानदारांना दंड आकारण्यात यावा, अशी मागणी कामगार व जनसामान्यांतून होत आहे.

वाळूज औद्योगिक परिसरातील कारखानदार एमआयडीसीने ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करीत आहेत. दुचाकी पार्विंगच्या जागेवर बांधकाम करून त्याठिकाणी उत्पादन घेणार्या मशीनरी बसविल्या आहेत. तसेच कारखान्याच्या भिंतीलगत असलेल्या जागेवर झाडे लावण्याऐवजी त्याठिकाणी दुचाकी वाहन पार्किंग अड्डा बनविण्याचा प्रकार सुरू असून याकडे एमआयडीसी प्रशासन मात्र कानाडोळा करीत आहेत. हा प्रकार दिवसेंदिवस वाढतच चालला असून, या कारखानदारांच्या मनमानीमुळे नागरिकांना व कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहेत. रस्त्यावर पार्किंग केलेल्या दुचाकींमुळे अनेक ठिकाणी गंभीर स्वरुपाचा अपघात होऊन नागरिकांना नाहक जीव गमवावा लागत आहे. पाच दिवसांपूर्वी जोगेश्वरीकडे जाणार्या एका मोटारसायकल स्वाराचा गंभीर अपघात होऊन त्याला जीव गमवावा लागला. त्याला जबाबदार कोण? त्यांच्या उघड्या पडलेल्या संसाराला जबाबदार कोण? असे एक ना अनेक प्रश्न या निमित्ताने उभे राहत असून, याकडे पोलिस प्रशासन व एमआयडीसी प्रशासनाने गांभिर्याने लक्ष देऊन वेळीच कठोर पावली उचलावीत, अन्यथा नाहक कामगार व सामान्या नागरिकांचा दररोज बळी गेल्याशिवाय राहणार नाही.

मी गेल्या कित्येक वर्षांपासून एमआयडीसीमध्ये कामाला आहे. अगोदर आमची दुचाकी पार्किंगची व्यवस्था कारखान्याच्या गेटच्या आत सेक्युरिटीच्या देखरेखीखाली असायची परंतु आता दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी करावी लागत आहे. काम संपल्यावर दुचाकी जागेवर मिळेल की नाही याची शाश्वती नसते. परंतु पोट भरण्यासाठी कारखान्याचे ऐकावे लागते.असे एका कामगाराने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

**कठोर कारवाई करू**

**एमआयडीसीच्या वतीने ठरवून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करू या अटीवर कारखानदारांना कारखाना सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु काही कारखानदार नियमांचे उल्लंघन करताना दिसून येत असून, अशा कारखानदारांवर कठोर कारवाई करू. जे कारखानदार गेटच्या बाहेर वाहने पार्कींग करतात अशा कारखानदारांना वाहनांची पार्विंग गेटच्या आत करण्यास सूचना दिली जाईल.**

**-गणेश मुळीकर**
**सहाय्यक अभियंता एमआयडीसी**

**मी काम करण्यासाठी कारखान्यात गेलो ड्युटी संपल्यावर जेव्हा बाहेर आलो तेव्हा पार्विंगच्या ठिकाणी माझी दुचाकी नव्हती. इकडे तिकडे शोधा-शोध केल्यावर अखेर पोलिस ठाण्यात धाव घ्यावी लागली. गुन्हा तर दाखल केला परंतु आता माझी येण्या-जाण्याची गैरसोय होत आहे. या सर्व प्रकाराला जबाबदार कोण याचे उत्तर मला अजून मिळाले नाही.**

**- पीडित कामगार**

## अग्रलेख...

# जनादेशाचा अपमान करू नका

२०१९ साली भारतीय जनता पार्टीसोबत युती करून निवडणुका लढल्या, सभांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मदत घेतली, प्रत्येक सभेत मोदी आणि अमित शाह यांनी देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आहेत, हे स्पष्टपणे सांगितले. असे असतानाही प्रत्यक्ष निवडणूक निकाल लागल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबत न राहता जनतेने नाकारलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी केली. महाराष्ट्रातील जनता हे विसरलेली नाही. खरे तर हा जनादेशाचा अनादर होता. मतदारांनी भाजपा-शिवसेना युतीला कौल दिला होता. भाजपाला १०५ आणि शिवसेनेला ५६ जागा मतदारांनी दिल्या होत्या. या युतीने २८८ पैकी १६१ जागा पदरात पाडून घेत निर्विवाद बहुमत मिळविले होते. मात्र, उद्धव ठाकरे यांनी बंद खोलीत झालेल्या चर्चेचा दाखला देत मुख्यमंत्रिपद मागितले आणि त्याआधारे भाजपाला अक्षरशः ब्लॅकमेल केले. भाजपाच्या कोणत्याही नेत्यांचे फोन उद्धव ठाकरे उचलत नव्हते. मातोश्रीकडून भाजपाला प्रतिसादच मिळत नव्हता. ही बाब देवेंद्र फडणवीस यांनी नंतरच्या काळात जाहीरपणे सांगितलीही होती. भाजपाला दूर सारत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या साथीने उद्धव ठाकरे यांनी सरकार स्थापन केले आणि स्वतः मुख्यमंत्री होत पोराला कॅबिनेट मंत्री केले. मतदारांनी जो कौल दिला होता, त्याचा अपमान उद्धव यांनी केला होता. ते अडीच वर्षे मुख्यमंत्री राहिले. बहुतांश काळ त्यांनी घरी राहूनच राज्यकारभार केला. मंत्रालयात ते मोजक्याच वेळ गेले. फेसबुक लाईव्ह करून त्यांनी जनतेशी संवाद साधल्यामुळे त्यांच्यावर सातत्याने फेसबुक मुख्यमंत्री म्हणून टीकाही झाली. इच्छा नसतानाही सर्व आमदार त्यांच्यासोबत जरूर गेले होते. पण, काँग्रेस आणि राकाँसोबत त्यांचा जीव गुदमरत होता. ज्या एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करू असे आश्वासन उद्धव यांनी दिले होते, ते शिंदे तर फारच अस्वस्थ होते. त्यांना हिंदुत्वाचा मार्ग सोडायचा नव्हता. त्यामुळे अस्वस्थतेतूनच त्यांनी ठाकरेंना फारकत देत भाजपासोबत जाऊन सरकार स्थापन केले. त्यांच्या नेतृत्वातील सरकारला यशस्वी अडीच वर्षे पूर्ण झाली असतानाच राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्यात आणि या निवडणुकांमध्ये जो प्रचंड जनादेश महायुतीला म्हणजेच भाजपा-शिंदेंची शिवसेना-अजित पवार यांच्या महायुतीला मिळाला, तो नाकारण्याचे करंटेपण राज्यातील विरोधकांकडून, विशेषतः उद्धव ठाकरे यांच्याकडून दाखविले जात आहे. महाराष्ट्रातल्या जनतेने महायुतीच्या पारड्यात भरघोस मते टाकली असताना हा निकाल मान्य न करण्याचा करंटेपणा ठाकरेंकडून केला जात आहे. खरे तर हा जनमताचा अनादर आहे. लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला होता आणि महाविकास आघाडीला भरघोस जागा मिळाल्या होत्या तेव्हा भाजपा वा शिंदेंनी तर नाराजी व्यक्त केली नव्हती. पराभव स्वीकारून या दोन्ही पक्षांनी आत्मचिंतन केले होते. त्यातून धडा घेत झालेल्या चुका दुरुस्त केल्या आणि महायुती विधानसभेच्या निवडणुकीला सामोरी गेली. अडीच वर्षांत महायुतीच्या सरकारने केलेल्या कामांना पसंती देत आणि सरकारच्या कामगिरीवर विश्वास ठेवत मतदारांनी पुन्हा एकदा महायुतीला महाकौल दिला. हा कौल मान्य न करता, झालेल्या पराभवाबाबत आत्मचिंतन न करता निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यातच उद्धव ठाकरे, त्यांचे विश्वप्रवक्ते संजय राऊत धन्यता मानत असतील तर त्यांचे जे शिल्लक अस्तित्व आहे, तेही संपुष्टात येईल. आज त्यांचे जे २० आमदार निवडून आले आहेत, त्यातील आदित्य ठाकरे आणि वरुण सरदेसाई हे दोन सोडले तर इतर १८ आमदार संपूर्ण पाच वर्षे सोबत राहतील काय, याचा विचार उद्धव यांनी करायला नको? रडीचा डाव खेळण्यापेक्षा निवडणुकीत प्रचार करताना ज्या आक्रमकपणे तुम्ही टीका करीत होतात, त्याच आक्रमकपणे पराभवाला सामोरे जात जनादेश नम्रपणे स्वीकारण्याचे औदार्य दाखविणे आवश्यक आहे. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर विश्वप्रवक्ते ज्या पद्धतीने प्रतिक्रिया देत होते, ती पद्धत लक्षात घेतली तर लोकशाहीवर आणि संविधानावर त्यांचा विश्वास नसल्याचेच प्रतीत होत होते. शनिवारी सायंकाळी उद्धव ठाकरे यांनी घेतलेली पत्रकार परिषद निरर्थक होती. अतिशय बालिशपणे ते मुद्दे मांडत होते. राज्यातल्या जनतेने जो कौल दिला, त्याचा स्वीकार करत कुठे चुका झाल्यात, याचा आम्ही विचार करू, त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न करू असे सांगत महायुतीचे अभिनंदन केले असते तर उद्धव ठाकरे यांच्या मनाचा मोठेपणा दिसला असता. त्यांच्या ठायी राजकीय परिपक्वता आहे, हेही राज्याला दिसले असते. ते स्वतःला मर्द गडी म्हणत असतात. तो मर्दपणाही दिसला असता. पण, असे काही करण्याऐवजी त्यांनी ईव्हीएमवर आक्षेप घेतला. पंतप्रधान मोदी आणि शाह यांच्यावर टीका केली. पत्रकार परिषदेत त्यांनी एक अतिशय बालिश प्रश्न केला. जो निकाल लागला आहे, तो मतदारांना मान्य आहे काय, हा अतिशय हास्यास्पद प्रश्न त्यांनी केला. अहो, उद्धव ठाकरे मतदारांना मान्य होता, म्हणूनच त्यांनी महायुतीला कौल दिला. तुम्ही स्वतः मतदान केले, तुम्ही जे बटण दाबले तिथेच तुमचे मत गेले, याची तुम्ही खात्री केली होतीच ना? तशीच खात्री प्रत्येक मतदाराने केली. त्यामुळे महायुतीला जिंकवण्यात ईव्हीएमचे वेगळे योगदान असण्याचा प्रश्न येतोच कुठे? पराभव मान्य करायचे सोडून कशाला जनमताचा अपमान करताहात? एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत शिवसेना सोडून गेलेल्यांना तुम्ही सातत्याने गद्दार म्हणत आला आहात; ती बाब जनतेला पसंत पडलीच नव्हती मुळात. कारण, शिंदेंच्या आधी तुम्ही आणि तुमच्या पक्षाने जनमताशी गद्दारी केली होती. भाजपासोबत राहण्यासाठी तुम्हाला कौल मिळाला होता. तुम्ही काय केलंत? तुम्ही तो अमान्य करत मतदारांनी नाकारलेल्या शरद पवारांसोबत गेलात, ज्यांना तुमचे पिताश्री शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही कायम विरोध केला होता. तुम्ही तुमच्या पित्याने दाखविलेल्या मार्गावरून न चालता वेगळी वाट धरली. तेव्हा आपण जनमताशी गद्दारी करतो आहोत, असे एकदाही तुम्हाला का वाटले नाही? कारण, तुम्ही भाजपाचा, विशेषतः देवेंद्र फडणवीस यांचा सूड उगवण्याच्या नादात आंधळे झाला होतात. सूडाने तुम्ही एवढे पेटून उठला होतात की, आपण जनादेशाचा अनादर करतो आहोत, मतदारांच्या पाठीत खंजीर खुपसतो आहोत, याचेही भान तुम्हाला राहिले नाही. ही बाब तर तुम्ही अमान्य करूच शकत नाही आणि तुम्ही कितीही अमान्य केलीत तरी जनता सर्व काही उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. दूध पिताना मांजर डोळे मिटून घेते, याचा अर्थ इतरांना तुमची चोरी दिसत नाही, असे नाही. त्यामुळे तुम्ही ज्या चुका करता आहात त्याकडे जनतेचे लक्ष आहे. मतदारांनी महायुतीला कौल दिला आहे, त्यावर शंका घेऊन तुम्ही मतदारांचा अपमान करत आहात. लोकशाहीने दिलेला अधिकार त्यांनी वापरला, महायुतीला कौल दिला, तो तुम्ही स्वीकारला पाहिजे. ईव्हीएमच्या नावाने, निवडणूक आयोगाच्या नावाने विनाकारण थयथयाट करून स्वतःच्या निराशेचे असे किळसवाणे प्रदर्शन करू नका. तुम्ही ज्याप्रकारे निकालांवर शंका घेत आहात, तो प्रकार बघता तुमचा डॉ. बाबासाहेबांच्या संविधानावर विश्वास नाही असाच होतो. त्यामुळे भाजपा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना संविधानाचे दाखले देण्याचे थांबवून आधी तुम्ही संविधान आत्मसात करा. जनता पुढल्या वेळी तुम्हाला कौल देईल. पण, हे करायचे सोडून तुम्ही निरर्थक टीका करण्यातच वेळ घालवणार असाल तर मतदार तुम्हाला पुढेही स्वीकारणार नाही. शरद पवार यांच्या चिथावणीला बळी पडून तुम्ही गेल्यावेळी जनादेशाशी गद्दारी केली होती, त्यासाठी माफी मागा. ज्या पवारांसोबत तुम्ही गेला होतात, त्या पवारांचे जे १० आमदार आज निवडून आले आहेत, त्यापैकी अनेक जण आज अजित पवारांच्या संपर्कात आहेत, हे लक्षात घ्या. अन्यथा, तुमच्या २० पैकी अनेक जण पुन्हा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जातील, हेही लक्षात ठेवा.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मणिपूर पुन्हा भडकले!

संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत असून, यात वादग्रस्त वक्फ विधेयकासह १४ विधेयके मांडण्याची तयारी सरकारने केली आहे. दुसरीकडे सरकार व विरोधक यांच्यातील संघर्ष या अधिवेशनात वाढलेला दिसण्याची चिन्हे आहेत. मणिपूरमधील बिघडलेली स्थिती हे त्याचे कारण राहणार आहे. मणिपूरमधील स्थिती काहीशी निवळली होती. पण, अचानक मैतेई व कुकी या दोन समाजांमधील संघर्ष पुन्हा उफाळून आला आणि राज्याच्या काही भागांत कमालीचा तणाव निर्माण झाला.

**७ नोव्हेंबरची घटना :** मणिपूरमधील ताजा हिंसाचार ७ नोव्हेंबरच्या एका घटनेनंतर सुरू झाला. जिरिबाम जिल्ह्यातील एका खेड्यात सहा मृतदेह सापडले. यात काही लहान मुले होती. कुकी युवकांनी त्यांचे अपहरण करून नंतर त्यांना ठार केले होते. याची प्रतिक्रिया मैतेई समाजातून उमटणार होतीच. मैतेईंच्या एका गटाने झैरावन खेड्यावर हल्ला चढवीत काही महिलांवर बलात्कार करून नंतर त्यांची हत्या केली. यातून संघर्ष भडकला.

**११ नोव्हेंबर :** केंद्रीय राखीव पोलिस दल मैतेईंच्या बाजूने आहे, असे वाटल्याने कुकी बंडखोरांनी ११ नोव्हेंबर रोजी केंद्रीय राखीव पोलिसांवर हल्ला चढविला. यावेळी झालेल्या चकमकीत १० कुकी युवक ठार झाले. हा हल्ला करणारे कुकी युवक राज्याच्या दूरवरून आले होते. केंद्रीय पोलिसांसोबत झालेली ही चकमक जवळपास १० मिनिटे चालली होती. ठार झालेले युवक कुकी बंडखोर होते, असा दावा सरकारकडून केला जात आहे.

**शवपेटिका मोर्चा :** कुकी समाजाच्या या १० युवकांचे पार्थिव देह अद्याप स्थानिक रुग्णालयाच्या शवागारात असून, त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० शवपेटिका असलेला एक मोर्चा काढण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी काळे शर्ट घालून या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन कुकी समाजाने केले होते. या सर्व युवकांचा शवचिकित्सा अहवाल यांच्या कुटुंबीयांना दिला जाईपर्यंत त्यांचा अंत्यविधी न करण्याचा निर्णय कुकी समाजाने घेतला आहे. याऐवजी शवपेटिका मोर्चा काढण्यात येत आहे. त्यानुसार राज्याच्या काही भागांत असे मोर्चे काढण्यात आले. याने राज्यात पुन्हा तणाव निर्माण झाला असल्याचे समजते.

**खोरे विरुद्ध पर्वतीय भाग :** मणिपूरमधील या वादाने राज्यात भौगोलिक सीमाही तयार झाल्या आहेत. राजधानी इम्फाळ भागातील मैतेई विरुद्ध पर्वतीय भागातील कुकी असे या संघर्षाचे स्वरूप तयार झाले आहे. मैतेई विरुद्ध कुकी हे विभाजन वा ध्रुवीकरण अतिशय खोलवर झाले असल्याचे दिसून येत आहे. या दोन समाजांत निर्माण झालेली दरी बुजविण्यासाठी राज्य सरकार वा केंद्र सरकार यांना ठोस उपाययोजना करावी लागेल, असे आता मानले जात आहे.



राज्य सरकारला एका समाजाचा समर्थक मानले जात असल्याने केंद्र सरकारलाच यात पुढाकार घेऊन काही पावले उचलावी लागतील, असेही म्हटले जात आहे. विशेष म्हणजे मैतेई विरुद्ध कुकी या वादाने पक्षाच्या सीमारेषा केव्हाच ओलांडल्या आहेत.

**सरकार स्थिर :** राज्यातील कोनराड संगमा यांच्या पक्षाने मणिपूर सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली आहे. ६० सदस्यांच्या राज्य विधानसभेत बिरेन सिंग सरकारजवळ ३८ सदस्यांचा पाठिंबा असून काही सदस्यांनी सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली असली, तरी त्याचा सरकारच्या स्थिरतेवर कोणताही परिणाम होणार नाही, असा दावा सरकारी गोटातून केला जात आहे. या साऱ्याचे पडसाद संसद अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे.

**तातडीने कारवाई :** मणिपूरमध्ये तणाव निर्माण होताच केंद्र सरकारने याची दखल घेत राज्यात निमलष्करी दलाच्या जवळपास ५० कंपन्या म्हणजे ५००० जवान पाठविले असून, त्यांनी राज्यातील स्थिती नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना सुरू केली आहे. मात्र, याचा फारसा सकारात्मक परिणाम राज्यात दिसून आलेला नाही. परिस्थिती जैसे थे असल्याचे समजते. मणिपूरमधील स्थितीबाबत केंद्रीय गृहमंत्रालयात बैठकी होत असून, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या महासंचालकांना तेथे पाठविण्यात आले आहे. राज्यातील स्थितीचा अंदाज घेण्यास त्यांना सांगण्यात आले असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गृहमंत्रालय यासंदर्भात पुढील कारवाई करील असे समजते. मणिपूरबाबत मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसने दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत. गृहमंत्री अमित शाह यांनी राजीनामा द्यावा व पंतप्रधानांनी मणिपूरला भेट द्यावी या त्या दोन मागण्या असून, या मागण्या राजकीय असल्याने त्याला केंद्र सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळण्याची चिन्हे नाहीत.

**दिल्लीतील धमाका :** नववर्षाच्या पहिल्या तिमाहीत राजधानी दिल्लीत विधानसभा निवडणूक होत असून केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला मोठा धक्का देत दिल्ली सरकारचे एक मंत्री कैलास गहलोत यांनी मंत्रिपदाचा व आपचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. गहलोत हे केजरीवाल यांचे विश्वासू होते. मात्र, मनीष सिसोदिया यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याकडे असलेले अनेक विभाग केजरीवाल यांनी विद्यमान मुख्यमंत्री आतिशी सिंग यांच्याकडे सोपविल्यानंतर गहलोत नाराज झाले आणि आतिशी सिंग यांना मुख्यमंत्री करण्यात आल्यानंतर तर गहलोत यांची नाराजी अधिकच वाढली. दिल्ली सरकारच्या कामकाजात आपल्याला सातत्याने डावलले जात आहे, अशी भावना त्यांच्या मनात तयार झाली आणि याचेच पर्यवसान गहलोत यांनी सरकार व पक्ष सोडण्यात झाले. गहलोत यांचा राजीनामा सीबीआय व प्रवर्तन निदेशालयाच्या दबावाखाली झाला असल्याचे आपमधून सांगितले जात असले, तरी त्यात काहीही तथ्य नाही. गहलोत स्वतःला तिसऱ्या क्रमांकाचे मंत्री व नेता समजत होते. केजरीवाल-सिसोदिया तिहारमध्ये गेल्यानंतर मुख्यमंत्रिपदी आपली वर्णी लागेल, असे त्यांना वाटत होते. ते झाले नाही. त्यांनी राजीनामा दिला, असे आपच्याच एका नेत्याने सांगितले आहे.

**जाट चेहरा :** गहलोत हे प्रभावशाली मानल्या जाणाऱ्या जाट समाजाचे आहेत. ते आपचा जाट चेहरा होते. अण्णा हजारे आंदोलनापासून ते आपशी जुळलेले होते. त्यांचा राजीनामा आम आदमी पक्ष व केजरीवाल यांच्यासाठी एक मोठा धक्का मानला जातो. पक्षाने विधानसभा निवडणुकीची तयारी चालविली असता हा धक्का बसल्याने आपमध्ये काहीशी चिंता निर्माण झाली आहे. येणाऱ्या काळात राजधानीत आम आदमी पक्ष व भाजपात आयाराम-गयारामचे राजकारण सुरू होईल असे दिसते. भाजपाच्याही एका आमदाराने आम आदमी पक्षात प्रवेश केला. निवडणूक तयारीत आघाडी घेत केजरीवाल यांनी गुरुवारी आपल्या पक्षाच्या ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. ते लवकरच आणखी काही नावे घोषित करण्याची शक्यता आहे. राजधानीत जनमताचा कानोसा अद्याप स्पष्ट झाला नसला, तरी आम आदमी पक्षाचे पारडे आजही जड असल्याचे मानले जाते. सहानुभूती घटक हे त्याचे मुख्य कारण सांगितले जाते. यामुळे होणारा फायदा किती मोठा वा लहान असेल हे मात्र कुणालाही सांगता येत नाही. केंद्रात भाजपा, दिल्लीत आम आदमी पक्ष हे चित्र या निवडणुकीतही कायम राहण्याची चिन्हे सध्या तरी दिसून येत आहेत. मात्र, केजरीवाल यांना २०१५ व २०२० या दोन्ही निवडणुकीत जो एकतर्फी जनादेश मिळाला तो यावेळी मात्र मिळणार नाही, असे निश्चितपणे सांगता येईल.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# २६/११ आणि ताज..!

बरोबर १६ वर्षांपूर्वी, २६ नोव्हेंबर २००८ रोजी भारताची आर्थिक राजधानी मुंबईवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी हल्ला केला. या दहा अतिरेक्यांनी २६ ते २९ नोव्हेंबर असे तीन दिवस मुंबईकरांना अक्षरशः वेठीस धरून १२ ठिकाणांवर १७५ जीव घेतले. सोळा वर्षे झाल्यानंतरसुद्धा '२६/११' अशी ही ओळख आणि जखम आजही भळभळत आहे. आज २०२४ मध्ये या हल्लेखोरांनी लक्ष्य केलेल्या हॉटेल ताजची आठवण प्रकर्षाने झाली. या ताजचे आणि टाटा ग्रुपचे सर्वेसर्वा रतन टाटा यांचे नुकतेच, ९ ऑक्टोबर २०२४ ला निधन झाले. या निमित्ताने २००८ च्या अतिरेकी हल्ल्याची आठवण झाली. मुळात 'ताजमहाल पॅलेस' नाव असलेल्या या हॉटेलची पुढे 'ताज' अशीच सोपी, सुटसुटीत ओळख झाली. डिसेंबर १९०३ मध्ये रतन टाटांचे पणजोबा जमशेद टाटा यांनी हे हॉटेल सुरू केले. आज सव्वाशे वर्षांनंतरही 'ताज म्हणजे ताजच' अशी ख्याती या हॉटेलने टिकवून ठेवली आहे. मुंबईतील अरबी समुद्र आणि गेट वे ऑफ इंडियाच्या विहंगम भागात हे हॉटेल आहे. मुंबईत गेलेला प्रवासी किंवा पर्यटक 'ताज'ला बाहेरूनही पाहून समाधानी होतो. 'ताज'च्या दोन इमारती असून एक जुनी अभिजात पारंपरिक शैलीतील असून दुसरी अत्याधुनिक बहुमजली आहे. जुन्या १९०३ च्या इमारतीत जुने पेंटिंग्ज, फर्निचर, सजावट इतकी अप्रतिम आहे की एखाद्या म्युझियमचाच भास होतो. येथे ४२ विशेष सूटस् आणि २८५ खोल्या आणि नव्या ताज टॉवरमध्ये २७५ अशा एकूण ६०२ खोल्या आहेत.

आज जगातील अव्वल हॉटेल मानल्या जाणाऱ्या मुंबईच्या या ताजमध्ये आज प्रतिदिन राहण्याचा खर्च २० ते २५ हजार रुपये असावा. सहज म्हणून मराठीतील सार्वकालिक लोकप्रिय साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचे एक व्यक्तिचित्र आठवले. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या संग्रहात 'नंदा प्रधान' हा लेख आहे. हा नंदा अमेरिकेत असतो. तो एकदा पुलंना मुंबईत भेटतो. ते नंदाला विचारतात, मुंबईत राहतोस कुठे? तो सांगतो, ताजमध्ये. त्या ताजच्या आसपासही फिरण्याचीसुद्धा माझ्यात ऐपत नाही असे सांगून ते, अरे बापरे काय भयंकर महाग हे हॉटेल, अशी प्रतिक्रिया देतात. दिवसाला १५-१६ रुपये पडतात ना, असे विचारल्यानंतर नंदा सांगतो. ४५ रुपये..! असा १९६३ मधील या लेखात उल्लेख आहे. याचा अर्थ त्यावेळी या पंचतारांकित 'ताज'मध्ये राहण्याचे फक्त ४५ रुपये लागत होते आणि आता २० ते २५ हजार रुपये. अशा या वैभवशाली ताजला पाकी अतिरेक्यांनी 'टार्गेट' केले होते. पाकिस्तानी १० अतिरेक्यांनी मुंबईत १२ ठिकाणी हे हल्ले केले होते. त्या शिवाय छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसटी) रेल्वे स्टेशन, कामा हॉस्पिटल, ताज, ओबेरॉय व लिओपोल्ड ही सारी गर्दीचीच ठिकाणे होती. 'ताज'मध्ये प्रवेश केल्याबरोबर चार अतिरेक्यांनी एके-४७ मधून गोळीबार करत हॉटेलभर आणि वरच्या मजल्यावरसुद्धा गोंधळ घातला होता. या हल्ल्यात त्यांनी ३१ निरपराधांचे बळी घेतल्याची नोंद आहे. यात वीस पर्यटक आणि 'ताज'चे ११ कर्मचारी होते.

मुंबईवरील या हल्ल्यात भारताचे गृहमंत्री शिवराज पाटील, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि गृहमंत्री आर. आर. पाटील या तीन तत्कालीन काँग्रेसी नेत्यांचाही वेगळ्या अर्थाने, मंत्रिपद गमावून बळी गेला होता. आर. आर. पाटलांनी या हल्ल्याची जबाबदारी घेत राजीनामा दिला. मुख्यमंत्री विलासराव देशमुख 'ताज'ला भेट देत असताना बॉलीवूडवाले रामगोपाल वर्मा व सुपुत्र रितेश देशमुख यांना पर्यटनासाठी नेल्याच्या 'स्टाईल'मध्ये घेऊन गेले होते. त्याची बोंबाबोंब झाल्यावर त्यांचा राजीनामा घेतला गेला. या हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी दिल्लीत याच विषयावर झालेल्या ३ तासांत ३ गंभीर बैठकांमध्ये ३ वेळा कपडे बदलून जाणारे शिवराज पाटील हेही पदच्युत झाले होते. ताजवरील हल्ल्याला त्याचे सर्वेसर्वा रतन टाटा यांनी फारच गंभीरपणे घेतले होते. हा घटनाक्रम अतिशय वेदनादायी असल्याचे ते नेहमीच बोलून दाखवत. 'ताज'वर तीन दिवस अतिरेक्यांचा कब्जा होता. त्याही काळात कणखर टाटा ताजमध्ये जाऊन आले होते. ताजमध्ये जीव गमवाव्या लागलेल्या आपल्या कर्मचाऱ्यांसह ३१ ही जणांसाठी त्यांनी शक्य ते सर्व केले. त्यांना वैद्यकीय व आर्थिक संपूर्ण मदत केली. ८३ कोटी रुपये ताजच्या दुरुस्तीवर खर्च करून त्यांनी महिनाभरातच ताज पुन्हा सुरू करून दाखवले होते. आज जगभरात टाटांच्या या ताज हॉटेल ग्रुपची २५० पेक्षा अधिक हॉटेल्स आहेत. साखळी हॉटेल समूहांमध्ये ताज अनेक वर्षांपासून जगात पहिल्या स्थानावरच आहे. 'आपल्या देशात खरे उद्योगपती टाटाच, बाकीचे जवळपास सर्व विस्तारित व्यापारीच' अशी ओळख असलेला टाटा समूह १०० वर्षांतील दानशूरांच्या जागतिक यादीत अव्वल आहे. १८८२ पासून शिक्षण व आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या टाटांच्या शंभर वर्षांतील देणग्यांचे मूल्य ७.६० लाख कोटी रुपये आहे. तर बहुचर्चित बिल गेट्स दुसऱ्या स्थानावर, टाटांपेक्षा २ लाख कोटींनी कमी, म्हणजे ५.५३ लाख कोटींवर आहेत. 'वाह टाटा' क्या बात..!

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# विजयाचे पद पुढे टाकिले...

'दीप्यमान विजय' असेच भारतीय जनता पार्टीच्या विजयाचे वर्णन करावे लागेल. सर्व दूरचित्रवाहिन्यांनी त्रिशंकू सरकार येईल किंवा भारतीय जनता पार्टीला निसटता विजय मिळेल, अशा पद्धतीचे भाकीत केले होते. परंतु या सर्व अंदाजांना चुकीचे ठरवून भारतीय जनता पार्टीने यश प्राप्त केलेले आहे. निवडणुकीच्या आधी बरेच पाणी वाहून गेलेले आहे. अनेक प्रकारच्या घडामोडी, दूषित वातावरण महाराष्ट्राने अनुभवलेले आहे. या सर्व प्रकारांची सुरुवात २०१९ मध्ये झाली. ज्यावेळेस भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांना महाराष्ट्रातील जनतेने सरकार स्थापन करण्याचा जनादेश दिलेला होता. परंतु उद्धव ठाकरे यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि खुर्चीच्या मोहासाठी भारतीय जनता पार्टीशी २५ वर्षांपासून असलेली युती तोडली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी म्हटले होते की, 'मी कधीही शिवसेनेची काँग्रेससोबत युती होऊ देणार नाही.' ते विचार खोटे ठरवत आपल्या हिंदुत्वाच्या विचाराला तिलांजली देत शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या सोबत युती केली. साहजिकच ज्या सत्तेमध्ये ते सहभागी झाले व ज्यांच्यासोबत सहभागी झाले, त्यांचे संस्कार त्यांच्यावर होत गेले. एका प्रसंगी १९९२ च्या मुस्लिम दंग्यांमध्ये हिंदू समाजासाठी शिवसेनेने जी आक्रमक भूमिका स्वीकारलेली होती, त्या भूमिकेबद्दलसुद्धा उद्धव ठाकरे यांना मुस्लिम समाजाची माफी मागावीशी वाटली. शिवसेनेने हिंदुत्व सोडले आणि गठ्ठा मतदानासाठी त्यांनी मुस्लिमांचे लांगूलचालन केले. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार यांच्या मार्गावर शिवसेना उद्धव ठाकरे चालू लागली.

शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्रात जातीयवादी वातावरण निर्माण केले. फडणवीस सरकारच्या काळात एल्गार परिषदेच्या निमित्ताने जातिविद्वेष निर्माण करण्यात आला. त्यानंतर जरांगे यांना समोर करण्यात आले. महाराष्ट्र पेटविला गेला. मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष निर्माण करण्यात आला. भाजपाच्या उमेदवारांना पाडण्याच्या गोष्टी केल्या गेल्या. शरद पवारांनी पहिले उद्धव ठाकरेंना भाजपापासून दूर केले. नंतर जरांगेच्या रूपाने त्यांनी मराठा समाजाला भाजपापासून दूर करण्याचे काम केले. पवारांच्या या खेळीला फडणवीसांनी शिवसेना फोडून व राष्ट्रवादी फोडून उत्तर दिले. उद्धव ठाकरेंचे सरकार पाडून पुन्हा महायुतीचे सरकार आणले.



सर्वच वृत्तवाहिन्या आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार यांनाच दाखविण्याचे काम करीत होत्या. दोन महिन्यांपूर्वीपासून भाजपाविरोधी वातावरण तयार केले जात होते. भाजपाला फार तर ५० जागा मिळतील, असे चांगले विद्वान सांगत होते. एक्झिट पोलने १२५ जागा सांगितल्या. यावरून आपल्या असे लक्षात येईल की, बरेच वेळा आपण आपल्याला जे बघायचे तेच बघत असतो. एक्झिट पोल आणि सर्व विद्वानांचे असेच झाले. काँग्रेसच्या राज्यात काँग्रेसने कधीच महिलांना काही दिले नाही; परंतु भाजपाने जेव्हा लाडकी बहीण योजना आणली, त्यावेळेस जनतेला खूप आनंद झाला. लाखो महिलांना याचा लाभ झाला. लोकांच्या मनामध्ये भाजपाचे सरकार आले पाहिजे, अशा पद्धतीचा विचार पहिल्यांदा निर्माण झाला व यातूनच भाजपाच्या सरकारची प्रचंड यशाची मुहूर्तमेढ रोवली गेली. परंतु सर्व पोथी पंडित, एक्झिट पोलचे विद्वान, महाराष्ट्राचे जाणते राजे शरद पवार, उद्धव ठाकरे, विश्वप्रवक्ते संजय राऊत, बडबोले नाना पटोले या कोणालाच या सर्व गोष्टींचा अंदाज आला नाही. लाडक्या बहिणींमुळे मतदानाचा टक्का वाढेल, त्यामुळे भाजपाच्या जागा वाढतील, अशा पद्धतीचा विचारच कोणी केला नाही; आणि ज्याचा कोणी विचार केला नाही तेच घडले. महाराष्ट्रामध्ये भाजपाचे सरकार येण्याची अनेक कारणे असतील, पण त्यामध्ये 'लाडकी बहीण'चा प्रमुख सहभाग आहे, हे आता सर्वच मान्य करीत आहेत. परंतु, २०२९ ची निवडणूक ही भाजपाने स्वतंत्रपणे लढविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात सातत्याने भाजपा कोणा ना कोणा साथीदारासोबत निवडणूक लढवीत आहे. त्यामुळे भाजपाचे यश हे नेहमीच मर्यादित यश असते. यावेळेस १४८ जागा लढवून भाजपाच्या १३२ जागा निवडून आलेल्या आहेत. यावरून आपल्या असे लक्षात येईल की, जर भाजपाने स्वबळावर २८८ जागा लढविल्या तर १४४ जागांपेक्षा अधिक जागा भाजपाच्या निश्चितच निवडून येऊ शकतात. भाजपाला राजकीयदृष्ट्या महाराष्ट्रामध्ये स्वतंत्रपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे. कारण ज्या प्रादेशिक पक्षांसोबत भाजपा युती करीत आहे, हे प्रादेशिक पक्ष हे कधीही धोका देऊ शकतात. हे राष्ट्रीय स्तरावरचा विचारच करू शकत नाही. ज्या योजना भाजपा महाराष्ट्रात आणू शकते त्या यांच्या डोक्याच्या पलीकडल्या राहू शकतात. केंद्रामध्ये भाजपाचे सरकार आहे. महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आलेले आहे. भाजपाने जे यश आज मिळविले ते अंतिम साध्य नाही. राजकारण सत्ता हे साधन आहे व त्याद्वारे समाजाची सेवा करणे व राष्ट्राला परम वैभवापर्यंत पोहोचविणे हे साध्य आहे. अनेक संस्था, संघटना व लाखो कार्यकर्त्यांच्या भरवशावर हे यश मिळालेले आहे, त्या कार्यकर्त्यांचा विसर सत्ता आल्यानंतर भाजपाने पडू देऊ नये, ही स्वाभाविकच कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आता पुढे काय?

मतदान झाले. टक्केवारीवर चर्चा झाली. निकाल जो असेल तो सगळे स्वीकारतील, पण मतदारयादीचा घोळ कसा दुरुस्त होईल? हा प्रश्न मात्र कायम राहतो आहे.

विज्ञानाने बरीच प्रगती केली आहे. तिचा उपयोग यावेळी चांगल्याप्रकारे करण्यात आला. लोक त्यामुळे खुष होते. हे जरी खरे असले तरी यादीचा मूळ आकडा चुकीचा आहे आणि त्यावरूनच टक्केवारीची मांडणी होते. इथे खरी गोम आहे. नगरवार मतदान बघितले तर ८० टक्क्यांच्यावर पण यादीप्रमाणे ५० ते ५५ दरम्यान समोर येते. यामुळे नकारात्मक विचार वाढत जातो. उगाच हे लोक असे आणि ते तसे, अशा मनोकल्पित विचार होऊ लागतो. विषय ताजा आहे. यापुढे अशी वेळ येऊ नये ही मागणी आतापासूनच लावून धरली तर असे वाटते की नकारात्मकता कमी होईल.

● नगराप्रमाणे यादी असावी, ज्यामुळे खूप पाने पलटायचा प्रकार बंद होईल. ● नगराप्रमाणे नावे कमी-जास्त करण्यासाठी योग्य यंत्रणा उभी असावी. ● ॲपचा वापर सहजपणे करता येईल अशी सोय व्हावी. ● मतदान खूप दूरवर जाऊन करणे नेहमीच त्रासाचे असते. त्याकरिता जवळ व्यवस्था झाली तर उत्तम. ● मतदान कार्डाशी आधार लिंक करता आले तर त्याचाही प्रशासनाला फायदाच होईल. चुकीच्या पद्धतीने होणारे मतदान टाळता येऊ शकते. ● नवीन नावनोंदणीसाठी जे ॲप उपलब्ध आहे त्याचा सतत प्रसार केला गेला पाहिजे. आणखी बरेच मुद्दे असू शकतील. पण मनात असलेली खंत ही सहजपणे व्यक्त व्हायला जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. शासन करेल की नाही, यावर अवलंबून न राहता आपल्या नगरसेवकाजवळ ही नवीनतम माहिती सदैव तयार असावी.

**अतुल ठाकरे**/नागपूर

●● ●●

### विधानसभा निवडणुकीपासून मिळालेला धडा

विधानसभा निवडणूक २०२४ चे निकाल म्हणजे, 'दूध का दूध और पानी का पानी' असे लागले आहेत. या निकालामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा यांनी एकदम सिक्सरच मारला आहे. असे दिसतं. गेल्या सहा महिन्यांपासून त्यांनी जी प्रचंड मेहनत घेतली आहे, त्याचाच हा परिपाक आहे, यात शंका नाही. या निकालावरून खालील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

१. मतदार अतिशय जागृत झाला आहे. २. स्वतःचे कर्तृत्व न पाहता, दुसऱ्या पक्षाला घालून-पाडून बोलणे, हे आता मतदार सहन करणार नाही. ३. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा मुद्दा सोडून चालणार नाही. ४. जातीचे राजकारण चालणार नाही. ५. विकास कामांनाच महत्त्व आहे. ६. युवा राजकारण्यांना संधी देण्यात यावी. ७. राजकारणात कोणत्या पक्षाबरोबर राहावे याची जाण असावी. ८. स्वतःपेक्षा पक्ष मोठा असून पक्षातील वरिष्ठ मंडळींना आदर देणे गरजेचे आहे. ९. आपल्या पूर्वजांबद्दल आदर असावा. १०. राजकारणात पुत्रप्रेम टाळावे, मुलांना त्यांच्या कर्तृत्वाने मंत्रिपद मिळवू द्यावे. ११. निवडणुकीचे जे निकाल लागलेले आहेत, ते खिलाडूवृत्तीने मान्य करावे. १२. राजकारणात सद्धा. उच्चशिक्षण. उत्तम चरित्र. संयम. चिकाटी व मेहनत आवश्यक आहे. या निकालावरून वरील बाबी सिद्ध झालेल्या आहेत, तसेच हे सरकार पुढील पाच वर्ष उत्तम काम करेल याची खात्री आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

●● ●●

### जातीयवादी शक्तींचा पराभव

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी जो जनादेश दिला तो अनेक अर्थांनी लक्षणीय तसेच विरोधकांना आत्मपरीक्षण करण्यास बाध्य करणारा ठरणार आहे. मविआचे सरकार सत्तेत आले की विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याची वल्गना करणाऱ्या आणि वैयक्तिक हिशेब चुकते करू पाहणाऱ्या, मविआच्या मस्तवाल नेत्यांना जनतेने जबरदस्त चपराक दिली आहे. मविआच्या जनहिताच्या योजना सांगण्याऐवजी माझा बाप-पक्ष चोरला असे सांगून गद्दार, मिंधे, विश्वासघातकी, दगाबाज, खोके, खंडणी, वसुली अशा अपशब्दांची लड लावणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या हातून बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेनाही गेली, यावरही शिक्कामोर्तब झाले. शरद पवारांच्या अवस्थेचे वर्णन करून त्यांच्या ज्येष्ठतेचा अपमान न करता, त्यांनी इतकी वर्षे जे पेरले त्याची किंमत त्यांना चुकवावी लागली, एवढे सांगितले तर पुरेसे आहे.

महाराष्ट्रात आता मविआला विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदही मिळणार नाही अशी व्यवस्था जनता जनार्दनाने करून ठेवली आहे. महाराष्ट्रात हिंदूंमध्ये जातीयवादाचे विष कालवून निवडणूक जिंकण्याचे कारस्थान करणाऱ्या मविआला जनतेने अक्षरशः धूळ चारली. जरांगे फॅक्टर सुद्धा किती तकलादू होता हेही सिद्ध झाले. मुस्लिम समाजानेही मविआच्या कारस्थानाला बळी न पडता जागरूकपणे मतदान केले. आता विरोधक नेहमीप्रमाणे ईव्हीएमचे तुणतुणे वाजवणार आणि महायुतीच्या गगनभेदी विजयाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करणार, हेही उघड आहे. खुल्या दिलाने पराभवाचा स्वीकार करून आत्मपरीक्षण करण्याची इच्छा नसलेल्या नेत्यांना आणि पक्षांना राजकारणात स्थान नाही असाही इशारा जनतेने दिला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आणि देवेंद्र फडणवीस-एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांच्या एकतेमुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुती सरकार सत्तेत येत आहे. महायुतीच्या या नवीन सरकारला मनापासून शुभेच्छा!

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ‘ट्रम्पेट’ने थोरल्या पवारांना ९ ठिकाणी दिला पुन्हा दणका!

## या चिन्हाला मतफरकाहून अधिक मते; आंबेगाव, पारनेर, बेलापूरमधील प्रतिष्ठेच्या लढतीत पराभवास कारणीभूत

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई दि.२५ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वीपर्यंत राज्यातील सर्वात मोठा ’डार्क हॉर्स’समजला जाणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पानिपत झाले. लोकसभेच्या तुलनेत अत्यंत निराशजनक कामगिरी झाल्याने पक्षावर अवकळा निर्माण झाली आहे. त्यांच्या दारूण पराभवामागील अनेक कारणांमध्ये तुतारी वाजविणारा माणूस या निवडणूक चिन्हाशी साधर्म्य असणाऱ्या ट्रम्पेट ही निशाणीही एक महत्त्वाचे निमित्त ठरले आहे. त्यांच्या पक्षाच्या नऊ उमेदवारांचा पराभवात या निवडणूक चिन्हाने मोलाची कामगिरी बजावली आहे त्यांच्या पराभवाच्या अंतरापेक्षा ट्रम्पेट चिन्ह असलेल्या उमेदवाराला मते मिळाली आहेत.

अनुशक्तीनगर, बेलापूर, आंबेगाव पारनेर ,केज परांडा ,जिंतूर घनसावंगी व शहापूर या विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाच्या उमेदवारांना पाडण्यात ट्रम्पेट कारणीभूत ठरले आहे.

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हाशी साधर्म्य असणाऱ्या ट्रम्पेटने लोकसभा निवडणुकीत दोन ठिकाण उमेदवारांच्या पराभवास हातभार लावला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत पक्षाचे उमेदवार असणाऱ्या ठिकाणी हे चिन्ह कोणालाही देऊ नये अशी मागणी शरद पवार यांच्या पक्षाकडून करण्यात आली होती मात्र निवडणूक आयोगाने ती फेटाळून लावली. आणि त्याचा फटका पक्षाला च्या उमेदवारांना बसला असल्याचे निवडणूक निकालातून स्पष्ट होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन गटातील प्रतिष्ठेची लढत असलेल्या आंबेगाव मतदार संघात त्यांचे उमेदवार देवदत्त निकम यांचा अजित पवार गटाचे नेते दिलीप वळसे -पाटील यांच्याकडून १५२३ मतांनी पराभव झाला.या ठिकाणी ट्रम्पेट चिन्ह असलेल्या उमेदवाराला त्यापेक्षा जवळपास दुप्पट म्हणजे २९६५ मते मिळाली तर अनुशक्ती नगर मतदारसंघात शरद पवार गटाचे हात अहमदनगर यांचा ३३७८ मताने नवाब मलिक यांची कन्या सना मलिक हिने पराभव केला. या ठिकाणी ट्रम्पेट चिन्ह असलेल्या उमेदवाराला ४०७५ मते पडली आहेत. बेलापूर मतदारसंघात संदीप नाईक हे अटीतटीच्या लढतीत भाजपच्या मंदा म्हात्रे यांच्याकडून अवघ्या ३७७ मतांनी पराभूत झाले. या ठिकाणी ट्रम्पेट चिन्हाला त्यापेक्षा जवळपास नऊपट म्हणजे २८६० इतकी मते मिळाली आहेत.

अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांच्या पत्नीचा पारनेर मतदार संघातून अजित पवार गटाच्या काशिनाथ दाते यांनी अवघ्या १५२६ मतांनी पराभव केला या ठिकाणी ट्रम्पेटला३५८२ मते मिळाली आहेत. केज मतदारसंघात या चिन्हाला ३५५९ मते पडली. तल असून पक्षाच्या उमेदवार पृथ्वीराज साठे यांचा भाजपाच्या नमिता मुंदडा यांनी २६८७ मतांनी पराभव केला.

परांडा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाच्या तानाजी सावंत यांनी शरद पवार गटाचे उमेदवार राहुल मोटे यांच्यावर १५०९ मताधिक्य मिळवीत विजय मिळवला तर या ठिकाणी टेम्पेटला तब्बल ४४४६ मते मिळाली आहेत

जिंतूर मतदारसंघात शरद पवार गटाच्या विजय भांबळे यांचा भाजपाच्या विद्यमान आमदार मेघना बोर्डीकर यांनी ४५१६ मताने पराभव केला या ठिकाणी ट्रम्पेटला तब्बल ७४३० मते मिळाली आहेत. घनसावंगी मध्ये माजी मंत्री राजेश टोपे यांचा शिंदे गटाच्या हिकमत उढाण यांनी २३०९ मतांनी पराभव केला.या ठिकाणी ट्रम्पेट चिन्हाला ४८३० मते मिळाली आहेत.तर शहापूरमध्ये अजित पवार गटाच्या दौलत दरोडा यांनी शरद पवार गटाचे उमेदवार पांडुरंग बरोरा यांचा १६७२ मतांनी पराभव केला या ठिकाणी ट्रम्पेट चिन्हावर ३८९२ मते पडली आहेत.

एकूणच २८८ विधानसभा मतदारसंघांपैकी अनेक ठिकाणी ट्रम्पेट निवडणूक चिन्ह घेऊन अपक्ष उमेदवारांनी हजारोहुन अधिक मत मिळवली. त्याचा फटका शरद पवार गटाच्या उमेदवारांना बसला असून उपरोक्त नऊ ठिकाणच्या पराभवात मात्र या चिन्हाने महत्त्वाचे भूमिका बजावली असल्याचे स्पष्ट होते.

# पवार कुटुंबातील अघोषित करार व कटात माझा बळी

## राम शिंदे यांचा अजित पवार यांच्यावर आरोप

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि .२५ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीत महायुतीचा दणदणीत विजय झाला असलातरी काही ठिकाणी पराभूत झालेल्या उमेदवारांनी त्यासाठी घटक पक्षाला कारणीभूत ठरविले आहे.कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघातून शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांच्याकडून अवघ्या १२४३ मतांनी पराभव झालेल्या भाजपच्या राम शिंदे यांनी आपल्या पराभवामागे उपमुख्यमंत्री अजित पवार असल्याचा आरोप केला आहे.महायुतीचा धर्म न पाळता त्यांनी पुतणे रोहित पवार यांच्यासमवेत आपल्या विरुद्ध अघोषित करार व राजकीय कट रचला होता , असा आरोप सोमवारी केला .

भाजपच्या प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषदेत हे आरोप करताना त्यांना आपले अश्रू रोखता आले नाहीत. कराड येथील प्रीती संगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी गेलेल्या अजित पवार यांची रोहित पवार यांच्याशी समोरासमोर भेट झाली. यावेळी त्यांनी त्यांचे विजयाबद्दल अभिनंदन करताना मिस्कीलपणे ’ थोडक्यात बचावलास. माझी जर एक सभा झाली असती तर काय झाले असते बघ,असा टोमणा मारला होता. तो संदर्भ घेऊन राम शिंदे यांनी तातडीने पत्रकार परिषद घेत आपले गाऱ्हाणे मांडले. ते म्हणाले ,’मला याबद्दल कल्पना होती मात्र युती धर्म म्हणून मी त्याबद्दल आतापर्यंत काहीही बोललेलो नव्हतो . निवडणुकीच्या काळात अजित पवार यांनी यासाठी प्रचार सभा घ्यावे यासाठी मी खूप प्रयत्न केले. त्यांना मोबाईलवर मेसेज पाठवले होते. त्यांचे पुत्र व पीएला अनेकवेळा बोललो .पक्षाचे नेते व दिल्लीतील श्रेष्ठींची याबाबत बोललो .मात्र अजित पवार यांनी आपल्यासाठी मतदारसंघात एकही सभा घेतली नाही . शतरीही आपण युतीचा धर्म म्हणून त्याबाबत जाहीर वाचता केली नव्हती. मात्र आज स्वतः अजित पवार यांनीच त्याची कबुली दिल्याने मी ही बाब उघड करीत आहे. पवार कुटुंबात कलह झाला असल्याने मला ते माझ्या विरोधात काम करतील, असे वाटले नव्हते .मात्र अजित पवार यांनी मतदारसंघात सहभाग घ्यायची नाही व रोहित पवार यांच्या कुटुंबाने बारामतीत मतदान करायचे नाही, असे अघोषित ठरले होते तसा त्यांनी राजकीय कट रचला होता. त्यात माझा बळी गेला , वरिष्ठांकडे तक्रार करण्यासंदर्भात सांगायचे तर महायुतीसाठी हे चांगले नाही. माझ्यासाठी तर नाहीच नाही. वरिष्ठांनी दखल घेऊन कारवाई केली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

# आपण महायुतीत असायला हवे होते

## मनसेच्या नेत्यांची राज ठाकरे पुढे भूमिका

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई,दि.२५ नोव्हेंबर:

विधानसभा निवडणूकीत महायुतीला समर्थन केले असले तरी आपण थेटपणे त्यांच्यासोबत राहावयास हवे होते त्याचा जास्त फायदा झाला असता असे मत मनसेच्या नेत्यांनी आज पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्यासमोर मांडले.

विधानसभा निवडणुकीत मनसेला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे पक्षाचे मान्यताही रद्द होण्याची भीती आहे त्या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी आज निवासस्थानी मनसेच्या प्रमुख नेत्यांची बैठक बोलावली होती. यावेळी अनेकांनी ईव्हीएम मशीन बद्दलही शंका उपस्थित केली.

निवडणूक प्रचाराच्या काळात राज ठाकरे यांनी राज्यात महायुतीचे सरकार येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील आणि आपण महायुती सरकारमध्ये असू जाहीर केले होते. मात्र १४० मतदारसंघात उमेदवार उभे करून एकही आमदार निवडून आला नाही व मताची टक्केवारी ही १.५ इतकी राहिली. त्यामुळे पक्षाची मान्यता रद्द होणार आहे. याबाबत नेत्यांनी राज ठाकरे यांच्यासमोर आपले मते मांडली. महायुतीला पाठिंबा जाहीर केला असलातरी काही ठिकाणी त्यांच्याकडून आपल्याला मदत मिळेल अपेक्षित होती.

मात्र त्यांनी ती केली नाही . त्यामुळे आपली एकही जागा निवडून आली नाही. जर आपण युतीमध्ये थेटपणे सहभागी होऊन काही जागा लढवल्या असत्या तर यश मिळाले, मताची टक्केवारी ही वाढली असती,,असे मतही काहीनी मांडले. राजांनी सर्वांची मते ऐकून घेतले मात्र त्याबाबत काहीही भाष्य केले नाही. येत्या काही दिवसात पुन्हा बैठक बोलावून पुढची भूमिका ठरवली जाईल ,असे त्यांच्या नेत्याकडून सांगण्यात आले.

# लाडक्या बहिणींच्या राज्यात सभागृहात मात्र भगिनींची संख्या रोडावली!

## अडीचशे पैकी अवघ्या २१ महिला विजयी; भाजपाच्या सर्वाधिक १४ आमदार

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.२५ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही’ गेम चेंजर’ ठरली असल्याचे सांगितले जात असताना नव्या सभागृहात मात्र दुर्दैवाने भगिनींची संख्या रोडावली आहे. २५० पैकी केवळ २१ महिला उमेदवारांना विजय मिळवता आला आहे. मावळत्या सभागृहात त्यांची संख्या २४ होती.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले होते .त्यानंतर सरकारने गतिशील निर्णय घेत लाडकी बहीण योजने राज्यात सुरू केली. प्रत्येक महिलेला दरमहा पंधराशे रुपये देणाऱ्या या योजनेअंतर्गत जुलै ते

**महिला आमदारांची नावे अशी: (कंसात मतदार संघ)**

**भाजपा:** श्वेता महाले (चिखली), मेघना बोर्डीकार (जितूर), देवयानी फरांडे (नाशिक मध्य),सीमा हिरे (नाशिक पश्चिम), मंदा म्हात्रे(बेलापूर), मनीषा चौधरी (दहिसर),विद्या ठाकूर(गोरेगाव), माधुरी मिसळ(पर्वती),मोनिका राजाळे(शेवगाव), नमिता मुदंडा(कैज),श्रीजया चव्हाण (भोकरी), सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) , स्नेहा पंडित(वसई), व अनुराधा चव्हाण (फुलंबारी).

**राष्ट्रवादी काँग्रेस :** सना मलिक (अणुशक्ती नगर), सरोज अहिरे ( देवळाली), अदिती तटकरे (श्रीवर्धन), सुलभा खोडके ( अमरावती)

**शिवसेना :** मंजुळा गावित (साक्री) व संजना जाधव (कन्नड), **काँग्रेस :** ज्योती गायकवाड (धारावी),

**प्रमुख पराभूत महिला उमेदवार**

**भाजपा –** भारती लव्हेकर, **शिंदे सेना :** भावना गवळी, यामिनी जाधव, **कांग्रेस :** यशोमती ठाकूर, **उद्धव ठाकरे गट :** ऋतुजा लटके स्नेहल जगताप ,स्नेहल जाधव, **शरद पवार गट:** रोहिणी खडसे

**..तर २०२९ मध्ये ९६ महिला आमदार**

**राज्यात विधानसभेत ३३ टक्के महिला आरक्षणाचा ठराव सप्टेंबर २०२३ मध्ये मंजूर करण्यात आला आहे. नवीन जनगणना झाल्यानंतर या आरक्षणाची अंमलबजावणी होईल. त्यामुळे २०२९ च्या निवडणूकीपूर्वी ती पूर्ण झाल्यास त्या वर्षाच्या निवडणुकीत २८८ पैकी ९६ महिला आमदार सभागृहात असतील.**

नोव्हेंबर अखेरपर्यंत सुमारे अडीच कोटी महिलांच्या बँक खात्यावर पाच महिन्याचे प्रत्येकी साडेसात हजार रुपये जमा झाले. त्यामुळे राज्यातील बहिणी व महिलावर त्याचा मोठा परिणाम होऊन त्यांनी महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मतदान केल्याचे सांगितले जात आहे.

महायुतीच्या विजयाला मोठा हातभार लागला असल्याचे महायुतीचे नेते ही मान्य करत आहेत .मात्र निवडणुकीच्या रिंगणात महिला प्रतिनिधींना अपेक्षित यश मिळालेले नाही.

२८८ मतदार संघातून एकूण ४ हजार १४० उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी २५० महिला उमेदवार होत्या. त्यापैकी ७ टक्के म्हणजे अवघ्या २१ जणी विजयी झाल्या आहेत. त्यामध्ये सर्वाधिक १४ भाजपाकडून विजयी झाल्या. त्यामध्ये १० जणी दुसऱ्यांदा विजयी झाल्या आहेत.तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा ४ , शिंदे गटाच्या दोन व काँग्रेसच्या तिकिटावर एक महिला विजय झाल्या. उद्धव ठाकरे गट,शरद पवार गट आणि अन्य छोटे पक्ष व अपक्ष उमेदारांपैकी एकही महिला निवडून आल्या नाहीत.

मावळत्या विधानसभेत एकूण २४ महिला आमदार होत्या. यंदा त्यामध्ये ३ ने घट झाली आहे.

# गृहमंत्र्यांना भेटून रश्मी शुक्लांनी आचारसंहितेचा भंग केल्याने करवाई करा : काँग्रेसची मागणी

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२५ नोव्हेंबर : आदर्श आचारसंहिता लागू असताना वादग्रस्त आयपीएस अधिकारी रश्मी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आचारसंहितेचा भंग केलेला आहे. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

निवडणूक काळात काँग्रेसने वारंवार केलेल्या मागणीमुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवले होते. सरकारने त्यांना निवडणूक काळापूर्वीपुरता सक्तीच्या रजेवर पाठवले. विधानसभेत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्याने त्यांचे सरकार पुन्हा स्थापण होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर रश्मी शुक्ला यांनी रविवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर जाऊन त्यांची भेट घेत यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले होते. याबाबत बोलताना लोंढे म्हणाले की, तेलंगणामध्ये अशाच प्रकारे पोलीस महासंचालक व एका वरिष्ठ अधिकाऱ्याने वरिष्ठ मंत्र्याची भेट घेतली असता निवडणूक आयोगाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली होती. गैर भाजपा राज्यात निवडणूक आयोग तात्काळ कारवाई करते पण भाजपाशासित राज्यात निवडणूक आयोगाला काही दिसतच नाही का? हा प्रश्न आहे. शुक्ला यांच्यावर विरोधी पक्षांच्या नेत्यांचे फोन टॅपिंग करण्यासारखे गंभीर गुन्हे आहेत. काँग्रेसच्या मागणीमुळे त्यांना पदावरून हटवण्यात आले आहे. विधानसभेचा निकाल लागला असला तरी निवडणूक आचारसंहिता संपण्याआधीच गृहमंत्र्यांना भेटून शुक्ला यांनी आदर्श आचार संहितेचे उल्लंघन केलेले आहे, त्यांच्यावर तातडीने कारावाई झाली पाहिजे ,असे त्यांनी सांगितले.

# ठाकरे गटाच्या विधिमंडळ नेतेपदी आदित्य ठाकरे

## भास्कर जाधव गटनेते तर सुनील प्रभू पक्षप्रतोद

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२५ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीत दारुण पराभवाला सामोरे जावे लागलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या विधिमंडळ नेतेपदी आदित्य ठाकरे यांची निवड करण्यात आली आहे तर विधानसभेतील गटनेते कधी भास्कर जाधव व पक्ष म्हणून सुनील प्रभू यांची नियुक्ती करण्यात आली मातोश्रीवर सोमवारी झालेल्या नवनियुक्त आमदार व नेत्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.त्याबाबतचे पत्र विधिमंडळात सादर करण्यात आले.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश मिळाले असताना महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघ्या ४८ जागा आल्या. त्यामध्ये उद्धव ठाकरे गटाचे सर्वाधिक २० आमदार आहेत. ठाकरे यांनी आज सर्व नवनियुक्त आमदार व पक्षांच्या नेत्यांची बैठक मातोश्रीवर बोलावली होती यामध्ये पक्षाच्या आगामी रणनीती धोरणाबाबत त्यांनी मार्गदर्शन केले त्यानंतर विधीमंडळ नेतेपदी आदित्य ठाकरे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली. तसेच भास्कर जाधव यांची विधानसभेतील गटनेतेपदी व सुनील प्रभू यांचे प्रतोद म्हणून जबाबदारी सोपविण्याचाही निर्णय घेण्यात आला नवनियुक्त आमदारांच्या कडून पक्षाच्या ध्येय धोरण व नेत्यांच्या सूचनेनुसार कार्यरत राहणे व त्यासाठी बांधील राहणार असल्याबाबतचे शपथपत्र ही घेण्यात आले. बैठकीनंतर याबाबत विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, निवडणुकी च्या निकालाबाबत सर्वांनाच शंका आहे .मात्र आहे त्या परिस्थितीत महारा महाराष्ट्राच्या हितासाठी विरोधकांना विरोध करत कार्यरत राहण्याबाबत पक्षप्रमुखांनी मार्गदर्शन केले आहे त्यांच्या सूचनेनुसार पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी गटनेतेपदी व प्रतोद पदावर नियुक्त करण्यात आल्या. महाविकास आघाडीच्या अन्य पक्षासोबत बैठक घेऊन विरोधी पक्ष नेत्याबाबत दावा करण्याबाबत चर्चा करू ,असे त्यांनी स्पष्ट केले. तर भास्कर जाधव यांनी ’पक्षप्रमुखांनी दिलेला आदेश विनम्रपणे स्वीकारावा लागतो. अन्यथा आदित्य ठाकरे यांची विधानसभा गटनेते पदी निवड व्हावी’, असे माझं मत होते, असे सांगितले.

# जल प्रकल्पातील पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे - विभागीय आयुक्त दिलीप गावडे

## कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरले रब्बी- उन्हाळी पाण्याचे नियोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.२५, (विमाका) : छत्रपती संभाजीनगर विभागातील जल प्रकल्पातील पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त तथा कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष दिलीप गावडे यांच्या अध्यक्षतेखाली जायकवाडी प्रकल्प, नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प, निम्न दुधना प्रकल्प, माजलगाव प्रकल्प, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प, पूर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर प्रकल्प), मांजरा प्रकल्प, निम्न तेरणा प्रकल्प, सिना कोळेगाव प्रकल्प या नऊ मोठया प्रकल्पावरील सिंचन तसेच पाणी नियोजनासाठी कालवा सल्लागार समितीची (शासकीय सदस्यांची) बैठक आज विभागीय आयुक्त कार्यालयात झाली. यावेळी दूरदृष्य प्रणालीव्दारे सबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच सबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकस्थळी मुख्य अभियंता लाभक्षेत्र तथा सदस्य जयंत गवळी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) चे अधीक्षक अभियंता सं. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पल्लवी जगताप, महसूल उपायुक्त नयना बोंदर्डे, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.१ चे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव, नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राकेश गुजरे, जायकवाडी पाटबंधारे विभाग जालनाचे कार्यकारी अभियंता सुरेखा कोरके, लाभक्षेत्र पाटबंधारे विभाग क्र.-१ लातूरचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, धाराशिव पाटबंधारे विभाग क्र-१ चे कार्यकारी अभियंता अ.ना.मदने, उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त श्री गावडे म्हणाले, पाऊस चांगला झाल्याने आपल्या विभागातील बहुतांश प्रकल्पात चांगला पाणीसाठा आहे. त्यामुळे या पाण्याचे पिण्यासाठी, शेतीसाठी तसेच उद्योगासाठी सूक्ष्म नियोजन करावे. पाणीटंचाई भासणार नाही तसेच टँकरची गरज पडू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केंली. जलसंपदा विभागासह जिल्हा प्रशासनाने सूक्ष्म पाणी नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सं. को. सब्बीनवार, अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, पल्लवी जगताप तसेच प्रणालीव्दारे नांदेडचे अधीक्षक अभियंता अजय दाभाडे यांनी प्रकल्पातील सद्यस्थिती व नियोजनाबाबत माहिती दिली. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत सिंचन प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात आले असून संबंधीत जिल्ह्याच्या पालकमंत्री यांच्या यानंतर यानंतर होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय करण्यात येणार असल्याचेही ठरले.



जायकवाडी प्रकल्पातून आज रब्बीचे पहिले आवर्तन

जायकवाडी धरणामध्ये २१७१.०० दलघमी (१००.००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. जायकवाडी डाव्या कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन आज २५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सोडण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, अहिल्यानगर, बीड व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्प: रब्बी हंगामातील दोन पाणी आवर्तने डिसेंबरअखेर

नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या नाशिक जिल्ह्यातील मुकणे, भाम, भावली व वाकी या चार धरणामध्ये ३०३.३८ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. नांदूर मधमेश्वर कालवा मुखाशी सिंचनासाठी उपलब्ध पाणीसाठयावर रब्बी हंगामात दोन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित केलेले असून सदर आवर्तने अनुक्रमे डिसेंबर अखेर व फेब्रुवारी महिन्यात गोदावरी डावा व उजवा कालवा समवेत घेणे प्रस्तावित आहे. छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. उन्हाळी हंगामातील आवर्तनाबाबत निर्णय पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कालवा सल्लागार बैठकीत घेण्यात येणार आहे.

निम्न दुधना प्रकल्प: रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन पाणी आवर्तन प्रस्तावित

निम्न दुधना प्रकल्पामध्ये १८१.७८० दलघमी (७५%) उपयुक्त पाणीसाठा झालेला असून धरणावर अवलंबून असलेल्या सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित केले आहे. कालव्याचे रब्बीचे पहिले आवर्तन २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. जालना व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

माजलगाव प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार

या वर्षी धरणामध्ये २६३.२० दलघमी (८४.३५%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. याचा लाभ बीड व परभणी या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना होणार आहे.

ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प: रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन प्रस्तावित

ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पामध्ये ९६४.१० दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेरपर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. याचा लाभ यवतमाळ, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना होणार आहे.

पूर्णा प्रकल्प (येलदरी व सिद्धेश्वर धरण) : रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे चार व चार पाणी आवर्तन

पूर्णा प्रकल्पामध्ये ८९०.७३ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. गाळघट व बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे चार व चार पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन आज २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. परभणी, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

मांजरा प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन २० डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार

मांजरा धरणामध्ये १७६.९६३ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे ०२ व ०३ पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन २० डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. लातूर, बीड व धाराशिव या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

निम्न तेरणा प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार

या वर्षी दोन्ही धरणामध्ये ९१.२२१ दलघमी (१००.%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी व उन्हाळी हंगामात अनुक्रमे तीन व पाच पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १५ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. लातूर व धाराशिव या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

सिना कोळेगाव प्रकल्प: रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी

सिना कोळेगाव धरणामध्ये ८९.३४ दलघमी (१००%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून सर्व पिण्याचे व औद्योगिक मंजूर पाणी पुरवठा योजनांना ३१ जुलै २०२५ अखेर पर्यंत पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले आहे. बाष्पीभवन वजा जाता उर्वरित उपयुक्त पाणीसाठ्यावर रब्बी हंगामात दोन पाणी आवर्तन देणे प्रस्तावित आहे. रब्बीचे पहिले आवर्तन १ डिसेंबर २०२४ रोजी सोडण्यात येणार आहे. धाराशिव व सोलापूर या जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

बैठकीला गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग छत्रपती संभाजीनगर, संबंधीत जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, प्रकल्पाशी संबंधित अधीक्षक अभियंता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्पाशी संबंधित कार्यकारी अभियंता, कृषी कार्यालयाचे जिल्हा कृषी अधीक्षक आणि महानगरपालिका व नगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ.कैलास पाटील यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने कळंब येथील तालुका क्रीडा संकुलनात विभागस्तरीय शालेय आट्यापाट्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेतील विजेत्या संघाना माझ्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. विजयी झालेल्या संघातील तसेच सहभागी झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रदीप मेटे, दिलीप पाटील, सागर मुंडे, विश्वजित जाधव आदींसह शिक्षक, खेळाडू उपस्थित होते.



### क्राईम वृत्त...



## महेश यादव यांच्या वाढदिवसानिमीत्त शालेय साहित्य, फळांचे वाटप

**येरमाळा, दि.२५ नोव्हेंबर -**
येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत बार्शीचे युवा उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, श्रीगणेश बिगरशेती सह पत संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष महेश उर्फ देवा यादव यांच्या वाढदिवसानिमीत्त शालेय साहित्य, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णासाठी फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सिध्दार्थ मित्र मंडळाने केले होते. यावेळी शाळेतील शिक्षक सुरेश ठोंबरे, शिक्षक अनिल बारकुल, शिक्षिका कांचन चेचे तर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.डी. बिरादार कर्मचारी के.बी.गुरव, अविनाश सारुक, आरोग्य सेविका सुतार एम.एस. इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विकी वाघमारे, सुरज कांबळे, नोबल कांबळे, दिलीप खलसे, अनिल वाघमारे, भास्कर कांबळे,नितीन बोकेफोडे, राजेश ठोकळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## तेरमध्ये हेरिटेज वॉक

**तेर, दि.२५ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे सोमवारी हेरिटेज वॉक करण्यात आला. जागतिक वारसा सप्ताह साजरा केला जात असून या निमित्ताने तेर येथील कै.रामलिंगअप्पा लामतुरे पुरातन शासकीय वस्तू संग्रहालय यांच्या वतीने तेर येथील महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन असलेल्या त्रिविक्रम मंदिरात, उत्तरेश्वर मंदिरात सोमवारी सकाळी हेरिटेज वॉक संपन्न झाला. यावेळी मेघा राऊत व भाग्यश्री बिराजदार यांना ऐतिहासिक वारसाचे महत्त्व सांगितले. या हेरिटेज वॉकमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थिनी सहभाग घेतला होता. हेरिटेज वॉक यशस्वी करण्यासाठी किसन काळे, अविनाश राठोड, मेघा राऊत, भाग्यश्री बिराजदार, सविता बांगडे, गिरीश चव्हाण, सलमान पठाण, दुर्गश नानजकर, विवेक उबाळे यांना परिश्रम घेतले.

## भारतीय संविधान रॅलीत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**
भारतीय संविधान दिवस असुन या दिनाचे औचित्य साधून आणि भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समिती धाराशिव व भारतीय संविधान अमृतमहोत्सवी समिती धाराशिवच्या वतीने शहरातुन भारतीय संविधान जनजागरण रॅलीचे आयोजन केले आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या रॅलीत संविधान रथ,शाळा कॉलेज नर्सिंग कॉलेज,प्रशासकीय अधिकारी कर्मचारी सह सामाजिक संस्था,संघटना व शहरवासियांचा सहभाग असुन दरवर्षी प्रमाणे ठिकठिकाणी भारतीय संविधान जनजागरण रॅलीचे स्वागत केले जाणार असुन भारतीय संविधानाचा गौरव करण्यासाठी आपणही या संविधान जनजागरण रॅलीत सहभागी व्हावे,हि रॅली दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात होणार आहे. सर्वांनी या रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन मतदार जनजागरण समिती धाराशिवचे कार्याध्यक्ष गणेश वाघमारे यांनी समितीच्या वतीने केले आहे.

# धाराशिव पोलिसांकडून आठ दिवसात खुनाचा उलगडा; चार आरोपींना अटक

### अनैतिक संबंधानंतर पैशाची मागणी करणाऱ्या महिलेचा झाला होता खुन... पोलिस अधिक्षक संजय जाधव यांची पत्रकार परिषदेत माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**
अनैतिक संबंधानंतर पैशाची मागणी करणाऱ्या महिलेचा खुन करुन तिचा मृतदेह परंडा तालुक्यातील सोनारी शिवारात १७ नोव्हेंबर रोजी हरण ओढा पुलाखाली टाकण्यात होता. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. त्या खुनाचा उलगडा करण्यात धाराशिव पोलिसांना यश आले असून अहिल्यानगर जिल्ह्यातून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस अधिक्षक संजय जाधव यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेस अति.पोलिस अधिक्षक गौहर हसन, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक अमोल मोरे, पोलिस विभागाचे पीआरओ प्रमोद भिंगारे आदींची उपस्थिती होती.



यावेळी ते म्हणाले, मृत महिलेचे वय अंदाजे ३० वर्षे असून तिच्या डाव्या हातावर प्रकाश असे गोंदलेले होते. तिच्या शरीरावर आणि डोक्यावर कशानेतरी वार करून तिचा खून करण्यात आला होता. याचा पुरावा हाती लागू नये यासाठी महिलेचा मृतदेह पुलावरून खाली पाण्यात फेकण्यात आला होता. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता अंबी पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक रामकिसन दगडू कुंभार यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती.

गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक स्थापन



करण्यात आले. गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या हाती कोणताही ठोस पुरावा नव्हता. अशातही तपासासाठी नेमलेल्या पथकाने परिसरातील विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली. यात एक स्विफ्ट डिझायर कार संशयित रित्या दिसून आली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आणि गोपनीय माहितीच्या आधारे या कारचा माग घेत शोध लावला. ती श्रीरामपूर तालूक्यातील पढेगाव येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तातडीने पढेगाव गाठून कारसह चालक संदीप उत्तम तोरणे याला ताब्यात घेतले. सुरुवातीला तोरणेने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु पोलिसांनी त्याला विश्वासात घेत अधिक चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे, मृत महिलेचे श्रीरामपूर येथील विश्वास नामदेव झरे याच्याशी अनैतिक संबंध होते. ती त्याला सतत पैशांची मागणी करून त्रास देत होती. त्यामुळे झरे याने तोरणे, सोमनाथ रामनाथ कराळे आणि महेश कुंडलीक जाधव या तिघांना मिळून ९२ हजार रुपये देऊन महिलेची हत्या करण्याचे कट रचला. १६ नोव्हेंबर रोजी रात्री या चौघांनी महिलेला तुळजापूरला देवदर्शनासाठी जाण्याचे आमिष दाखवून नेवासा फाट्यावरून घोडेगाव, अहमदनगर, कडा आष्टी, जामखेड, खर्डा आणि आंबी मार्गे सोनारी गावाजवळील पुलावर नेले. तेथे त्यांनी तिचा गळा आवळून आणि डोक्यात दगड मारून खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह पुलावरून खाली फेकला. पोलिसांनी तोरणे याला अटक केल्यानंतर त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे इतर तिघांनाही ताब्यात घेतले. त्यांनीही गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिली आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, सचिन खटके, सुदर्शन कासार यांच्यासह पोलीस हवालदार विनोद जानराव, शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, अमोल निंबाळकर, समाधान वाघमारे, फरहान पठाण, पोलीस नाईक नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक पोलीस अंमलदार प्रकाश बोईनवाड, विनायक दहिहंडे, पोलीस अंमलदार नागनाथ गुरव आणि सुनिल मोरे यांच्या पथकाने केला आहे.

## तुळजापूर तालुक्यातील १२१ गावांनाही हावाय विकास; २२ हजाराची आ. पाटील यांना लीड

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील मात्र तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील मतदारसंघ पुनर्रचनेत गेलेल्या ७२ गावापेक्षा तुळजापूर तालुक्यातील १२१ गाव भारी ठरली. या गावांनीही आ.राणाजगजितसिंह पाटील यांना २२ हजाराची लीड दिली आहे. त्या गावांनाही विकास हावाय, असे दिसत आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार आ.राणाजगजीतसिंह पाटील तर महाविकास आघाडीचे धीरज पाटील यांच्यात मुख्य लढत झाली.

या लढतीत भाजप आ.राणाजगजीतसिंह पाटील यांनी ३६ हजार ८६३ मतांची लिड मिळवत विजय संपादीत केला. धाराशिव तालुक्यातील ७२ गावावर तुळजापूर तालुक्यातील १२१ गावे भारी ठरली आहेत. ७२ गावापेक्षा तुळजापूर तालुक्यातील १२१ गावातून मताची लीड अधिक मिळाली आहे.

धाराशिवमधील ७२ गावातून ९६ हजार ६९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यापैकी आ.राणाजगजितसिंह पाटील यांना ५२ हजार ११८ तर धिरज पाटील यांना ३७ हजार ४९१ मतदान झाले आ.राणाजगजितसिंह पाटील यांना यातून १४ हजार ६२७ मतांची आघाडी घेतली तर तुळजापूरमधील १२१ गावातून १ लाख ५९ हजार ८७५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. त्यापैकी आमदार राणा पाटील यांना ७९ हजार ७०५ तर धीरज पाटील यांना ५७ हजार, ४९३ मतदान झाले आ.राणाजगजितसिंह पाटील यांना २२ हजार २१३ ची लीड देत धाराशिवमधील ७२ गावा पेक्षा जास्त लिड दिली.

त्यामुळे धाराशिवमधील ७२ गावाला तुळजापूर मधील १२१ गावे भारी ठरली आहेत. अशी चर्चा सध्या विधानसभा मतदासंघात ऐकावयास येत आहे.



## धाराशिव साखर कारखान्याच्या १३ गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ नोव्हेंबर -**
धाराशिव साखर कारखाना लि. चोराखळी ता. कळंब, जि.धाराशिव या कारखान्याचे सन २०२४-२०२५ चा १३ वा गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रम दि.२४ रोजी ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर महारज जाधव (येडशीकर) यांचे हस्ते पार पडला. या प्रसंगी कारखान्याचे कर्मचारी सचिन साठे यांच्या हस्ते सत्यनारायण पुजा करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक जनरल मॅनेजर ए.एस पठाण यांनी केले. यावेळी कार्यकारी संचालक अमर धनंजय पाटील यांनी उपलब्ध ऊस नोंदी नुसार अंदाजे ३ ते ३.५० लाख मे. टन ऊस गाळपाचे उदिष्ठ पुर्ण करणे करिता कारखाना टीम, व तोडणी वाहतुक यंत्रना ई. सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमा प्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर धनंजय पाटील, संचालक रणजीत भोसले, संचालक संदिप खारे, संचालक सुहास शिंदे, सुरेश पाटील (केज), मालोजीराव गलांडे, हरिश्चंद्र भगत, प्रा.सुनिल पाटील, किरण मुळे, बालाजी मुळे, भास्कर पुरेकर, सुरेश सावंत, एम.एस.सी बँकेचे कारखाना प्रतिनिधी एच.बी.शेवाळे कारखान्याचे जनरल मॅनेजर ए.एस पठाण, सुंदर साळुंखे, वैभव देशमुख, दयानंद गव्हाणे, सुनिल लोमटे, प्रविण बोबडे, बाबासाहेब वाडेकर, सर्व कर्मचारी व कामगार तसेच कारखाना परिसरातील शेतकरी, वाहतुक ठेकेदार, इतर कार्यकमास उपस्थित होते. तसेच चीफ इंजीनिअर वैभव देशमुख यांनी उपस्थितंतांचे आभार मानले.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजन ठरली किंगमेकर; महायुतीच्या भावांना दिली साथ

### महायुती सत्तेत आल्यानंतर बहिणींच्या खात्यात २ हजार १०० रुपये देण्याचे अभिवचन पूर्ण होणार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२५ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर करून ती प्रत्यक्षात राबवण्यात आली. ऐन दिवाळीत भावाची बहिणीला ओवाळणी थेट खात्यावर टाकल्याने महायुतीच्या पारड्यात लाडक्या बहिणींनी भरभरून मतदानरूपी आशीर्वाद दिले आहे. हे स्पष्ट निकालावरून दिसत आहे. महाविकास आघाडीचा लोकसभेचा ट्रेंड या निवडणुकीत बिलकुल चालला नाही. हेच निकालावरून स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागासाठी दि.२० रोजी सर्वत्र एकाच वेळी मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानंतर एक्झिट पोलचा सिलसिला सुरू झाला. या एक्झिट पोलमध्ये महायुतीला जवळपास सत्ता मिळणार आहे. हे सांगण्यात येत होते. परंतु दि.२३ रोजी झालेल्या मतमोजणी प्रक्रियेत महायुतीच्या अफलातून विजयाबद्दल सर्वत्र या विजयाचे खरे श्रेय या लाडक्या बहिणीला जाते. असे ग्रामीण भागाचे चित्र सांगत आहे. महायुतीसमोर विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकसभेच्या पराभवाचे चित्र होते. तर महाविकास आघाडीकडे लोकसभा विजयाचा परफॉर्मन्स होता. अशा राजकीय घडामोडीत महायुतीने मध्यप्रदेशचा पॅटर्न वापरून लाडली बहनाप्रमाणे महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेचा महाराष्ट्रभर महायुतीचे नेत्यांनी फिरून भरपूर प्रचार केला. एका कुटुंबातील दोन महिलांना महिना १५०० रुपये महिन्याला देण्याचे जाहीर केल्यानंतर लागलीच पहिला हप्ता बहिणींच्या थेट खात्यात जमा केला. त्याचबरोबर दिवाळीत एका बहिणीच्या खात्यावर ७५०० रुपये थेट खात्यात जमा केले. त्यामुळे महायुतीतील लाडके भाऊ अधिक लाडके झाले. महायुतीवरचा विश्वास पूर्णतः पक्का झाला. महायुती सत्तेत आल्यानंतर बहिणींच्या खात्यात २१०० रुपये देण्याचे अभिवचन जाहीर प्रचार सभेत केल्याने या योजनेला अधिक बळ मिळाले. महिलांचे मतदान महायुतीच्या पारड्यात गेले. त्यामुळेच सर्वच निकाल आश्चर्यकारक लागले आहेत. महाविकास आघाडीच्या दिग्गज नेते मंडळींना पराभवाचा फटका बसला आहे.

## संत सोयराबाई : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या ग्रंथाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**
येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालय येथील खा. प्रमोद महाजन सभागृहात 'संत सोयराबाई : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या ग्रंथाचे प्रकाशन कवयित्री, समीक्षक, साहित्यिका डॉ. कविताजी मुरूमकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी शेषाद्रीआण्णा डांगे, अधिवक्ता हभप पांडुरंग महाराज लोमटे महाराज, कमलाताई नलवडे, माजी प्राचार्या सुलभा देशमुख, प्राचार्य प्रशांत चौधरी, प्रा.महेश्वर कळलावे, ज्येष्ठ नेते रामदास कोळगे, ग्रंथ संपादक सचिन पाटील, प्रा.सोमनाथ लांडगे, ॲड. रोहित मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.तेरकर तर आभार प्रा.डॉ.रसाळ यांनी केले.

## संकट मोचक; तेरखेडा जिल्हा परिषद गटाने सावंताना तारले; १७०० मतांची लीड

### तरुण भारतचा ग्राउंड रिपोर्ट ठरला खरा... कोणाकडे किती ग्रामपंचायती, सरपंच असल्याचे वृत्तातून टाकला होता प्रकाश...

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२५ नोव्हेंबर -**
राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला जाहीर झाला आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा थेट सामना राज्यात पाहिला मिळाला आहे. महायुतीने महाराष्ट्रात जोरदार मुसांडी मारली असून सर्वाधिक २३२ जागांवर महायुतीने विजय मिळवला आहे. तर महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीत मोठा दारुण पराभव झाला आहे. फक्त ५६ जागांवर महाविकास आघाडीला समाधान मानावे लागले आहे. विधानसभा निवडणुकीत सर्व राज्याचे लक्ष मात्र परंडा विधानसभेवर लागले होते. याठिकाणी विद्यमान आमदार राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत आणि पंधरा वर्ष आमदार राहिलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल मोटे यांच्यात जोरदार लढत झाली होती. आणि या लढतीत तानाजी सावंत यांचा दुसऱ्यांदा विजय झाला. १ हजार ५०९ अल्प मतांनी निसटता विजय झाला.



तर राहुल मोटेंचा पराभव झाला. परंडा विधानसभेत भूम, परंडा आणि वाशी या तीन तालुक्यांचा समावेश आहे. या तीन तालुक्यात १३ जिल्हा परिषद गट येत आहेत. यात विधानसभा निवडणुकीत सावंतांच्या विजयात वाशी तालुक्यातील तेरखेडा जिल्हा परिषद गटाचा मोठा वाटा मिळाला आहे,असेच म्हणावे लागेल.

तेरखेडा जिल्हा परिषद गटातून तानाजी सावंताना १ हजार ७०० मतांची लीड मिळाली आहे. सावंत यांच्यासाठी तेरखेडा जिल्हा परिषद गट हा संकट मोचकच ठरला असल्याचे दिसून येते. तसेच तेरखेडा गटात हवा कोणाची, कोणाकडे किती ग्रामपंचायती व कोणाचे किती सरपंच आहेत, असा ग्राउंस रिपोर्ट दि.७ ऑक्टोबर रोजी तरुण भारत सोलापूर वृत्तपत्राचे बातमीदार सुधीर घोलप यांनी ग्राउंड आडवा घेतला होता. बातमी मध्ये

तेरखेडा गटात एकूण १६ गावे असून १४ ग्रामपंचायती आहेत. जरी राजकीय पक्षांच्या चिन्हांवर या निवडणुका लढल्या जात नसल्या तरीही पक्षांच्या विचारांचे वेगवेगळे गट ग्रामपंचायत निवडणुकीत असतात. यातील तेरखेडा, सटवाईवाडी आणि गोजवडा या तीन ग्रामपंचायत शरद पवार गटाकडे आहेत. तर नांदगाव ही एक ग्रामपंचायत उद्धव ठाकरे गटाकडे आहे. मात्र पारडी ही एक ग्रामपंचायत बिनविरोध झालेली होती. तर कडकनाथवाडी, खामकरवाडी,मसूबाचीवाडी,वडजी,गोलेगाव,

कन्हेरी, इंदापूर, जुन्नर आणि इसरूप-बोरी खानापूर ग्रुप ग्रामपंचायत मिळून सर्वात जास्त ९ ग्रामपंचायती ह्या शिंदे सेना गटाकडे असल्याचे तरुण भारत वृत्तपत्राने दाखवले होते. त्या दरम्यान वाशी तालुक्यात आणि तेरखेडा गटात नागरिकांमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये सर्वत्र चर्चेला उदान आले होते,की येत्या २०२४ विधानसभा निवडणुकीत तानाजी सावंताना ९ ग्रामपंचायती नक्की फायदा होईल आणि जास्त मतांची लीड तेरखेडा गटातून मिळेल, अशी मोठी चर्चा रमली होती.

तसेच होऊन झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपण पाहिले आहे. तेरखेडा गटाने सावंत यांना तारले असून १ हजार ७०० मतांची लीड तेरखेडा गटाने दिली आहे. तर सावंत यांचा १ हजार ५०९ मतांनी विजय झाला आहे. त्यामुळे सावंत यांचे या गटात वर्चस्व असल्याचे दिसून आले. तसेच तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे भूम, परंडा, वाशी तालुक्यात शिंदे सेना, भाजप कार्यकर्त्यांचे कौतुक केले जात आहे.



## धनंजय बडवे यांना काण्व उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील धनंजय व्यंकटराव बडवे यांना नुकतेच काण्व उद्योगरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. काण्व ब्राह्मण समाज, छत्रपती संभाजीनगर याच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. बडवे यांना आपला स्वतःचा उद्योग छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असून याचा वार्षिक उलाढाल ३५ कोटीहून अधिक असून या माध्यमातून अनेकांच्या हाताला त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यांना २४ नोव्हेंबर रोजी कण्व उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष लक्ष्मीकांत जयपुरकर, उपाध्यक्ष उदय मानवतकर, सचिव धिरज देशपांडे, आदींचा हास्ते बडवे यांना काण्व उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## वार्ड ११, न.प. शाळा क्र.३, सांजा रोडवरील शौचालय तात्काळ सुरु करा : मनविसेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ नोव्हेंबर -**
वार्ड क्रमांक ११, नगर परिषद शाळा क्रमांक ३ व सांजा रोड जवळील शौचालय बंदावस्थेत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना शौचास जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगर परिषदेच्यावतीने बांधलेली शौचालय ही फक्त शोभेची वस्तू बनली आहेत. त्याचा वापर करता येत नसल्यामुळे असून अडचण अन् नसून खोळंबा याप्रमाणे अवस्था या शौचालयाची झाली आहे. त्यामुळे ती शौचालय तात्काळ सुरू करावीत. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्यावतीने जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांनी एका निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांना दि.२५ नोव्हेंबर रोजी दिला आहे.

## दखल

सोनाली मिश्रा

# 'एक है तो सेफ है'



झारखंड आणि महाराष्ट्रासह अनेक जागांवरील पोटनिवडणुका २० नोव्हेंबर रोजी पार पडल्या. या दोन्ही राज्यांमधील प्रचारसभांमध्ये सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी स्वतःला झोकून दिले होते. राजकारणी मंडळींनी नवनवीन घोषणा, आश्वासने आणि उद्दिष्टांसह मतदारांचे दार ठोठावले. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपाच्या 'बटेंगे तो कटेंगे' या नाऱ्याची बरीच चर्चा झाली. हा नारा मुस्लिमविरोधी असल्याची बडबड तथाकथित सेक्युलर मंडळींनी केली. या नाऱ्यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याची नेहमीचीच ओरड काँग्रेसी नेते व अन्य विरोधकांनी केली.

वास्तविक 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेमध्ये कोणत्याही समाजाचे नाव नाही किंवा ही कोणाच्या विरोधातही ही घोषणा देण्यात आलेली नाही. मात्र काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष या घोषणेला फुटीर आणि हिंसक म्हणत आहेत. इंग्रजीत एक म्हण आहे -'णपळींशव ुश डींरपव, वळींळवशव ुश षरश्रश्र' अर्थात 'आम्ही एकसंध राहिलो तर विजयी होऊ आणि विभाजित झालो तर आम्ही अपयशी होऊ.

त्याचप्रमाणे एकतेसंबंधी एक श्लोक आढळतो-

***ऐक्यं बलं समाजस्य तदभावे स दुर्बलः।***
***तस्मात् ऐक्यं प्रशंसन्ति दृढं राष्ट्र हितैषिणः ॥***

म्हणजेच एकता हीच समाजाची ताकद असते, एकताहीन अर्थात एकतेचा अभाव असलेला समाज दुर्बल असतो. त्यामुळेच राष्ट्रहिताचा विचार करणारे नेहमीच ऐक्याला प्रोत्साहन देतात. जर आपण हाच विचार आजच्या स्थानिक भाषेत मांडला किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास नेत्यांच्या भाषेत मांडला तर ते आपल्या मतदारांना आपला मुद्दा प्रभावीपणे समजावून सांगू शकतील आणि संवाद टिकवून ठेवू शकतील. 'बटेंगे तो कटेंगे' मधून हाच अर्थ प्रतिबिंबित होतो. अर्थात आपण विभाजित राहू तर सुरक्षित राहणार नाही. त्यामुळे आपल्याला एकीची आवश्यकता आहे. 'एकीचे बळ' असेल तर आपण कायम सुरक्षित राहू. हेच या घोषणेतून बिंबवायचे आहे.

**'बटेंगे तो कटेंगे' वर राजकारण कशासाठी?**

प्रत्येक कालखंडाची स्वतःची एक भाषा असते आणि एक पुस्तकाची भाषा असते आणि दुसरी आणखी एक नैसर्गिक, सहज संवादाची भाषा असते. पण या मूलभूत एकतेच्या मुद्यावर विरोधक एवढा गदारोळ का माजवत आहेत? 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेमध्ये अशी कोणती फुटीरतावादी गोष्ट आहे? ज्यांचे राजकारण नेहमीच फुटीरतावादी/विभाजनवादी घोषणांवरच अवलबूंन आहे, त्यांना तर भाजपाच्या या घोषणेचे मर्म कधीच समजणार नाही.

कन्हैया कुमार हा सध्या काँग्रेसचा नेता आहे. कन्हैया कुमारला एकेकाळी तरुणांचा नेता म्हटले जायचे. पण कन्हैय्या कुमार कोणत्या घोषणांनी प्रसिद्धीच्या झोतात आला? याचा विचार कुणी गांभीर्याने केला आहे काय? त्याच्या प्रत्यक्ष कार्यापेक्षा त्याने दिलेल्या घोषणांमुळेच तो प्रसिद्धीच्या झोतात आला. कन्हैया कुमार जेव्हा जेएनयूमध्ये विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष होता तेव्हा कोणत्या घोषणांमुळे तो प्रसिद्धीच्या झोतात आला होता? अशा कोणत्या या घोषणा होत्या की ज्यांनी स्वातंत्र्यानंतर थेट भारताच्या आत्म्यावर हल्ला केला होता? हे अजूनही सुरूच आहे.

**काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेवर राजकारण करीत आहे. मात्र, यापूर्वी काही फुटीरवादी संघटनांनी विभाजनवादी तसेच चिथावणीखोर नारे दिले होते त्यावेळी मात्र सारे काँग्रेसी नेते, ढोंगी सेक्युलॅरिस्ट लेखक, विचारवंत तोंडात मिठाची गुळणी धरून बसले होते. या दुटप्पी लोकांना त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे.**

या घोषणा होत्या-

**''अफजल हम शर्मिंदा है, तेरे कातिल जिंदा है',**
**'तुम कितने अफजल मारोगे, हर घर से अफजल निकलेगा''**

आता अफझल कोण होता हे अधिक सविस्तरपणे सांगण्याची आवश्यकता नाही. ज्या घोषणांना काँग्रेस 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' म्हणते, त्या घोषणांमध्ये भारताचे तुकडे करण्याची गोष्ट होती. त्या घोषणा पुढीलप्रमाणे आहेत-

**'' भारत तेरे टुकडे होंगे- इंशाअल्लाह-इंशा अल्लाह''**
**''कश्मीर की आजादी तक जंग रहेगी, जंग रहेगी''**
**'हम क्या चाहते, आजादी,''**
**''कश्मीर मांगे आजादी, केरल मांगे आजादी,**
**असम मांगे आजादी!''**

या घोषणा होत्या ज्यात भारताच्या फाळणीबाबत, विघटनाबद्दल स्पष्टपणे उल्लेख होता. आणि या घोषणा दुसरीकडे कुठे नाही तर तर देशातील सर्वांत प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था म्हणविण्यात येणाऱ्या विद्यापीठात देण्यात आल्या होत्या. तोच कन्हैया कुमार सध्या काँग्रेसमध्ये आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य केवळ या घोषणांपुरतेच मर्यादित नव्हते. जेव्हा नागरिकत्व कायद्याविरोधात तथाकथित आंदोलन सुरू होते त्यावेळी फैज अहमद फैज यांची एक कविता (शायरी) अत्यंत क्रांतिकारी म्हणून गायली जात होती, 'लाझीम है कि हम भी देखेंगे!' पण या कवितेचे स्वरूप पूर्ण वाचल्यावरच कळू शकेल. यामध्ये मूर्तिभंजनाची चर्चा आहे तर दुसरीकडे 'खल्क-ए-खुदा'च्या राजवटीचीही इच्छा आहे. ती मजहबी (धार्मिक) असू शकते. पण भारतासारख्या संविधानाचे पालन करणाऱ्या देशात, जिथे अनेक धर्माचे, पंथाचे व संप्रदायाचे लोक राहतात, तिथे मूर्ती पाडून कोणती क्रांती घडू शकते, हे समजण्यापलीकडचे आहे. आणि या आंदोलनाला कोणी पाठिंबा दिला हे देखील सर्वांना माहीत आहे.

या नागरिकत्व कायद्याविरोधातील तथाकथित आंदोलनादरम्यान काली माता हिजाबमध्ये दाखवण्यात आली होती. हे सर्व भडकवणारे आणि फूट पाडणारे नव्हते का? 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेला विभाजनवादी म्हणणारे लोक जेव्हा नूपुर शर्मा यांना 'सर तन से जुदा' ची धमकी देण्यात आली तेव्हा मात्र गप्प बसले होते. धर्मांध व जिहादी मुस्लिमांनी दिलेल्या या घोषणेला विरोध करण्याची अथवा ही घोषणा देणाऱ्या मुल्ला-मौलवींना विरोध करण्याची हिंमत या सेक्युलर व अन्य काँग्रेसी नेत्यांनी दाखविली नव्हती.

भारतात संविधानापेक्षाही धार्मिक कट्टरता शक्तिशाली आहे का? त्यामुळेच हा प्रश्न वारंवार उद्भवतो. कारण वारंवार कोणत्या ना कोणत्या मुद्यावर कोणाच्या तरी विरोधात घोषणाबाजी केली जाते. भाजपाच्या माजी नेत्या नूपुर शर्मा हे त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. त्यांच्या विरोधात जे वातावरण निर्माण करण्यात आले आणि ज्या प्रकारची घोषणाबाजी झाली, ती केवळ हृदय पिळवटून टाकणारी नव्हती तर त्यांचे वैयक्तिक आयुष्यही पूर्णपणे उद्ध्वस्त करणारी होती. आज ती सुरक्षेच्या घेऱ्यात आपले आयुष्य जगत आहे. पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा नारा देऊन 'सर तन से जुदा' घोषणेला विरोध न करणाऱ्या लोकांसाठी नुपूर शर्माचे स्वातंत्र्य हा मुद्दाच नाही. उदयपूरचा शिंपी कन्हैयाच्या हत्येविषयी देखील असेच म्हणता येईल. मात्र, कन्हैयाच्या हत्येविषयी मूग गिळून बसलेले 'बटेंगे तो कटेंगे'चा मुद्दा आवर्जून उपस्थित करतात, हा शुद्ध ढोंगीपणा आहे. वास्तविक 'एक रहेंगे तो सेफ रहेंगे' या घोषणेमुळे केवळ भारतविरोधी लोकांना संताप यायला हवा. प्रत्येक देशभक्ताला हे चांगलेच ठाऊक आहे की, जर आपापसातील मतभेदांमुळे विभाजित झालो तर ते बाहेरच्या लोकांच्या हल्ल्यांना बळी पडतील, शक्तिहीन होतील आणि शेवटी नष्ट होतील. म्हणूनच 'एक है तो सेफ है' हे राष्ट्रभक्त नागरिकांनी कायम लक्षात ठेवले पाहिजे.

(पांचजन्यवरून साभार)

## विदेश

कुलदीप सिंह

# कोण आहेत तुलसी गबार्ड?

जवळपास दोन दशके अमेरिकन लष्कराची शाखा नॅशनल गार्डमध्ये आपली सेवा देणाऱ्या तुलसी गबार्ड यांना आता राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात राष्ट्रीय गुप्तचर विभागाच्या संचालकपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. गबार्ड या अमेरिकेच्या पहिल्या हिंदू खासदार आहेत. २०२२ मध्ये त्या डेमोक्रॅटिक पक्षातून बाहेर पडल्या आणि पुढे त्यांनी ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षात जाण्याचा निर्णय घेतला. त्यांना ट्रम्प प्रशासनातील एक अद्वितीय व्यक्ती म्हणून स्थान देण्यात आले. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांना एवढी मोठी जबाबदारी दिल्याने त्यांचा एक जुना व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये त्या 'हरे कृष्ण, हरे राम' गाताना दिसत आहे. तुलसी गबार्ड यांच्या व्हायरल झालेल्या या व्हिडिओमध्ये त्या पारंपरिक भारतीय पोशाख, सलवार सूटमध्ये स्टेजवर व्हायोलिन वाजवताना भजने गाताना दिसत आहे. त्या सनातन धर्माचा प्रचार करताना दिसतात.




### आईने हिंदू धर्म स्वीकारला होता

तुलसी गबार्ड यांना त्यांच्या नावामुळे अनेकदा भारतीय मूळच्या समजले जाते. त्यांचा भारताशी कोणताही थेट संबंध नाही. त्यांच्या आईने हिंदू धर्म स्वीकारला होता. त्यांनी आपल्या मुलांची नावे हिंदू ठेवली. गबार्ड स्वतःला हिंदू मानतात. तुलसी यांचा जन्म सामोअन अमेरिकन कुटुंबात झाला. त्यांचे वडील कॅथॉलिक होते. आई देखील ख्रिश्चन होती, जिने नंतर हिंदू धर्म स्वीकारला. तुलसी या सुरुवातीला ख्रिश्चन होत्या, पण नंतर त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला. त्यांनी अमेरिकन काँग्रेसच्या हिंदू सदस्य म्हणून त्यांनी इतिहास घडविला आहे.

### भगवद् गीतेच्या अभ्यासक

जवळपास दोन दशके अमेरिकन लष्कराच्या नॅशनल गार्ड शाखेत काम करणाऱ्या तुलसी गबार्ड यांची मागे इराक आणि कुवेतमध्ये देखील नियुक्ती झाली होती. रिपब्लिकन पक्षात सामील होण्यापूर्वी तुलसी ज्यो बायडेन यांच्या डेमोक्रेटिक पक्षाच्या सदस्य होत्या. २०१३ ते २०२१ पर्यंत त्या हवाई मतदारसंघातून खासदारही होत्या. २०१३ मध्ये जेव्हा त्या खासदार झाल्या तेव्हा तुलसी यांनी भगवद् गीतेवर हात ठेवून शपथ घेतली. विशेष म्हणजे त्यांचा गीतेचा चांगला अभ्यास आहे. तुलसी यांनी २०२२ मध्ये डेमोक्रॅट्सकडून अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी नामांकन मिळवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, त्यांना पुरेसा पाठिंबा मिळाला नाही.

तथापि, नंतर त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाचा राजीनामा दिला आणि त्या रिपब्लिकन पक्षात सामील झाल्या. त्यांनी अध्यक्षीय निवडणुकीदरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी खुलेआम प्रचार केला होता. डोनाल्ड ट्रम्प हे देखील तुलसी यांच्या क्षमता आणि प्रभाव चांगले जाणून आहेत. ते गबार्ड यांच्या कार्याचे नेहमीच कौतुक करतात. 'दोन्ही बाजूंनी व्यापक समर्थन असलेल्या नेत्या' या शब्दात ट्रम्प यांनी तुलसी यांचे वर्णन केले. ट्रम्प म्हणाले, 'मला माहीत आहे की, तुलसी निर्भयतेने राष्ट्रीय गुप्तचर विभागाचे काम सांभाळतील. त्यांचा आपल्या सर्वांना अभिमान आहे. विशेष म्हणजे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प प्रमुख सरकारी भूमिकांसाठी निष्ठावंतांची निवड करण्यासाठी ओळखले जातात. ट्रम्प यांनी गबार्ड यांच्या इच्छाशक्तीचीही प्रशंसा केली आहे. तुलसी आधी डेमोक्रॅट्ससोबत होत्या आणि आज त्या आमच्या रिपब्लिकन पक्षासोबत आहेत. यामुळे दोन्ही पक्षांचे लोक त्यांचे ऐकतात, असे गौरवोद्गार ट्रम्प यांनी काढले आहेत. त्या यूएस हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये निवडून येणाऱ्या पहिल्या हिंदू महिला आहेत. अमेरिकन लष्कराच्या नॅशनल गार्ड मध्ये त्या माजी लेफ्टनंट कर्नल राहिल्या आहेत. त्यांच्या या अनुभवामुळे राष्ट्रीय गुप्तचर संचालक म्हणून त्यांची निवड करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. गबार्ड यांची नियुक्ती ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरण आणि बुद्धिमत्तेकडे दृष्टिकोनात बदल दर्शवू शकते, असे तज्ज्ञांना वाटते. तुलसी आता अमेरिकेच्या सर्व अंतर्गत एजन्सीच्या प्रमुख आहेत. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या आपल्यासोबत नेहमी भगवद्गीता ठेवतात.

### बायडेन प्रशासनाच्या उघड टीकाकार

२०१९ मध्ये तुलसी गबार्ड यांनी डेमोक्रेटिक राष्ट्राध्यक्षपदाच्या प्राथमिक फेरीतील चर्चेत कमला हॅरिस यांचा पराभव केला होता. परंतु, राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीत त्यांना यश मिळाले नाही. गबार्ड या बायडेन यांच्या प्रशासनाच्या जागतिक संघर्षांच्या उघड टीकाकार राहिल्या आहेत, त्या आता ट्रम्प प्रशासनाच्या आंतरराष्ट्रीय धोरणांवर प्रभाव टाकू शकतात. त्यांनी ज्यो बायडेन यांच्या आंतरराष्ट्रीय धोरणांवर चिंताही व्यक्त केली होती आणि आपण पूर्वीपेक्षा अणुयुद्धाच्या अगदी जवळ आहोत, असे मतही व्यक्त केले होते. एका प्रचार रॅलीत बोलताना, गबार्ड यांनी जागतिक तणाव कमी करण्याच्या उद्देशावर डोनाल्ड ट्रम्प यांना दिलेल्या पाठिंब्यावर भर दिला होता. मला विश्वास आहे की त्यांचे कार्य आपल्याला युद्धाच्या उंबरठ्यावरून परत आणण्याचे काम करेल, असे त्या म्हणाल्या होत्या.

अमेरिकेतील परकीय हस्तक्षेपांबद्दल गबार्ड यांची तटस्थ भूमिका राहिली आहे. त्यांनी रशियाबरोबरच्या संघर्षात युक्रेनला बायडेन यांनी दिलेल्या पाठिंब्याचा निषेध केला आहे. ओबामा प्रशासनाच्या सीरियातील सहभागाविरुद्धही त्यांनी आवाज उठवला होता. त्यांच्या नियुक्तीने ट्रम्प प्रशासनाच्या राजनैतिक धोरणांमध्ये संभाव्य बदल दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गबार्ड यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय गुप्तचर विभाग सध्याचे संघर्ष कमी करणे, अमेरिकेबरोबर दीर्घकालीन युती आदी मुद्यांना प्राधान्य देऊ शकतो. अमेरिकेच्या हस्तक्षेपवादी धोरणांवरील गबार्ड यांच्या पूर्वीच्या टीकेवरून जागतिक स्तरावर अमेरिकेची भूमिका बदलू शकते हेदेखील स्पष्ट होते.

(पांचजन्यवरून साभार)



# सत्यकाम जाबाल

छांदोग्य उपनिषदात सत्यकाम नामक एका बालकाची कथा आहे. त्या वेळेस प्रचलित असलेल्या रीतिरिवाजानुसार मुलगा आठ वर्षांचा झाल्यावर शिक्षणासाठी त्याची रवानगी गुरुकुलात केली जात असे. सत्यकाम हा जबला नामक एका परिचारिकेचा मुलगा. अनेक घरची कामे करून तिने त्याला वाढविले होते. कष्टाने वाढवित असताना तिने त्याला सत्याची महती सांगितली होती. मातेच्या शिकवणुकीमुळे कोणत्याही स्थितीत सत्याचीच कास धरणे आणि असत्यापासून दूर राहणे हे सत्यकामच्या मनावर चांगलेच ठसले होते. हाच सत्यकाम जाबाल नंतर आचार्य अर्थात ऋषी म्हणून प्रसिद्धीस पावले. या प्राचीन भारतीय आचार्यांची कथा निश्चितच प्रेरणादायी आहे.

सत्यकाम याच्या आईचे नाव जबाला. म्हणून तो जाबाल. सत्यकाम जाबाल याची कथा छांदोग्योपनिषदात आलेली आहे. ती थोडक्यात अशी : गुरुकुलात ब्रह्मचर्याने राहून विद्या संपादन करावी, अशी इच्छा असल्यामुळे सत्यकामाने आपल्या आईला 'माझे गोत्र काय?' असा प्रश्न विचारला. कारण, ज्याचे कुलगोत्र माहीत आहे, त्याचेच उपनयन करून आचार्यांनी त्याला विद्या द्यावयाची, असा त्या काळात शिष्टाचार होता. जबाला आपल्या पुत्राला म्हणाली, 'तू कोणत्या गोत्रात जन्मलास हे मला माहीत नाही. तुझा पिता कोण हेही मला माहीत नाही. माझ्या तरुणपणी मी परिचारिका होते, तेव्हा तुझा जन्म झाला. माझे नाव जबाला आणि तुझे सत्यकाम, त्यामुळे तू आपले नाव सत्यकाम जाबाल असे सांग. ', त्यानंतर सत्यकाम हा रिद्रूमत गौतम या आचार्यांकडे गेला. आचार्यांनी त्याला त्याचे कुलगोत्र विचारल्यावर त्याने आईने त्याला जे सांगितले होते, तेच आचार्यांना सांगितले. सत्यकामाने खरे तेच सांगितल्यामुळे आचार्य त्याच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी सत्यकामाचे उपनयन करून त्याला आपला शिष्य करून घेतले. त्यानंतर त्यांनी त्याला कृश झालेल्या चारशे गायी दिल्या आणि त्यांच्या मागून जाण्यास सांगितले. त्या गाईंसह तो अरण्यात आला आणि तेथे अनेक वर्षे केवळ कंदमुळांवर आपली उपजीविका करून त्याने त्या गायींचे पालन केले. यथावकाश त्या गायींची संख्या वाढून ती एक हजार झाली. त्यानंतर त्याला एका बैलाच्या वाणीत प्रवेश केलेला वायू , अग्नी, हंस (आदित्य) आणि मद्गु (पाण्याच्या आश्रयाने राहणारा एक रानटी पक्षी) ह्यांनी प्रत्येकी एक, ह्याप्रमाणे चार ब्रह्मपादांचे ज्ञान दिले. हे ज्ञान घेऊन आलेला सत्यकाम आपल्या हजार गायींसह आश्रमात येताच त्याला आचार्यांनी प्रेमाने हाक मारून म्हटले, ' तू मला ब्रह्मज्ञासारखा दिसत आहेस. तुला ब्रह्मोपदेश कुणी केला ? ' त्यावर मनुष्यांखेरीज अन्य जीवांनी तो केला, असे सांगून सत्यकाम म्हणाला, 'परंतु आपण श्रेष्ठ आहात आपण माझी इच्छा पूर्ण करू शकाल. श्रेष्ठतम आचार्यांकडून प्राप्त झालेली विद्याच श्रेष्ठतम पदवीला पोहोचविते '. गुरूशिवाय इतरांनी उपदेश करू नये आणि शिष्याने दुसरा गुरू करू नये, या संकेताचे त्याने पालन केले. त्यानंतर आचार्यांनी तोच उपदेश त्याला पुन्हा केला. ब्रह्म हे सोळा कलांचे असून ते एकरस आहे, ही शिकवण त्यांनी दिली. सत्यकाम जाबाल षोडशकल ब्रह्माचा द्रष्टा झाला. सत्यकाम जाबालाचा निर्देश शतपथब्राह्मण, बृहदारण्यकोपनिषद, मैत्रायणी उपनिषद या उपनिषदांतूनही आलेला आहे.

# गुणकारी नाशपती

नाशपती फळ आरोग्यासाठी फायदेशीर असते. यामुळे वजन आटोक्यात राहते. यामुळे रक्तदाब, कोलेस्टेरॉल आणि रक्तातील साखर नियंत्रित राहते. हृदयासाठी हे फळ चांगले असते. यात असणाऱ्या फायबरमुळे पोट साफ होते. यातील अँटिऑक्सिडेंटमुळे रोग प्रतिकारशक्ती वाढते, कॅन्सरचा धोका कमी होतो. नाशपाती खाण्यामुळे त्वचा आणि डोळ्यांचे आरोग्य चांगले राहते.

### फळ खाण्याचे फायदे ☐

**१) वजन कमी होते.**

नाशपतीमध्ये कमी कॅलरीज आणि जास्त फायबर असते. फायबरमुळे भूक कमी लागते. नाशपती खाण्यामुळे बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते त्यामुळे भूक कमी लागते. आणि त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**२) हृदयरोगाचा धोका कमी होतो.**

नाशपतीमध्ये पोटॅशियम आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. ह्या घटकांमुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. कारण पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहतो, तर फायबरमुळे कोलेस्टेरॉल कमी होत असते. रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित राहिल्याने हृदयरोगाचा धोका कमी होतो. त्यामुळे नाशपाती फळ हे आपल्या हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते.

**३) कर्करोगाचा धोका कमी होतो.**


नाशपतीमध्ये कॅरोटीनॉइड्स, फ्लेव्होनॉइड्स यासारखे अँटिऑक्सिडेंट असतात. अँटिऑक्सिडेंटमुळे कर्करोगाच्या पेशींची वाढ रोखली जाते. यामुळे कर्करोगापासून दूर राहण्यास मदत होते.

**४) रक्तातील साखर नियंत्रित राहते**

नाशपतीमध्ये फायबर जास्त असते. फायबरमुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. त्यामुळे टाईप-२ डायबेटिसपासून दूर राहण्यास मदत होते. तसेच मधुमेह असणाऱ्या रुग्णांसाठी हे फळ चांगले असते.

**५) पचनक्रिया सुधारते.**

नाशपतीमध्ये असणाऱ्या फायबरमुळे साफ होऊन बद्धकोष्ठता दूर होते. तसेच यामुळे अल्सरेटिव्ह कोलायटिस आणि इतर आतड्याच्या समस्या कमी होण्यास मदत होते.



# आवळ्याचा मुरब्बा खाण्याचे 'हे' आहेत फायदे

आवळ्याला आयुर्वेदात महत्त्वाचे स्थान आहे. हे एक सुपरफूड आहे जे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. आवळा व्हिटॅमिन सी, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे यांनी समृद्ध आहे, जे शरीराला केवळ पोषणच देत नाही तर अनेक रोगांपासून संरक्षण करण्यास देखील मदत करते. आवळ्यामध्ये अनेक औषधी घटक आढळतात. असे म्हटले जाते की रोज एक आवळा खाल्ल्यास सर्व समस्या दूर होतात. पण आवळा खूप आंबट असल्यामुळे प्रत्येकजण त्याचे सेवन करू शकतोच असे नाही. अशा परिस्थितीत आवळ्याचा मुरंबा हा एक चांगला पर्याय आहे.


आवळ्याचा मुरब्बा खायला खूप चविष्ट असतो. हा घरी सहज तयार करता येतो किंवा तुम्ही बाजारातूनही विकत घेऊ शकता. असे म्हटले जाते की दररोज रिकाम्या पोटी आवळ्याचा मुरंबा खाल्ल्यास आरोग्याला अनेक फायदे मिळतात आणि शरीराला अनेक आजारांपासून संरक्षण मिळते. आवळ्याचा मुरब्बा हा केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्यास त्याचे फायदे अनेक पटींनी वाढतात. आवळ्याचा मुरब्बा खाण्याचे सात प्रमुख आरोग्य फायदे जाणून घेऊया-

### त्वचेसाठी फायदेशीर

'आवळ्याचा मुरब्बा' त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे त्वचेला दुरुस्त करण्यास मदत करतात. याचे दररोज सेवन केल्याने त्वचेवरील मुरुम आणि डाग कमी होतात. याशिवाय आवळ्याच्या मुरब्ब्यामुळे चेहऱ्यावरची चमक वाढते आणि यामुळे वृद्धत्वाची लक्षणे कमी होतात.

### वजन कमी करण्यास उपयुक्त

आवळ्याचा मुरब्बा शरीरातील चयापचय (मेटाबॉलिझम) क्रिया उत्तम होते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. यामध्ये असलेले अमिनो ॲसिड शरीरातील चरबी कमी करण्यास मदत करतात. जर तुम्ही आवळ्याचा मुरब्बा सकाळी रिकाम्या पोटी सेवन केल्यास तुमचे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.



### हृदयासाठी फायदेशीर

आवळा मुरब्बा हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासही मदत करतो. शरीरातील खराब कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यासाठी हा सहायक होतो, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. याच्या नियमित सेवनाने रक्ताभिसरण सुधारते आणि हृदयाचे ठोके सुरळीत राहतात. हृदय मजबूत आणि निरोगी ठेवण्यासाठी हा एक नैसर्गिक उपाय आहे.

### पचनतंत्र होते मजबूत

आवळ्याचा मुरब्बा पचन तंत्र मजबूत करण्यासाठी फारच उपयुक्त आहे. बद्धकोष्ठता, अपचन आणि आम्लपित्त यांसारख्या पोटाच्या समस्या दूर होण्यास यामुळे मदत होते. आवळ्यात भरपूर फायबर असते, जे पोट साफ करते आणि पचन क्रिया सुधारते.

### प्रतिकारशक्ती वाढते

आवळ्याचा मुरब्बा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडेंट्समुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. तसेच हे सर्दी, खोकला इत्यादी सामान्य समस्यांना देखील प्रतिबंध करते.

### केसांसाठी फायदेशीर

आवळा मुरब्बा केसांसाठी देखील खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने केस मजबूत व चमकदार बनतात. आवळा मुरब्बा रोज खाल्ल्याने केसगळती कमी होते आणि केसांची वाढ सुधारते. पोषण करण्याचा हा एक नैसर्गिक मार्ग आहे.

### डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर

आवळ्याचा मुरब्बा डोळ्यांसाठीही खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात असते, ज्यामुळे दृष्टी सुधारण्यास मदत होते. त्यामुळे डोळ्याची सूज आणि जळजळ देखील कमी होते आणि डोळे निरोगी राहतात.

### गरोदरपणात उपयुक्त

असे म्हटले जाते की जर गर्भवती महिलेने दररोज रिकाम्या पोटी एक आवळा किंवा आवळ्याचा मुरंबा खाल्ल्यास माता आणि बाळासाठी खूप फायदेशीर ठरते. यामुळे हाडे मजबूत होतात. केसगळतीची समस्या आटोक्यात राहून दृष्टी चांगली राहते. तसेच शरीरात रक्ताची कमतरता भासत नाही.

### रक्त कमी होणे दूर करते

ज्या लोकांच्या शरीरात रक्ताची कमतरता आहे, त्यांनी रोज एक आवळा किंवा आवळ्याचा मुरंबा खावा. त्यात लोह मुबलक प्रमाणात आढळते. याचे नियमित सेवन केल्याने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते आणि ॲनिमियासारख्या समस्या दूर होतात.

### 'गॅस, ॲसिडिटी'पासून सुटका

ज्या लोकांना गॅस आणि ॲसिडिटी किंवा पचनाशी संबंधित कोणत्याही प्रकारची समस्या आहे, त्यांनी रोज रिकाम्या पोटी आवळा खाल्ल्यास समस्या मुळापासून दूर होते. याशिवाय आवळ्यात व्हिटॅमिन ए, सी, ई मुबलक प्रमाणात असते. अशा परिस्थितीत ते त्वचेसाठी खूप चांगले मानले जाते. हे रक्त शुद्ध करणारे आहे, तसेच वृद्धत्वाचे परिणाम टाळते.

(पांचजन्यवरून साभार)

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



### लायन्सद्वारे सेवाकार्य चळवळ वाढवा

## लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ एच २ ची 'लक्ष्य' गेट कॉन्क्लेव्ह उत्साहात



छत्रपती संभाजीनगर: लायन्स म्हणजे सेवाकार्य आणि नेतृत्वासाठी उत्कृष्ट चळवळ आहे. या माध्यमातून प्रत्येक क्लब आणि सदस्याने लायन्स चे कार्य वाढवून त्यात भर घालावी, असे मत लायन्स तर्फे आयोजित 'लक्ष्य' या परिषदेत उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केली.

लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ एच २ तर्फे एमआयटी महाविद्यालयातील आनंद हॉल येथे आयोजित लक्ष्य ही गेट कॉन्क्लुव्ह उत्साहात पार पडली. या परिषदेचे मुख्य अतिथी म्हणून प्रांतपाल गिरीश सिसोदिया आणि मल्टिपल चेअरपर्सन सुनील देसरडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी द्वितीय प्रांतपाल राहुल औसेकर, माजी प्रांतपाल जगदीश पुरोहित, राजेश राऊत आणि गेट कोऑर्डिनेटर प्रदीप गर्गे यांनी उपस्थित लायन्स पदाधिकारी आणि सदस्यांना मेंबरशिप, सेवा आणि लीडरशिप या संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी जी एल टी कॉर्डिनेटर जितेंद्र महाजन, संयोजक गजानन झालवार, रीजन सेक्रेटरी विपुल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या परिषदेचे आयोजन रिजन एकदंत संजीव गुप्ता, रिजन गीता संजय सारडा आणि रीजनस विजय अभिजीत जैन यांनी केले होते. यावेळी झोन चेअर पर्सन मृणालिनी पाटील, राजेश लुनिया, राजेंद्र बजाज, दीपक पुराणिक, दिपाली घुगे, रोनक मूथियन, प्रसाद पाटणी, योगेश धोत्रे, सुमित सोनी, घनश्याम करणाली, जयदीप घुगे आणि विशाल झंवर यांनी परिषदेचे समन्वय केले. या परिषदेचे सूत्रसंचालन अश्विनी जयस्वाल हिने केले.

# एमजीएममधील चार दिवसाच्या वैद्यकीय परिषदेचा समारोप संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय येथे सुरू असलेल्या इंडियन असोसिएशन ऑफ प्रायव्हेट सायकियट्री या चार दिवसाच्या राष्ट्रीय परिषदेचा आज समारोप झाला. दिनांक २१ ते २४ नोव्हेंबर २०२४ दरम्यान चार दिवसांमध्ये या परिषदेमध्ये पाचशेहून अधिक मनोविकार तज्ञांनी सहभाग नोंदवला. या चार दिवसांमध्ये चार प्लेनरी, आठ सह सेशन्स व १३ केस डिस्कशन्स सोबतच दोन डिबेट्स घडून आणण्यात आल्या. या सगळ्या द्वारे सर्व मनोविकार तज्ञांना मनोविकारक क्षेत्रातील भावी वाटचाली विषयी आणि विविध कठीण अशा केसेस साठी आणखीन काय करता येऊ शकते यावर मार्गदर्शन करण्यात आले.





विविध कार्यक्रमांद्वारे जनजागृती होईल असेही नियोजन झाले. प्रमुख सहभागी मध्ये डॉक्टर मोहन आगाशे डॉक्टर विनू गोपाल झवर, डॉक्टर अविनाश डिसूजा, डॉक्टर विनय सिंग ( कॅनडा) डॉक्टर विजय नागचा, डॉक्टर राजेश नागपाल इत्यादींनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. या सर्वा द्वारे परिषदेचा उद्देश (रुग्णांसाठी व एकंदरीत समाजासाठी मनोविकारशास्त्रामध्ये होत असलेल्या विविध बदल आणि विविध दिशा) विचार विनिमय करुण साध्य झाला.

आज या परिषदेचा समारोप सोहळा झाला. यामध्ये नवीन अध्यक्ष डॉक्टर मृगेश वैष्णव यांनी येणाऱ्या दोन वर्षांमध्ये भारतातील मनोविकार तज्ञांच्या प्रायव्हेट हॉस्पिटल्स मध्ये कशाप्रकारे मदत केल्या जाऊ शकते, आणि कसे या संघटनेला आणखीन मजबूत करून समाज उपयोगी कार्य केले जाऊ शकते यावर मार्गदर्शन केले. या परिषदेच्या यशासाठी डॉक्टर अरुण मरवाले, डॉक्टर मानिक भिसे, डॉक्टर श्रद्धा जाधव, डॉक्टर गौरव मुरंबीकर यांच्यासोबत डॉक्टर संजीव सावजी डॉक्टर विनय बारहाळे, डॉक्टर अजिज कादरी, डॉक्टर विनय चपळगावकर, अमित टाक यांच्यासह शहरातील जवळजवळ ५० हून अधिक मनोविकार तज्ञांनी मागच्या काही महिन्यांमध्ये मेहनत घेतलेली होती.

## शहरात उद्या संविधान गौरवरॅलीचे आयोजन

### क्रांती चौकातून प्रारंभ

छत्रपती संभाजीनाग/प्रतिनिधी : देशाचा कार्यभार कायदेशीरपणे योग्य रितीने चालावा, यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला संविधान अर्पण केले. त्याचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य ठरते. संविधानाचा सन्मान व संरक्षण करण्यासाठी मंगळवार, २६ नोव्हेंबर या संविधान दिनी सकाळी ११.०० वाजता क्रांती चौकापासून शहरातील सर्व संविधान प्रिय संघटना तसेच भारतीय संविधान सन्मान, सुरक्षा, संवर्धन समिती व शहरातील इतर सर्व संघटनांच्या वतीने संविधान गौरव रॅली आयोजित करण्यात आल्याची माहिती ॲड. व्ही. डी. खिल्लारे यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली.

ही रॅली क्रांतीचौक येथून प्रारंभ होवून पैठण गेट, गुलमंडी, शहागंज मार्गे अण्णा भाऊ साठे चौकमार्गे विभागीय आयुक्त कार्यालय येथे पायी जाईल व विभागीय आयुक्तांना भारतीय संविधाना प्रती सन्मान, सुरक्षा व संवर्धन करण्याबाबत निवेदन देण्यात येईल. रॅलीसोबत पूज्य भिक्खू संघ तसेच शहरातील सर्व संघटनांतर्फे ही गौरव रॅली काढण्यात येणार असून, या रॅलीमध्ये चारशे ते पाचशे संविधानप्रेमी नागरिक सामील होणार आहेत. अत्यंत शांतताप्रिय मार्गाने व शिस्तीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. शहरासह राज्यातील व सर्व देशवासीयांना हे भारतीय संविधान म्हणजे सर्वांचे सर्वश्रेष्ठ ग्रंथ व आचारसंहिता असून, त्यांच्या प्रती आदरभावना सुरक्षा, सन्मान व संवर्धन व्यक्त करण्यासाठी या रॅलीचे आयोजन केले आहे. या रॅलीत आंबेडकरी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन ॲड. खिल्लारे यांनी केले आहे.

## दोन वाहनांत दबून एक ठार

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : एका वाहनातून दुसऱ्या वाहनात माल चढवण्यासाठी वाहन रिव्हर्स घेताना दोन्ही वाहनांच्या मध्ये सापडून एक जण ठार झाला. ही घटना नगर महामार्गावरील अब्बास पेट्रोल पंपाच्या समोरील मैदानात घडली. मृत व्यक्तीचे नाव जनार्दन हरिभाऊ साबळे (४८, रा. गेवराई पायटा, ता. फुलंब्री) असे आहे. वाळूज औद्योगिक परिसरातून शेंद्रा एमआयडीसीमध्ये माल वाहून नेण्यासाठी एका वाहनातून दुसऱ्या वाहनामध्ये माल भरण्याकरिता दोन्ही वाहने एक दुसऱ्याच्या जवळ घेऊन येत असताना, रिव्हर्स येणाऱ्या टेम्पो ट्रक चालकाला वाहनाच्या मागे उभा असणाऱ्या चालक साबळे यांचा अंदाज न आल्याने ट्रकचालकाने वाहन मागे घेताच दोन्ही वाहनांच्या मध्ये दबून साबळे गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ बेशुद्धावस्थेत परसराम सोनवणे व रवी काटे यांनी घाटी रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## १ डिसेंबरला होणार 'एमआयटी औरंगाबाद हेरिटेज हाफ मॅरेथॉन' : सातवे पर्व

छत्रपती संभाजीनगर– ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगर शहरात येत्या १ डिसेंबर रोजी हेरिटेज हाफ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले असून एमआयटी औरंगाबादच्या पुढाकाराने आणि असोसिएशन ऑफ इंटरनॅशनल मॅरेथॉन आणि डिस्टन्स रेसच्या च्या वतीने प्रमाणित करण्यात आली आहे. यंदा या मॅरेथॉनचे सातवे वर्ष आहे. ही मॅरेथॉन देवगिरी किल्ल्यापासून सुरू होऊन वेरूळच्या लेण्यांजवळ समारोप होईल.

शहराच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाच्या पार्श्वभूमीवर फिटनेसप्रती जागरूकता निर्माण व्हावी हा या मॅरेथॉनचा उद्देश असणार आहे. विशेष म्हणजे यामध्ये अनुभवी तसेच नवोदितांना देखील सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. 'युटूर्कॅनरन'कडून या मॅरेथॉनचे नियोजन–आयोजन करण्यात आले असून औरंगाबाद ब्लॅक बक्स यांच्याकडून मोलाचे योगदान मिळत आहे.

२१ आणि १० किमी मॅरेथॉनला एम्सकडून प्रमाणित करण्यात आले असून भारतीय सैन्य विभागाकडूनही प्रतिसाद मिळत आहे. यात सहभागी होण्यासाठी २७ नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करावी लागणार असून https://mitaurangabadheritagehalfmarathon.in वर संपर्क साधता येईल.

यावर्षी मुंबईतील झिपर्स क्लबचे सदस्य देखील सहभागी होणार आहेत. या क्लबमध्ये ज्येष्ठ धावकांचा समावेश आहे, ज्यांनी बायपास शस्त्रक्रिया केली आहे. ते नियमितपणे प्रशिक्षण घेतात आणि देशभर विविध इव्हेंट्समध्ये सहभागी होतात. त्यांचा सहभाग इतरांना प्रेरणा देतो आणि आरोग्य आणि फिटनेसच्या दिशेने प्रवास सुरू करणाऱ्यांसाठी एक मोठा उत्साह आहे.

'युटूर्कॅनरन' ही भारतातील एक अग्रगण्य संपूर्ण–सेट एन्ड्युरन्स स्पोर्ट्स मॅनेजमेंट संस्था आहे. ही संस्था प्रारंभापासून या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाची मुख्य कणा आहे. देशभरातील प्रमुख कॉर्पोरेट आणि सरकारी क्लायंटसाठी ती मॅरेथॉन आणि इतर क्रीडा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करते. 'युटूर्कॅनरन'चे पी. व्हेन्कटरामन म्हणाले, एमआयटी औरंगाबाद हेरिटेज हाफ मॅरेथॉन ही एक केवळ शारीरिक आव्हान नाही; ती शहराच्या वारसा आणि संस्कृतीशी जोडण्याची एक संधी आहे. आमचा उद्देश व्यक्तींना निरोगी जीवनशैली अवलंबण्यास प्रेरित करणे आहे, आणि त्याच वेळी शहराच्या समृद्ध इतिहासावर गर्व करण्याची संधी देणे आहे. आम्ही १ डिसेंबरला छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्व देशभरातील सहभागींना स्वागत करण्यास उत्सुक आहोत.

एबीबीचे मुकुंद भोगले म्हणाले, एमआयटी औरंगाबाद हेरिटेज हाफ मॅरेथॉनची सुरुवात औरंगाबाद ब्लॅक बक्सकडून केली गेली होती, ज्याचा उद्देश आरोग्य, फिटनेस आणि समुदाय सहभागाला प्रोत्साहन देणे आणि त्याचवेळी छत्रपती संभाजीनगरच्या समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे प्रदर्शन करणे होता. या कार्यक्रमाची सुरुवात करताना अनेक प्रमुख उद्देश होते. निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहित करणे, समुदायभावना वृद्धिंगत करणे, स्थानिक प्रतिभेला समर्थन देणे आणि त्याठिकाणच्या वारशाचे उत्सव साजरा करणे.

एमआयटीचे संचालक मुनीश शर्मा म्हणाले की, एमआयटी औरंगाबाद हेरिटेज हाफ मॅरेथॉनचा एक महत्त्वाचा भाग आम्ही आहोत. आम्ही नेहमीच आरोग्य, समृद्ध आणि शहराच्या सांस्कृतिक वारशाला प्रोत्साहन देतो. हा मॅरेथॉन व्यक्तींना आपली सीमा तपासण्यासाठी, आव्हान स्वीकारण्यासाठी आणि छत्रपती संभाजीनगरच्या सौंदर्याचा अनुभव घेण्यासाठी एक उत्तम संधी प्रदान करतो. एमआयटीमध्ये, आम्ही शारीरिक आणि वैयक्तिक विकासाला प्रोत्साहन देणारे एक वातावरण निर्माण करण्यावर विश्वास ठेवतो आणि अशा एक विशेष उपक्रमाचा भाग होण्याचा आम्हाला आनंद आहे.

**अशी असेल मॅरेथॉन–** तारीख आणि वेळ: हाफ मॅरेथॉन १ डिसेंबर रोजी सुरू होईल, पहिला फ्लॅग–ऑफ सकाळी सहा वाजता होईल. कार्यक्रमात तीन वेगवेगळ्या रेस कॅटेगिरी आहेत, ज्यामुळे विविध प्रकारच्या सहभागींना आकर्षित केले जाईल:, अल्ट्रा हाफ मॅरेथॉन (२५ किमी) – ज्यांना अतिरिक्त आव्हान हवे आहे., हाफ मॅरेथॉन (२१ किमी) – अनुभवी धावकांसाठी एक क्लासिक रेस., दहा किमी रन – जे नवीन धावकांसाठी किंवा छोट्या अंतराची आवड असलेल्या व्यक्तींसाठी असेल.

# सैन्यदलाचा गणवेश बहुमोल, ते ध्येय ठेवा

### पद्म फेस्टिव्हल समारोपसत्रात व्हाइस डमिरल आर. स्वामीनाथन यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

छत्रपती संभाजीनगर : बालवयातच क्षेत्र निवडून त्या दिशेने वाटचाल सुरू करा. सैन्यात येऊ इच्छित असाल तर प्रचंड मेहनतीची तयारी ठेवा. सर्व गणवेशांमध्ये सैन्यदलाचा गणवेश सर्वात मोलाचा आहे. तो मिळवण्याचे ध्येय ठेवा, असा सल्ला व्हाइस डमिरल आर. स्वामीनाथन यांनी दिला. शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी पद्म फेस्टिव्हलच्या समारोप सत्रात ते बोलत होते. तीनदिवसीय पद्म फेस्टिव्हलचा शनिवारी समारोप झाला. हवाईदल, नौदल आणि सैन्यदलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य होते. या वेळी व्हाइस डमिरल आर. स्वामीनाथन, एनसीसी बटालिअनचे कमांडर ब्रिगेडियर उमेशकुमार ओझा, विंग कमांडर (निवृत्त) प्रदीप देशपांडे, डॉ. स्मिता व डॉ. रवींद्र कोल्हे, मंगल केंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आर. स्वामीनाथन म्हणाले, सन १९७४ मध्ये बालवयात इथे आलो होतो. ५० वर्षांनंतर आज या सोहळ्याच्या निमित्ताने इथे आलो. अनेक स्थित्यंतरांनंतरही हे ऐतिहासिक शहर आपलं वेगळेपणं टिकवून आहे. सैन्यदल हा करिअरचा सर्वात वेगळा मार्ग आहे. इतर कोणत्याही पर्यायांपेक्षा सैन्यदलात उत्तुंग संधी आहेत. शालेय विद्यार्थ्यांनी याकडे अधिक चौकसपणे पहावे, अशी सूचना प्रदीप देशपांडे यांनी केली. सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरवलेल्या मान्यवरांचा सहवास घडवणारा हा सोहळा आहे. ध्येयप्राप्तीची प्रबळ इच्छा घेऊन केलेल्या वाटचालीतून किती सुंदर आयुष्य घडवता येऊ शकतं, याचा वस्तुपाठ देणाऱ्या या मान्यवरांची शिकवण जीवनभर लक्षात ठेवा, असा सल्ला ओझा यांनी दिला. सूत्रसंचालन अजय देशपांडे यांनी केले. तीनदिवसांतील १२ सत्रांचा गोषवारा पद्मश्री केंडे यांनी मांडला. डॉ. यु.म. पठाण यांनी आधी ध्वनिमुद्रित केलेली मुलाखत यानंतर दाखवण्यात आली. पद्म फेस्टिव्हलच्या निमित्ताने घेतलेल्या मराठवाडा पातळीवरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

बॉक्स : हारजीत तो चलती रहेगी…चलते रहो

क्रीडा हे पदोपदी परीक्षा पाहणारं क्षेत्र आहे. दुखापती, हारणे या बाबी घडवणारच. त्याच्या आपल्या प्रवासाचाच एक भाग आहेत. आपली स्वप्ने त्यांच्यापेक्षा मोठी असतील तर यश मिळतेच. त्यामुळे यशापयशाची चिंता न करता वाटचाल करत रहा, असा संदेश पंजाब पोलीस दलात कार्यरत सुनीता रानी यांनी दिला. पद्म फेस्टिव्हलमध्ये शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी त्या बोलत होत्या.

डॉ. सतीश सुराणा, दिप्ती शेवतेकर, डॉ. आदित्य जोशी यांनी घेतलेल्या मुलाखतीत सुनीता राणी यांनी आपला जीवनप्रवास मांडला. त्या म्हणाल्या, आमच्या शाळेत गृहपाठ न करणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्गातून बाहेर काढले जात असे. माझ्यासोबतही हे घडायचे. एकदा मी अशाच कारणामुळे वर्गाबाहेर उभी असताना आमच्या शाळेतील मुलींची टीम क्रीडा स्पर्धेत यश मिळवून आली होती. त्यांच्याकडे पाहून आपणही असेच यश मिळवावे, असे मनोमन ठरवले. नववीत असल्यापासून क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या क्रीडापटूंना पहायचे, त्यांच्यासारखी कामगिरी आपणही करावी, या ध्यासातून मेहनत केली. शालेय स्तरांवरील स्पर्धांमध्ये यश मिळवल्यानंतर शिक्षक अन् वर्गमैत्रिणींकडून होणाऱ्या कौतुकाने माझा आत्मविश्वास वाढला. त्या बळावरच शाळा, जिल्हा पातळी, राज्य व राष्ट्रीय स्तर असा प्रवास घडला.

### एकनाथ शिंदे यांनी केले अब्दुल सत्तार यांचे स्वागत



सिल्लोड (प्रतिनिधी) : मुंबई येथील बाळासाहेब भवन येथे अब्दुल सत्तार यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी सिल्लोड सोयगाव मतदार संघातून चौथ्यांदा विजयी झाल्याबद्दल मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथराव शिंदे यांनी अब्दुल सत्तार यांचा सत्कार करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नीलमताई गोरे, महाड चे आमदार तथा शिवसेनापक्षाचे मुख्य प्रतोद भारत शेट गोगावले उपस्थित होते.

### शामलाल रंगवाणी यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी – आकाशवाणी येथील रहिवासी शामलाल जयरामदास रंगवाणी (७४) यांचे हृदयविकाराने दि.२३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता निधन झाले. त्यांच्यावर दि.२४ नोव्हेंबर रोजी कैलास नगर स्मशानभूमीत सकाळी १० वाजता अत्यंसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

## काळभैरव अष्टमी जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

### दर्शनासाठी भक्तगणांची रिघ



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : दरवर्षी प्रमाणे जयसिंगपुरा येथील पुरातन काळभैरव मंदिरात काळभैरव जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. श्रीकाळभैरवाच्या दर्शनासाठी एक कि. मी. पर्यंत रांग लागली होती. रात्री उशिरापर्यंत भाविक दर्शन घेत होते. शुक्रवारी, २२ रोजी अष्टमीच्या रात्री बरोबर १२ वाजता महाअभिषेक आरती होऊन मंदिरात १००८ दिव्यांची आरास करून छप्पन्न भोगाचा नैवेद्य दाखविण्यात आला. रात्री प्रमुख अतिथी उद्योगपती सोमनाथ साखरे सह ब्राम्हण महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक, मुख्य पुजारी नाथ बाबा हिवरकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. संपूर्ण पूजा विधी संजय राजहंस गुरू व आतीश औंढेकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्या नंतर मात्रका पूजन करण्यात आले. शनिवारी, २३ रोजी पहाटे ४ वाजता होमहवन करून रात्रभर भजन–कीर्तन झाले. सकाळी ११ वाजेपासून महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. काळभैरव अष्टमी जन्मोत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी किरण रेब्बा, अण्णा चैतन्य पवार, दिनेश हिवरकर, सचिन तंमल, अमोल खांडेकर, रवी कवडे,पंकज बजाज, दीपक धीरज, रवी, योगेश गुल्लू, अनिकेत, दर्शन, लखन उदय हिवरकर आदींनी प्रयत्न केले.

# पालकांनो, मुलांना माणूस म्हणून घडवा; डॉ. रवींद्र कोल्हे यांचा सल्ला

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

अभ्यास, मार्क्स, करिअर हे सगळं महत्वाचं आहे. पण, चांगलं जगायचं कसं हे मुलांना आवर्जून शिकवलं पाहिजे. पालकांनी मुलांना माणूस म्हणून घडवावं, असा सल्ला डॉ. रवींद्र कोल्हे यांनी दिला. शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी पद्म फेस्टिव्हलमध्ये ते बोलत होते.

बैराहगड हे घनदाट जंगलांनी वेढलं गेलेलं दुर्गम गाव. मेळघाटातील धारणी या थोड्या मोठ्या गावापासून सुमारे ४० किलोमीटर अंतरावर वसलेल्या या गावाचा दरवर्षी पावसाळ्यात जगापासून संपर्क तुटतो. १९९० मध्ये इथे कोल्हे दाम्पत्याने पहिला दवाखाना सुरू केला. माता व बालमृत्यू रोखण्यासाठी २० वर्षांपेक्षा अधिक काळ केलेल्या धडपडीचा सगळा प्रवास डॉ. स्मिता– रवींद्र कोल्हे यांनी शनिवारी उलगडला. डॉ. अश्विनीकुमार तुपकरी आणि डॉ. नीलिमा पांडे यांनी कोल्हे दाम्पत्याची मुलाखत घेतली.

डॉ. रवींद्र कोल्हे म्हणाले, गणित आणि फिजिक्स हे दोन आवडीचे विषय होते. इंजिनिअरिंग करायचं होतं. पण, वैद्यकीय विद्याशाखेला सहजपणे प्रवेश मिळाला. माणसांत राहायचं की यंत्रांत गुंतायचं, यातून मी मेडिकल निवडलं. वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच मित्रांसोबत झोपडपट्टीत जाऊन प्रश्न समजावून घेण्यास सुरुवात केली. तिथे दारूचं दुकान उघडलं जाणार होतं. स्थानिकांचा विरोध वाढल्यामुळे पोलिसांनी या दुकानाला परवानगी दिली नाही. सामाजिक क्षेत्रातील कार्यातलं हे माझं पहिलं यश. पुढे इंटर्नशिप करताना प्रामाणिकपणे ग्रामीण भागाचे प्रश्न समजून घेतले. त्याआधीचं माझं आयुष्य शहरांत गेलं. त्यामुळे मी पहिल्यांदाच गरीबी काय असते हे पाहिलं. सहा महिन्यांच्या इंटर्नशिपनं वेगळा अनुभव दिला. पुढे तिघा मित्रांनी दहा दिवसांची सायकल यात्रा काढली. या यात्रेत ग्रामीण भागाचं वास्तव जवळून अनुभवलं.

### शेतकरी आत्महत्यामुक्त गाव

**पोषणाचा अभाव हे स्थानिकांच्या अनारोग्याच प्रमुख कारण होतं. हा प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही शेती क्षेत्रात काम सुरू केलं. स्थानिक वातावरणात टिकाव धरू शकतील अशा प्रगत वाणाचं बियाणं मिळवलं. आमच्या प्रयोगांना मिळणारं यश पाहून इतरांनीही त्याचं अनुकरण केलं. गरजूंना जास्त मजुरी मिळावी, यासाठी रोजगार हमी, जलसंधारणाची कामं सुरू केली. सन १९८९ मध्ये पाण्याची भ्रांत असणाऱ्या या भागात आज शेतीसाठी चोवीस तास पाणी उपलब्ध आहे. यामुळे आमच्या भागात शेतकरी आत्महत्येची एकही घटना घडली नाही, हे विशेष.**

इंटर्नशिप संपवून मी मुंबईला गेलो. या काळात मी जगाशी कोणताही संपर्क ठेवला नाही. मी आणि माझे रुग्ण इतकंच माझं जग होतं. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे मी पुढे मेळघाटात टिकू शकलो. इंटर्नशिपमध्ये आम्ही मित्रांनी जवळपास ३७ प्रकल्प पाहिले. तिथे काम कसं चालतं, हे अनुभवलं. मेळघाटातील पाणी, रस्ता, शाळा, आरोग्य सुविधा असे प्रश्न सोडवण्याचा आम्ही प्रयत्न सुरू केला. एमबीबीएसनंतर एका मित्रासोबत बैराहगड इथे प्रॅक्टिस सुरू केली. आधी उन्हाळ्यातले चार महिने तिथे राहिलो. पावसाळ्यात तिथे प्रचंड पाऊस होतो. तोही आम्ही अनुभवला. याचदरम्यान, लसीकरणाअभावी सहा जणांचे मृत्यू झाले. अवघ्या दीड रुपयांत मिळणाऱ्या धनुर्वाताची इंजेक्शन्स न दिल्यामुळे हा प्रकार घडला होता. या क्षेत्रात काम करायचं तर आणखी शिक्षण घ्यायला हवं, या विचारानं एमडीसाठी नागपूरला परतलो.

सामाजिक क्षेत्रात काम करताना सुरुवातीच्या काळात भावनांची जी तीव्रता असते, कामातला जो प्रामाणिकपणा असतो तो टिकवून ठेवण्याचं आव्हानं असतं. केवळ चांगला विचारं करून चालत नाही. सुरुवात केली तेवढ्याच तन्मयतेनं, अव्याहतपणे काम करणं गरजेच असतं. मी ज्या लोकांसाठी काम करत होतो त्यांच्या भावनांचे बंधच एवढे उत्कट होते की एमडी पूर्ण झाल्यानंतर मी त्वरेनं बैराहगड गाठलं. माझ्या कामात पूर्णत: आयुष्य झोकून देईल, अशी सहचारिणी निवडण्यावर माझा कटाक्ष होता. मला गरिबीत राहण्याची आवड आहे. त्यामुळे पत्नीलाही हा मार्ग पसंत असणं आवश्यक होता. विवाहावर पाच रुपयांपेक्षा जास्त खर्च करायचा नाही, असंही मी ठरवलं होतं. या अशा अटींमुळे अनेक मुलींनी मला नकार दिला होता. अगदी विरुद्ध स्वभाव असूनही स्मिता यांनी अटींसह माझा प्रस्ताव स्वीकारला, मेळघाटात जगणंही शिकून घेतलं. हळूहळू आम्ही दोघं तिथं स्थिरावलो. मुलाचा जन्म आमच्याच रुग्णालयात झाला. मुलांच शिक्षण गावातल्या जिल्हा परिषद शाळेत झालं.

डॉ. स्मिता कोल्हे म्हणाल्या, 'माझा स्वभाव बंडखोर होता. स्वत:च्या हिमतीवर मी चांगले पैसे मिळवत होते. रवींद्र यांच्यासोबत विवाह करण्याचा प्रस्ताव माझ्यासमोर आला तेव्हा मी प्रचंड विचारात पडले. एकीकडे माझा खर्चिक स्वभाव आणि कोल्हेंसोबत रहायचं तर ४०० रुपयांत महिन्याचा खर्च भागवायचा ही अट, हे कसं जमायचं असे अनेक प्रश्न होते. हा प्रस्ताव स्वीकाराचा तर स्वत:च्या स्वभावाला मुरड घालायला हवी, हे समजलं. हो नाही करत मी तयार झाले. २ डिसेंबर रोजी आमचा विवाह झाला. आम्ही मेळघाटात आलो, ग्रामस्थांनी एकत्र येऊन आमच्यासाठी झोपडी उभारली.